# दिव्यासमोर अंधेर

## वसंत कानेटकर



म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय नाटक
सं.क्र.: २७८४०

IRBK-0121860

# दिव्यासमोर अंधेर

वसंत कानेटकर

IRBK-0121860

' इंद्रायणी साहित्य '

प्रकाशक

श्याम दयार्णव कोपर्डेकर
' इंद्रायणी साहित्य '
२७३ शनिवार पेठ,
पुणे ११ ३००

© वसंत कानेटकर

मुद्रक

अजित शशिकान्त देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ,
पुणे : ४११ ०३०

प्रकाशन दिनांक

११ डिसेंबर १९८६

या पुस्तकातील एकांकिकांच्या प्रयोगाचे,
भाषांतराचे, चित्रपटाचे इत्यादी सर्व हक्क
सौ. उषा वसंत कानेटकर, बी. ए. बी. टी.
यांच्या स्वाधीन आहेत.
आगाऊ लेखी परवानगीशिवाय
ह्या एकांकिकेचा प्रयोग कोणीही करू नये.

परवानगी व परवानगीमूल्य याबद्दल
सौ. उषा वसंत कानेटकर, बी. ए. बी. टी'
' शिवाई ' शरणपूर रोड,
नासिक २. दूरध्वनी : ७३०९२
ह्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

# अनुक्रमणिका


१ ) जा मुला, दिल्या घरी तू सुखी रहा १

२ ) अंधेर नगरीत चौकशी : फाशीची २१

३ ) फक्त एकच कारण ! ३९

४ ) असही एक सौभद्र ६७

# जा मुला, दिल्या घरी तू सुखी राहा

## जा मुला, दिल्या घरी तू सुखी राहा

२९६६० ता. दि. २५।१२।८६
९१.८०३ ... ३ ...

[ **मोंघीरचे ख्यातनाम** नेकीचे पत्रकार भगवतीप्रसाद मिश्रा यांची कोठी. अंमळ गरिबीचीच कोठी हं ! पण ' गरिबी ' म्हणजे ' समृद्ध उत्तरेकडची ' गरिबी, बरं का. भिकार दक्षिणेतली नव्हे. या कोठीतला दर्शनी दिवाणखाना गालिचे, गाद्या-गिरद्यानी सजलेला, किमती झुंबरं, कपाटे, शोभिवंत चिजा आणि गांधी-नेहरूंच्या तसबीरी यानी नटलेला. तस्त, पानदान, तबक या सगळ्या चिजा—चांदीच्या—लोळत पडलेल्या असा अंमळ गरिबीचा दिवाणखाना.

वेळ सायंकाळची. सायंप्रार्थनेची पण सायंप्रार्थनेला अजून थोडा अवकाश असावा. कारण विश्वविख्यात संत, सर्वोदयी पुढारी, महात्माजींचे सत्शिष्य, ऐंशी वर्षांचे आचार्य दाजीबा अजून आपल्या मौन कुटीतून बाहेर आलेले नाहीत. या महालात भगवतीप्रसाद, सुमारे पन्नाशीचे, त्यांच्या पत्नी पूर्णामाई, त्यांची तरुण रूपवान कन्या सरस्वती अतिशय हवालदिल होऊन बसलेले आहेत. आणि समोरच गादीवर ऐटीत रेलून रामनारायणशेट पांडे, त्यांच्या पत्नी महामायावती आणि त्यांचा तरुण पुत्र रविरंजन पडलेल्या मुद्रेने मान खाली घालून बसला आहे. तर रामनारायणजी मोठ्या तावातावाने आणि घमेंडीत बोलताहेत. महामायावतीजी त्यांना आपल्या कुर्‍यात साथ देताहेत. ]

**भगवतीप्रसाद** : ( हात जोडून ) रामनारायणजी, महामायावतीजी, उदार मनानं तुम्ही आम्हाला संभाळून घ्या. पंचवीस हजार रुपये हुंडा मान्य करा, लग्नाचा सगळा खर्च करून सालकृत कन्यादान करायला आम्ही आनंदानं तयार आहोत.

**रामनारायण** : नाही भगवतीप्रसाद कारकून लोक आणि शाळा-कॉलेजातले मास्तर-प्रोफेसर देखील पन्नास हजाराशिवाय दिडकी कमी घेत नाहीत. आणि तुम्ही पंचवीस हजाराची बात बोलता ? अरे आमच्या या रविरंजनला तुम्ही कोण समजलात ?

**महामायावती** : तर काय मेलं ? परवा आमच्या घरगड्याचं लग्न झालं, त्याला सुद्धा पंचवीस हजार रुपये हुंडा मिळाला.

**भगवतीप्रसाद** : देवीजी, तुमचं घराणं भारीतलं आहे, आम्ही तुमच्या पासंगालाही पुरणार नाही हे मला मान्य आहे. एरवी आम्ही मुलगी सांगून यायलादेखील धजावलो नसतो. पण रविरंजनजी आणि आमची सरस्वती यांनी आधीच परस्पर लग्न ठरवलं म्हणून——

**रामनारायण** : ते त्यांचं चुकलं. या मूर्खपणाबद्दल मी या पोराची चांगली खरमरीत कानउघाडणी केली आहे. तरीपण त्याचा गैरफायदा मी तुम्हाला उठवू द्यायचा नाही.

**भगवती** : चार लोकात बभ्रा झालाय रामनारायणजी.

**पूर्णामाई** : आपण नाही म्हणालात तर मुलीचं लग्न जमवणं कठीण जाईल आम्हाला.

**महामायावती** : त्याला आम्ही काय करणार ?

**भगवती :** थोडं समजून घ्या देवीजी आम्हाला.

**रामनारायण :** एक लाख म्हणजे एक लाख. त्यात दिडकी कमी होणार नाही.

**भगवती :** रक्कम आवाक्याच्याबाहेर आहे रामनारायणजी.

**रामनारायण :** ( उठत ) चला बाईसाहेब, इथं वायफळ एरंडाचं गुऱ्हाळ लावण्यात काही अर्थ नाही.

**महामायावती :** ( उठत ) मी तेच म्हणतेय. चल रे, ऊठ रविरंजन... आता इथं क्षणभरही थांबायचं नाही.

**पूर्णामाई :** ( हात जोडून ) असं करू नका देवीजी.... जरा मुलीच्या भविष्याचा विचार करा.

**सरस्वती :** ( डबडबलेल्या डोळयांनी ) तुम्हाला काहीच म्हणायचं नाहीये रविरंजन ?

**रविरंजन :** ( उठत, तिच्याकडं न बघता ) म... म.... मी.... मी... मी काय म्हणणार ! तरी पण आई मला वाटतं—

**रामनारायण :** ( धक्के मारीत ) चूप बैस. एक अक्षर बोलशील तर उभा फोडून काढीन तुला. बाहेर हो... आधी बाहेर हो.

[ रामनारायण आणि महामायावती, रविरंजनला ढकलत, शिव्यागाळी करीत बाहेर घेऊन जातात. सरस्वती रडत रडत आत जाते. पाठोपाठ ' सरस्वती.... सरबाळ ' असा हंबरडा फोडीत पूर्णामाईही आत जातात. " श्री हरी... श्री हरी... देवाच्या मनात असेल तसंच होणार ! " असे उद्‌गारत भगवतीप्रसाद डोळे टिपतात. हे ऐकत आणि पाहात दरवाज्यातून दोन घुंगट घेतलेल्या बायका व चार गरीब खेडूत पुरुष आत येतात. ]

**पहिली घुंगटवाली :** हा काय प्रकार घडला भगवतीप्रसादजी ?

**भगवती :** प्रकार काय असणार बाई ? नेहमीचाच. मुलीचं लग्न मोडलं. हुंड्यासाठी.

**दुसरी घुंगटवाली :** ते तर पाहातच होतो आम्ही. तरी पण—

**पहिली घुंगटवाली :** भगवतीजी, आम्ही आचार्य दाजीबांना भेटायला आलो आहोत. पण इथं वेगळाच तंटाबखेडा उसळलेला दिसला म्हणून आम्ही दाराशी थांबलो.

**भगवती :** काही हरकत नाही. बसा बसा तुम्ही. प्रार्थनेसाठी एवढ्यात आचार्य येतीलच. अरे रामशरण, प्रार्थनेसाठी लोक जमले असतीलच, त्यांना गेट उघडून आत घे.

[ दोन घुंगटवाल्या बायका, त्यांच्या बरोबरचे खेडूत लोक बाजूला कोपऱ्यात बसतात. बाहेरून भराभरा लोक येतात व गलबल्याने बसतात. तेवढ्यात मौन-कुटीचे दार उघडले जाते. अनेक शिष्य-शिष्यिणींसह आचार्य दाजीबा बाहेर येतात, उच्चासनावर बसतात आणि सूतकताईला आरंभ करतात. भगवतीप्रसाद आचार्यांच्या कानाशी लागून काही कुजबूज करतात. आचार्य माना डोलावून त्यांना प्रतिसाद देतात. मग समारोपादाखल— ]

**आचार्य दाजीबा :** ठीक आहे....ठीक आहे....भगवतीप्रसाद चिंता करू नकोस .. चिंता करू नकोस. आजच्या सायंप्रार्थनेनंतर मी चरचरीतपणे याच प्रश्नावर बोलणार आहे. पूर्णामाईला बोलाव....सरूबाळालाही ये म्हणावं....[ लगबगीनं भगवतीप्रसाद जातात व पूर्णामाई व सरस्वती यांना घेऊन येतात. दरम्यान ] पल्लवी, प्रार्थनेची वेळ झाली की टाळी दे. पण ' गाळी ' देऊ नकोस हो.

[ सगळ्या शिष्य-शिष्यिणी खदखदून हसतात. मग सर्वत्र पाहात आचार्य ] आज फुलनदेवी आम्हाला शरण यायची होती. कुठे दिसते आहे का रे फुलवाली फुलनदेवी.......[ श्रोत्यात गलबला. मग- ] घाबरली बेटी. लपली असेल ही फुलनदेवी कुठल्या तरी लतेच्या कुशीत. [ शिष्य मंडळी " वा वा " करीत दाद देत हसतात. तेवढ्यात " आले....आले.. ..." असा गलका उसळतो, तशी भगवतीप्रसाद लगबगीनं बाहेर जातात. क्षणार्धातच गर्दीतून वाट काढीत ते येतात. पाठोपाठ इन्स्पेक्टर मेहेरा आणि त्यांचा कॉन्स्टेबल शिवशंकर येतात. इन्स्पेक्टर मेहेरा आचार्यांना सॅल्यूट ठोकतात. तशी- ]

**दाजीबा :** बैस बैस पूर्णामाई....बैस सरु बाळ...यावरून धडा एवढाच घ्यायचा की प्रेमाफीमात काही तथ्य नाही. ( गात ) दाजीबा म्हणे, कसले प्रेम, कसली माया । सगळाच आहे बोऱ्या । अरे माणूस म्हणजे केवळ मलमूत्राच्या मोऱ्या.

[ शिष्य-शिष्यिणी दाद देतात...." वा जी वा..." आचार्य वर इन्स्पेक्टर साहेबाना पाहात ] तुम्ही दंडाधिकारी दिसता ?

**इन्स्पेक्टर :** होय आचार्य, मी इन्स्पेक्टर मेहेरा.

**दाजीबा :** ( सूतकताई चालू ठेवीत ) मेहेरा ? ठीक ठीक ! ( वर पाहात ) अरे पण मेहेरा, तुझा चेहेरा असा का ?

[ शिष्य-प्रशिष्य खदखदून हसतात. इन्स्पेक्टरसाहेब भांबावतात. पण तेवढ्यात— ]

**भगवती :** हा विनोद आहे बरं का मेहेरासाहेब. आचार्य दाजीबा सतत असले विनोद करून वातावरण खेळकर ठेवतात.

**मेहेरा :** ( कष्टानं खोटं हसत ) असं . असं....! मग हरकत नाही. आचार्य, आज आम्ही आपल्या रक्षणासाठी आलो आहोत. कारण—

**दाजीबा :** रक्षणाचे राहू दे. काही ' भक्षण ' केलेस की नाही ?

[ पुन्हा शिष्यवर्गात दाद, हशा. ] तुझे ' लक्षण ' काही वेगळेच आहे. [ पुन्हा हशा दाद....मेहेरासाहेब गांगरतात ] आणिक तुझ्या पाठीमागे उभा असलेला हा ' करेला ' रे कोण ? [ हशा. ]

**मेहेरा :** हा कॉन्स्टेबल शिवशंकर.

**दाजीबा :** शिवशंकर ? कैलास सोडून हा शिवशंकर इकडे कुठे दाजीबाच्या प्रार्थनेत कडमडला ?

[ पुन्हा हशा–अर्थात खोटा. ] अरे सपेरा–

**इन्स्पे. मेहरा :** इन्स्पेक्टर मेहेरा...सपेरा नव्हे आचार्य.

**दाजीबा :** तेच रे यमाजी भास्करा... [ पुन्हा हशा... ] तुझ्या कमरेचे ते पिस्तूल आण बरे जरा इकडे.. आण.. आण....

[ तो अनमान करतो. तरीपण शिष्य-प्रशिष्य त्याला ते पिस्तूल आचार्यांना द्यायलाच लावतात. आचार्य पिस्तूल घेत, क्षणमात्र खेळत, त्याच्यावरच रोखत–]

**मेहेरा :** नकोऽ... नकोऽ... आचार्य, पिस्तूल भरलेलं आहे....

**दाजीबा :** बोल, आता कोण तुझे रक्षण करणार ? ठोऽऽऽ...

[ मेहेरा मटकन् बसतो. शिवशंकर आडवा पडतो. प्रचंड हशा. पिस्तूल मेहेराला परत करीत– ] आता बोल...सत्यं वदऽऽ...कशासाठी आलास तू इथं ?

**मेहेरा :** ( घाम पुशीत ) आचार्य कुप्रसिद्ध डाकू फुलनदेवी आज या प्रार्थनेच्यावेळी, आपल्याला शरण येणार आहे, अशी वार्ता–

**दाजीबा :** चूक ! चूक ! ' डाकू ' नव्हे. ' डाकू ' हा शब्द पुल्लिंगी. ' फुलनदेवी ' ही स्त्रीलिंगी. तेव्हा देवराऽ–

**मेहेरा :** इन्स्पेक्टर मेहेरा....

**दाजीबा :** तेच ते...( गातो ) दाजीबा म्हणेऽऽ म्हणा तिला डाकुणी फुलनदेवी.... !

[ सभोवतालचे शिष्य अनुयायी माना डोलावीत–" वा वाऽऽ काय शब्द.... केवढं भाषाज्ञान... " उद्‌गारत दाद देतात. ]

**मेहेरा :** ( वैतागून घाम पुशीत ) डाकिणी तर डाकिणी ! पण आचार्य त्या फुलनदेवीला ताब्यात घेण्यासाठी आम्ही आलो आहोत. खास गृहमंत्र्यांनी पाठवलंय इथं आम्हाला.

**दाजीबा :** गृहमंत्री ? अरे वा रे वाऽ ! मग कुठं आहेत तुमची नागपुरी संत्री ?

[ शिष्यवरात हशा. भगवतीप्रसाद– " हा सुद्धा आचार्यांचा विनोद बरं का मेहेरा साहेब." मेहेरा पुन्हा कष्टाने हसतो. मग ] अरे बसेराऽ

**मेहेरा :** ( वैतागून ) इन्स्पेक्टर मेहेरा...मे हे रा. बसेरा नव्हे.

**दाजीबा :** कळलं रे...तेच ते. दाजीबा म्हणे ' गाठ पडली खटनटा । तुला पडला रे फुकट हेलपाटा ! '

[ शिष्यवर हसतात...." वा जी वा ! काय उत्स्फूर्त रचना.... " त्यात अमळ अध्यात्म्याचाही टच आहे बरं का... इत्यादी ]

**मेहेरा :** ( चक्रावत ) हेलपाटा ?

**दाजीबा :** फुलनदेवी गेली फुलं तोडायला माहेरा । अरे गहिरा–

**मेहेरा :** गहिरा नव्हे ऽऽ मे हे रा...

**दाजीबा :** तेच ते. ' अरे गहिरा, कोणावर इथे करीत बसला आहेस तू प हा रा ? '

[ शिष्यवर प्रचंड हसतात. " वा ऽ जी वा ऽ " करीत टाळ्या वाजवतात. ]

**मेहेरा :** भगवतीप्रसाद, आचार्यांचे विनोद आमच्या मेंदूच्या आटोक्याच्या पलीकडले आहेत. तुम्ही थोडासा खुलासा केला तर बरं होईल.

**भगवती :** चला तुम्ही तिकडं बाहेर व्हरांड्यात. मी सांगतो तुम्हाला. फुलनदेवी काही आलेली नाहीये आज. तरी पण–

**मेहेरा :** वाटलंच होतं मला. तरी मी–

[ तेवढ्यात पल्लवी टाळी वाजवते तशी– ]

**दाजीबा :** ( साखळीचे घड्याळ काढून पाहात ) ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ! ( टाळ्या वाजवीत भसाडा सूर लावून ) रघुपती राघव राजाराम....

**भगवतीप्रसाद :** चला चला लवकर....प्रार्थना सुरू झाली.

[ जमलेल्या लोकात प्रार्थनेचा धडाका उडतो. गडबडीने वाट काढीत कॉन्स्टेबल शिवशंकर आणि इन्स्पेक्टर मेहेरा जातात. क्षणभर रामधून चालते ती संपल्यावर ]

**दाजीबा :** ( भाषण करण्याच्या आविर्भावाने ) चांगले सभ्य आणि सद्गृहस्थ म्हणवणारे लोक आताशा काय चावट झालेत ? इथे येऊन 'रघुपती राघव राजाराम' करीत प्रार्थना करतात. दाजीबाचा उपदेश ऐकतात. माना डोलावतात. डोळ्यातून गहिवरून टिपे काढतात. तीन तीनदा दाजीबाच्या पायावर डोके ठेवतात आणि घरी जाऊन भ्रष्टाचार करतात. पैसे खातात. मालाची भेसळ करतात. चांगले गलेगठ्ठ गब्बरसिंग होतात. मात्र मुलाचे लग्न काढले की यांना कचकचीत हुंडा हवा असतो. असल्या अधमाधमांना काय शिक्षा करावी ? आता हेच पाहा. या सालस सज्जन भगवतीप्रसादांचे कन्यारत्न ही सरस्वती. ऊठ सरु बाळ. [ ती उठून श्रोत्यांना नमस्कार करते ] कशी गोड निर्मळ भाबडी निष्पाप मुलगी ! कुणाच्या प्रेमात पडली म्हणालास भगवती ? [ भगवतीप्रसाद त्यांच्या कानात सांगतो ] हो रामनारायणशेट पांडे यांचा मुलगा रविरंजन पांडे इंजीनेर झालाय. म्हणजे काय ? घिसाडी. तर त्याच्या बापाला हवाय एक लाख रुपये हुंडा. एक लाख रुपये ? तेवढ्यासाठी हा चांडाळ, ठरलेलं लग्न मोडायला निघालाय. दाजीबा म्हणतो, ही शुद्ध दरवडेखोरी आहे. म्हणजे गंमत बघा. दरोडेखोरातले मोठे मोठे गब्रू, इरसाल डाकू, पश्चात्तापदग्ध होऊन दाजीबाला शरण यायला लागलेत. तर घरोघरचे हे रामनारायण अगदी राजरोस, निर्लज्जपणाने, वधूपित्यांच्या घरावर डाका घालायला लागलेत. यांचा बंदोबस्त कोणी करणार आहे की नाही ? कुठं गेला तो दंडाधिकारी सपेरा ?

[ गर्दीतून मागून कोठून तरी पुढे येत इन्स्पेक्टर मेहेरा म्हणतात– "मी इन्स्पेक्टर मेहेरा, सपेरा नव्हे." हशा मग] तेच ते. तुझ्यासारखा मोहरा या सभ्य डाकूंचा कसा काय बंदोबस्त करणार आहे ? का तू नुसता 'मोहरा 'च खिशात घालणार आहेस ? ( हशा ). आज फुलनदेवी दाजीबाला शरण यायची होती.

ती आली नाही. कामात गुंतली असेल. ठीक आहे. आज ना उद्या तिच्या हृदयातला परमेश्वर जागा झाला की ती येईल दाजीबाच्या पायाशी. त्यावेळी दाजीबा तिला हेच सांगेल. बये तुला डाका घालायचा असेल तर मुलीच्या बापा-कडून भरमसाठ हुंडा उकळणाऱ्या या सभ्य डाकूवर घाल. बंदुकीची नळी रोखून या भ्याडांना पकडून आण आणि हूंऽऽऽ! 'हूंऽऽ' म्हणजे ठार मारू नकोस. पोरापोरीच लग्न लावून टाक. काऽय? हं सुद्धा, (गातो) दाजीबा म्हणतो, एक देवकार्य आहे. बोला–"सीताकांत स्मरण जयजय राम... पार्वतीपते हरहर महादेव....ज्ञानदेव तुकाऽराम..."

[त्याच वेळी श्रोतृवृंदातूनच कोणी एक पिस्तूल वर छतावर रोखीत धाडधाड गोळ्या टाकतो. गलबला होतो. तेवढ्यात पिस्तुलधारी व्यक्ती उठून उभी राहाते. हीच ती पहिली घुंगटवाली कुप्रसिद्ध डाकू फुलनदेवी. घुंगट फेकून ती पुरुषी वेषात उभी राहाताच तिच्या समवेत चारपाच टोळीवालेही बंदुकी रोखून "खबरदार! चूप रहो. बैठो बैठो...." सगळे लोक भेदरून बसतात.]

**फुलनदेवी :** दिलावर, बरजोर–

**दिलावर, बरजोर :** (उठत) आज्ञा व्हावी देवीजी.

**फुलनदेवी :** इन्स्पेक्टर मेहरा आणि त्याचा कॉन्स्टेबल, यांना उचला—

**बरजोर :** थेट अस्मानात? (बंदूक रोखतो तशी–)

**मेहरा आणि शिवशंकर :** (किंचाळतात) मेलोऽ...मेलोऽऽऽ

**फुलनदेवी :** नाही हातकड्या चढवा फक्त हातकड्या! अहिंसक हातकड्या.

[दोघेही धावतात. लोकही त्यांना मदत करतात. इन्स्पेक्टर मेहरा आणि कॉन्स्टेबल शिवशंकर, दोघेही हातकड्या पडून बंदिस्त होतात. लोक टाळ्या वाजवतात. पण फुलनदेवी "खामोष! ये क्या तमाशा चल रहा है?" म्हणून दरडावते, तशी सारे चूपचाप होतात.

**फुलनदेवी :** (दरडावत) सब लोक, हॅंडस अप. हात उप्पर उठाव!

[आचार्यासकट सगळे हात वर करतात तशी–] आचार्यजी, आपण तर आमचे गुरुदेव आहात. हा हुकूम तुमच्यासाठी नव्हता.

[आचार्य वर केलेल्या हातानीच टाळ्या वाजवीत–"आनंद! आनंद! देव जागा आहे, भगवतीप्रसाद, साक्षात् महिषासुरमर्दिनी जगन्माता अवतरली आहे! धन्य धन्य माते, दाजीबा धन्य झाला!" असे उद्गारतात. मग–]

**दाजीबा :** भक्तजनहो, अमळ हाताला कष्ट होतील. पण माताजींची आज्ञा पाळा. वा वा वा ऽ! अहिंसक हातकड्या ..पाहिलंत ना, शिष्योत्तमांनो, हृदयातला ईश्वर जागा झाला की अशा नव्या संकल्पना आणि नवे शब्द जन्माला येतात. अरे बावरा–

**मेहेरा :** ( रागाने ) एकदा तरी चुकून माझं नेमकं नाव काय आहे ते म्हणा की आचार्य ! मेहेरा मेहेराऽऽऽ...

**दिलावर :** ( बंदुकीच्या दस्त्यानं ढोसत ) चूप रहो ! बत्तमीज, तुला विनोद कळत नाही ? हास....हास....( दरडावत बंदुकीची नळी डोक्यावर ठेवीत ) हसतोस की ऽऽ–

**फुलनदेवी :** सोडरे दिलावर....पोलीसवाल्यांना कधी हसणं वा रडणं ठाऊक आहे का ? साले जन्माला येताना सुद्धा गुरगुरत, आई-बापांना दमदाटी करीत येतात. थोडी चिरीमिरी दे....म्हणजे हसेल हा गद्धा. ( पोटात गुद्दा लगावत ) हास... हास....

**मेहेरा :** ( कळवळून ) हसतो....हसतो.... ( 'खो खो' करून खोटे हसतो, मग– ) ए शिवशंकर, भडव्या हास की...आयला–

**शिवशंकर :** ( पाय आपटीत, सॅल्यूट ठोकत ) अशी आर्डर द्या...म्हणजे मग हसतो साहेब. आपण 'डिशीप्लीन' मानतो. आता बघा–( श्वास घेऊन प्रचंड हसतो. मग एकदम दगडी चेहेरा करीत ) आर्डर बरहुकूम हसलो ना साहेब ?

**फुलनदेवी :** चूप बैठो. बकवास मत करो. बरजोर, दिलावर या हरामजाद्यांना बाहेर दाराशी नीट बंदोबस्तानं बसवून ठेवा. [ बरजोर, दिलावर, इन्स्पे. मेहेरा व कॉन्स्टेबल शिवशंकर याना घेऊन जातात ] ( लोकांना उद्देशून ) हात नीचे ! ( लोक हात खाली करतात. मग- ) गुरुदेव, आपण आजच्या भाषणात खरे चोर, लुटारू, डाकू कोण आहेत ते स्पष्टपणे सांगितलंत, हा आम्हा डाकू मंडळींच्यावर फार मोठा उपकार आहे. आमचे कैक डाकू बंधू आपल्याला शरण आल्याचे नाटक करतात आणि राजरोस राजकारणात पडतात. राजकीय डाकूगिरी उघडपणे करण्यात धोका अजिबात नाही, प्राप्ती भरपूर आणि शिवाय हारतुऱ्यांचा सतत वर्षाव. त्या मानाने अस्सल डाकूच्या धंद्यात आता काय उरलंय ? पोलिसांचा ससेमिरा, वनवास, पकडल्यावर फाशी नाही तर जन्मठेप आणि लोकांचे शिव्याशाप. म्हणून गुरुदेव आज मी आपल्या सगळ्या टोळीसह आपल्याला शरण यायचं ठरवलं होतं. पण मला आमच्या इतर डाकूबंधूप्रमाणे राजकीय डाकूगिरी करायची नव्हती. मी आणि माझे इमानी सहकारी अंधारात चाचपडत होतो. पण इथे येताक्षणीच आपल्या भाषणात आपण आम्हाला दिव्य आदेश दिलात. डाकूगिरीतही समाजसेवा कशी करता येईल याचा महामंत्र सांगितलात. आम्ही धन्य झालो. या क्षणापासून आम्ही तुमचे भक्त झालो. दिलावर, हार. [ दिलावर हार देतो. फुलनदेवी आचार्यांच्या गळयात हार घालते. लोक टाळ्या वाजवतात. फुलनदेवी करंगळीवर सुरी चालवून त्याचा टिळा आचार्यांना लावते, व मग स्वतःला लावते. ] दिलावर, बरजोर– [ दोघेही "जी बाईसाहेब" म्हणून अदबीनं पुढं येतात ] रामनारायण

पांडेजींच्या कोठीवर डाका घाला. पैशाला वा कोणाच्याही दागदागिन्याला हात लावू नका. घरातली सगळी माणसे पकडून दरबारात हाजीर करा. दगाफटका दिसला तर बेशक गोळी घाला. पण पांडेजी, त्यांची घरवाली आणि त्यांचा नादान पोरटा यांना धक्का लागता कामा नये.

[ "जी देवीजी" म्हणत दिलावर आणि बरजोर लगबगीने जातात. ते पाहून– ]

**दाजीबा :** अग फुलनदेवी, तुझा विचार तरी काय आहे ?

**फुलन :** ते आता प्रत्यक्षच पाहा. भगवतीप्रसाद, आतल्या दालनात झटपट लग्नाची तयारी करा.

**भगवती :** म्हणजे देवीजी...आत्ता ऽऽ इथं लग्न उरकायचं ?

**फुलन :** होय होय....ताबडतोब....तयारी करा.

**पूर्णामाई :** पण आमच्या आप्तेष्टांना, सग्यासोयऱ्याना निमंत्रण तरी पाठवायला नको का देवीजी ?

**फुलन :** तो थाटामाटाचा स्वागत समारंभ नंतर करा. प्रथम लग्न. हं हे जमलेले लोक वऱ्हाडी म्हणून अक्षता टाकतील. ( लोकांकडे पाहात, पाठीवरचा हंटर काढून फटकावीत जरबेनं– ) का ऽ य ?

[ लोक गलबल्याने "हो हो....मान्य आहे.. मान्य आहे !" म्हणतात. पूर्णामाई सरु बाळाला घेऊन जा आणि दुल्हनसारखी नटवून सजवून आणा. [ पूर्णामाई सरस्वतीला घेऊन जातात.]

**भगवती :** पण देवीजी, देण्याघेण्याचं काय ?

**फुलनदेवी :** तुम्ही किती हुंडा द्यायला तयार होता ?

**भगवती :** पंचवीस हजार.

**फुलनदेवी :** लग्नासाठी किती खर्च करणार होता ?

**भगवती :** काय....आणखी पंधरा वीस हजार.

**फुलनदेवी :** अंगावर किती तोळे सोने घालणार होता ?

**भगवती :** पंधरा तोळ्यांचे दागिने तयारच ठेवलेत. शिवाय हिऱ्याच्या कुड्या आणिक——

**फुलन :** बास बास...दागदागिने काय खुशीने द्यायचे ते मुलीच्या अंगावर चढवा. हुंड्याचे पंचवीस हजार, अधिक लग्नाच्या खर्चाचे दहा हजार, रोख रकमेत माझ्याकडे तत्काळ आणून द्या झटपट....चला ऽऽ

**भगवती :** ( लगबगीने जाऊ लागत ) तरी पण देवीजी–

**फुलन :** भगवतीप्रसाद, आजवर डाका घालताना यजमानानं 'पण' शब्द उच्चारला की फुलनदेवी–( चाबूक फटकारीत ) पाठ फोडून काढते. आता मी

अहिंसा पाळणार आहे. शक्यतोवर माझा पेशन्स बघू नका. जा....जा म्हणते नाऽऽ...गुरुदेव, आपण आज्ञा करावी.

**दाजीबा :** जा भगवती, या जगन्मातेची आज्ञा पाळ. नाही तरप हिला अहिंसक फटका तुझ्या पाठीवर पडेल.

[ भगवतीप्रसाद लगबगीने "हो....हो...." म्हणत जातात. मग फुलनदेवी हात जोडून आचार्यांना म्हणते—]

**फुलन :** गुरुदेव, लग्नासारख्या सोहोळ्याचे मला ज्ञान नाही. तेव्हा आणिक काय करायचे त्याची आज्ञा व्हावी.

**दाजीबा :** आता मला तरी लग्नाचे कुठे काय ठाऊक आहे? फुलनबाळे, मी आजन्म ब्रह्मचारी आहे. तरी पण ऐकिवात आहे की, लग्नाचा धार्मिक विधी पार पाडण्यासाठी कोणी तरी उपाध्याय म्हणजे भटजी लागतो.

**फुलन :** असंऽऽ ? मामुली बात है. ( लोकाना न्याहाळत ) ए मिशीवाला, तू... ऊठ....उठोऽऽ....[ एक मिशीवाला घाबरत उठून उभा राहतो ] तू या लग्नाचा भटजी...चलो ऽऽ...अंदर जाव.. और तयारी करो.

**मिशीवाला :** ये कैसा हो सकता है देवीजी ? मैं मुसलमान....हूँ...मिया मुहंमद झाफरुल्ला खान हूं....

**फुलन :** तो क्या हुवा ? लग्न लावण्यापुरता तुला भटजी होता येत नाही ? [ लोक गलबल्याने नाराजी दाखवतात. तशी फुलनदेवी चाबूक फटकारीत—] आवाज बंद ! [ सगळे चूपचाप. मग ] बोल तू भटजी होतोस कीऽऽ [ चाबूक फडकावते ].

**दाजीबा :** फुलन बाळ, ही सक्ती बरी नव्हे. भटजीच हवा असेल तर मी सांगतो. हा माझा शिष्योत्तम बजरंग लग्न लावून देईल. पाठशाळेत हा लहानपणी पाणी भरायला होता. काय रे बजरंगा ?

**बजरंग :** ( शड्डू मांडी थोपटत ) हा गुरुदेव...तय्यारी....होमहवन न्यूम.... न्यूम...न्यूम.. करीत मंत्रोपचार आणिक शेवटी सात फेरे...की अंतरपाट धरून....( गात—) "गंगा सिंधु सरस्वतीच यमुना गोदावरी नर्मदा ऽऽऽ" की लागलीच वाजवा रे वाजवाऽऽ की लागलीच पंगत...केळीच्या पानावर डावीकडे उजवीकडे, मसाले भात, जिलेबी, मठ्ठा...दुसरी बात नाही. ओफ्.... ( भुरका मारल्यासारखी मिटकी मारतो ).

**फुलन :** हा भटजी बरा दिसतो आचार्य. पण—

[ तेवढ्यात भगवतीप्रसाद येतात. ]

**भगवती :** देवीजी आमचे जुने उपाध्याय मछींद्रनाथ निरोपासरशी आलेत. त्यांच्या बॅगमधे रेडीमेड विवाहोपयोगी सगळी तयारी जय्यत असते. तेव्हा तो प्रश्न सुटला.

**बजरंग :** अहो निदान भोजनप्रबंध तरी माझ्याकडे सोपवा.

**भगवती :** छे छे, तुमची गरजच काय ? कोठीवरचे आमचे आचारी रांधायला लागले देखील.

**फुलन :** भगवतीप्रसाद पैसे ?

**भगवती :** हो हो घेऊन येतोच इतक्यात. ( जातात. )

**बजरंग :** गुरुदेव आता मी हो काय करायचे ?

**दाजीबा :** ( गात ) गंगा सिंधू सरस्वती च यमुना गोदावरी नर्मदा ऽऽ
कोणी यातील भेटले तुजप्रती ते रे पाहा बजरंगा ऽऽ
पार्वतीपते हरहर महादेऽव... ज्ञानदेव तुकाऽऽराम....
[ सगळे शिष्यवर साथ देतात. बजरंग मटकन् बसतो. ]

**फुलन :** आचार्य, आणिक काही आज्ञा व्हावी.

**दाजीबा :** फुलनदेवी, तुझे लग्न झाले नाही म्हणतेस, तर मग त्याचा अर्थ, दाजीबा-प्रमाणेच ब्रह्मचारिणी आहेस काय तू ?

**फुलन :** छे छे गुरुदेव.... ब्रह्मचारिणी काय म्हणून ? आमच्यात लग्न करीत नाहीत तरी प्रत्येकीला मर्द असतोच की.

**दाजीबा ;** असं का ? अरे वा ! तुझा मर्द कुठाय ?

**फुलन :** माझा मर्द तळावर खाना पकवतो आहे.

**दाजीबा :** शाब्बास ! जन हो, या फुलनदेवीचा कित्ता घरोघरी गिरवला जाईल तर स्त्रियांचे प्रश्न किती झटकन सुटतील बरं.

**फुलन :** आचार्यांची इच्छा पुरी करण्याची ही फुलन जिम्मेदारी घेतेय गुरुदेव. सरु बाळाच्या विवाहाबरोबरच तिच्या नवऱ्याला यापुढं घरात खाना पकवण्याची जबाबदारी घ्यावीच लागेल. ( चाबूक फटकारते. )

**दाजीबा :** तो घिसाडी कसला कर्माचा खाना पकवणार ?

**फुलन :** माझा मर्दही असाच नाठाळपणा करायचा आरंभी. चार दिवस पाठ फोडून काढली तेव्हा सुतासारखा सरळ आला आणि कामाला लागला.

**दाजीबा :** तुझा खाक्या सगळा औरच दिसतो. म्हणूनच दाजीबा म्हणे की तू ' असली औरत ' आहेस.

**फुलन :** मर्दाचे लाड करून त्याला डोक्यावर बसवून घेणं फुलनदेवीला मंजूर नाही गुरुदेव.
[ तेवढ्यात बंदुकी रोखलेले बरजोर आणि दिलावर आणि पुढे हात वर केलेले रामनारायण पांडे, महामायावती आणि त्यांचा पुत्र रविरंजन भयभीत होऊन येतात. तशी– ] शाब्बास पठ्ठे... बरजोर, दिलावर भली कामगिरी केलीत. बोला रामनारायणजी, इरादा काय आहे ?

**रामनारायण :** ( घाबरून ) वाचवा....फुलनदेवीजी...वाचवाऽऽ गुरुदेव वाचवाऽऽ... काय हव्वे ते देतो पण आम्हाला जित्रे मारू नका...

**फुलनदेवी :** ( चाबूक फटकारीत ) बकवास बंद ! रामनारायण तुला, तुझ्या बायकोला आणि या नालायक पोरट्याला इथं कशासाठी आणलंय ते तुला ठाऊक आहे ?

**रामनारायण :** नाही फुलनदेवी .. या राक्षसांनी तर आम्हाला भरल्या ताटावरून ओढून आणलं इथं.

**फुलन :** काही बिघडत नाही. गोरज मुहूर्तावर लग्न लागलं की मेजवानी हादडायला मिळेलच.

**रामनारायण :** गोरज मुहूर्त ? लग्न ? कोणाचं लग्न ?

**फुलन :** हात नीचे करो. ( सगळे हात खाली करतात ) गुरुदेव, या हरामखोराला सांगावं आपण, या सगळ्यांना इथं कशासाठी आणलंय ते.

**दाजीबा :** आनंद ! आनंद ! ( टाळ्या वाजवतो. ) अरे पांडे तुझ्या घरात भरलेत मोहरांचे हांडे, पण तुझ्या नावात ' राम ' आणि ' नारायण ' हे दोन्ही असून तू या महामायेच्या नादानं रिकामे लांडे कारभार करावेसे हे बरे नाही. घटकाभर मनातले मांडे खायचे थांबीव आणि तुझ्या रविरंजनच्या विवाहासाठी तयार हो पाहू.

**रामनारायण :** रविरंजनचे लग्न ? कोणाशी ? केव्हा ! कुठे ? हा प्रकार काय आहे गुरुदेव ?

**फुलन :** ( चाबूक फटकारीत ) रविरंजनचं लग्न गोरज मुहूर्तावर आत्ता लागणार आहे भगवतीप्रसादांच्या मुलीबरोबर.

**रामनारायण :** देण्याघेण्याचा व्यवहार ठरला म्हणजे मग आमची तशी काहीच हरकत नाही.

**फुलन :** देण्याघेण्याचा व्यवहार तू रे कोण ठरवणार ? तुझा मुलगा सरस्वतीबरोबर प्रेमाच्या आणाभाका घेत होता तेव्हा तू काय करीत होतास ? ( चाबकाचा फटकारा ओढते तशी– )

**रामनारायण** ( किंचाळत ) ओय....ओय...म...म....मी मी...

**फुलन :** ( दरडावीत ) चूप ! काय रे पोरा, लग्नाला मुकाट्यानं कबूल होतोस की–

**रविरंजन :** ( घाबरून ) न....न...नको नको....म....ममी कबूल आहे.

**फुलन :** उत्तम. बजरंगा, याला घेऊन जा. नवऱ्या मुलासारखा नटवून सजवून तयार ठेव....

**महामायावती :** पण म्हणजे काऽय ? तुम्ही जबरदस्तीनं लग्न लावणार आहा की काय आमच्या मुलाचं ?

**फुलन :** नाही. अगदी तुमच्या खुषीनं. ( चाबकाचा फटकारा तिला मारीत ) खुषी आहे की नाही तुझी ? बोल, खुषी आहे की– [ महामायावती “ मेले ग बाई मेले... ” किंचाळते तशी– ] मरायला पुष्कळ अवकाश आहे तुला. आधी खुषीची बात ऐकायची मला.

**रामनारायण :** हो हो...फुलनदेवी...आमची खुषी आहे. अगं आत्तापुरतं “ हो ” म्हणायला काय जातंय तुझं ?

**फुलन :** ( फटकारा देत ) आत्तापुरतं काय ? बत्तमीज—लग्न झाल्यावर तसा सोडणार नाहीये मी तुला. माझी माणसं टेहळणीवर तुझ्या घरी राहातील. सरु बाळाचे पाठीराखे म्हणून....तुझा पाहुणचार घेत. मुलीला जर कोणी त्रास दिला तर याद राखा, महामाये तुझं नाक कान कापीन, रामनारायण तुझे हातपाय छाटीन–

**रामनारायण :** ( भेदरून ) न.. नाही... नाही.... आम्ही काही त्रास देणार नाही तिला.

**महामाया :** ( भेदरून ) म....माझं देखील काही नाही हो ऽ .

**फुलन :** तर मग मी सांगते त्याप्रमाणं म्हणा. ( फुलनदेवी सांगते त्याप्रमाणे रामनारायण आणि महामायावती शपथ घेतात.) गुरुदेवांच्या पायावर हात ठेवून म्हणा. ( दोघेही आचार्यांच्या पायावर हात ठेवून, फुलनदेवीच्या पाठोपाठ म्हणतात ) आम्ही शपथपूर्वक सांगतो की, भगवतीप्रसादांची कन्या चिरंजीव सौभाग्यकांक्षिणी सरस्वती, आमच्या रविरंजनला पत्नी म्हणून आम्ही खुषीनं स्वीकारतो आहोत. त्यासाठी भगवतीप्रसाद देतील ती वरदक्षिणा आणि मानपनादी खर्च आम्ही आनंदाने घेऊ.

**रामनारायण :** म्हणजे काही तरी देतील ना ते ?

**फुलन :** देतील देतील. ( हाकारत ) भगवतीप्रसाद, वरदक्षिणेची रक्कम ? भगवतीप्रसाद एका चांदीच्या तबकात नोटांच्या चवडी लावून वर रेशमी वस्त्र पांघरून घेऊन येतात, तशी– ] किती रक्कम ठेवली आहेस या तबकात ?

**भगवती :** हुंड्याचे पंचवीस हजार, मानपानाचे दहा हजार शिवाय बाकीचा खर्च करीत आहोतच.

**महामायावती :** आणि दागिन्याचं काय ?

**फुलन :** अरे बरजोर, दिलावर, या महामायेचे सगळे दागिने उतरवा आणि सरस्वतीला द्या.

**भगवती :** नको नको....फुलनदेवी, तिचे दागिने आम्ही वेगळे तयार ठेवलेत. या बाईचे दागिने राहू द्या त्यांच्यापाशी.

**फुलन :** ठीक आहे. भगवतीप्रसाद, केवळ तू म्हणालास म्हणून सोडते या महामायेला मी. नाहीतर लंकेची पार्वतीच करून सोडणार होते या बयेला मी.

**भगवती :** लग्नाची सिद्धता झालीय सगळी, फुलनदेवी.

**फुलन :** तर मग आशीर्वादासाठी वधूवरांना अगोदर घेऊन या इकडं. गुरुदेवांना वंदन केल्यावरच लग्न लागेल.

**भगवती :** हो हो घेऊन येतो–( जाऊ लागतो तोच )

**रामनारायण :** हुंड्याची आणि मानपानाची रक्कम घेऊ का ताब्यात अमळ मोजून ? नाही म्हणजे तुमची परवानगी असेल....

**फुलन :** थांब. तो सगळा व्यवहार अजून पुरा व्हायचाय. भगवतीप्रसाद, ते तबक राहू दे इथं. तू वधूवरांना आण. [ भगवतीप्रसाद जातात. ] मग रामनारायण महामायावतीदेवी, ही हुंड्याची पंचवीस हजार रक्कम आणि मानपानासाठी दहा हजार रुपये म्हणजेऽऽ तुमच्या इतमामाचा आणि अपेक्षेचा विचार करता फारच छोटी आहे, नाही का ?

**रामनारायण :** छोटी ? अहो अगदी क्षुद्र.... क:पदार्थ आहे. आमचे सगेसोयरे शेण घालतील आमच्या तोंडात, हे कळल्यावर.

**महामायावती :** मला तर बाहेर कुठं तोंड काढायची सोय नाही राहणार हे लग्न झाल्यावर.

**फुलन :** तुमच्या सग्यासोयऱ्यांची चिंता करू नका. त्यांच्या घरातल्या मुलांचे विवाह मी याच पद्धतीनं उरकून टाकणार आहे. पण ही रक्कम म्हणजे तुमच्या दृष्टीनं किस झाडकी पत्ती आहे हे मला कबूल आहे. तेव्हा मी असं सुचवते की, या क्षुद्र रकमेला तुम्ही मुळीच स्पर्श करू नका.

**रामनारायण :** आंऽ ? तसं म्हणजेऽ–

**महामायावती :** नाही नाही, आमच्या म्हणण्याचा अर्थ तसा नव्हता. आहे त्या रकमेत आम्ही भागवून घेऊ.

**फुलन :** छे छे, अशी भागवाभागवी तुम्हाला मुळीच शोभत नाही. या रकमेकडं तुम्ही ढुंकूनसुद्धा बघू नका.

**रामनारायण :** नाही हो फुलनदेवी, तशी ही रक्कम काही अगदीच लहान सहान नाही–

**महामायावती :** पंचवीस अधिक दहा हजार म्हणजे तसे थोडे का झाले ? पस्तीस तर पस्तीस.... द्या ते इकडे.

**फुलन :** तसे सगळेच्या सगळे पस्तीस हजार नाही मिळायचे. लग्न जुळवून सुखरूप पार पडल्याबद्दल आमची बिदागी ?

**रामनारायण :** तीही आम्हीच द्यायची !

**फुलन :** मुलगी तुमच्या घरी जायची म्हणजे बिदागी तुम्हीच दिली पाहिजे.

**महामाया :** मी म्हणते काय दोन तीन हजार हवे असतील तेवढे देऊन टाकावेत. तेवढ्यासाठी हुज्जत कशाला घालायची ?

**फुलनदेवी :** माझी दक्षिणा दहा हजार रुपये. त्यात अधिक मिळवा टोळीतल्या प्रत्येकाचा मेहेनताना एकूण बारा हजार म्हणजे झाले बावीस हजार—

**रामनारायण :** बावीस हजाऽऽर ?

**फुलन :** तेवढ्यानं झालं नाही. त्यात ओव्हर टाईमचा भत्ता सात हजार रुपये. शिवाय टी. ए डी. ए. मिळून तीन हजार—

**रामनारायण :** डाके घालणाऱ्यानासुद्धा ओव्हर टाईम आणि टी. ए. डी. ए. द्यावा लागतो ?

**फुलन :** तेवढ्यानं काय झालंय ? सगळ्या डाकूंच्या टोळ्यांचं युनियन स्थापन झालंय. प्रत्येक पर्मनंट डाकूला ग्रॅच्युइटी, पेन्शन, संकटकालीन भत्ता मिळावा यासाठी विधान सभेवर मोर्चा निघणार आहे लवकरच.

**महामाया :** थोडक्यात, यातली तुम्ही दिडकीसुद्धा हाताला लागू देणार नाही आमच्या.

**फुलन :** असं नाही. हे एक हजार ठेवून घ्या तुम्ही. बरजोर उरलेली ही सगळी रक्कम या तबकासुद्धा तिजोरीत नेऊन टाक आमच्या.

**रामनारायण :** या एक हजारानं काय होणार आहे फुलनदेवी ?

**महामाया :** उद्या आमच्या मुलीचं, कमलाचं लग्न काढलं तर लाख दोन लाखाचा खड्डा भरावा लागणार आहे

**फुलन :** तुमच्या मुलीसाठी स्थळ पाहून ठेवलंय का तुम्ही ?

**रामनारायण :** इन्स्पेक्टर मेहेरांचा मुलगा डॉ. बिपीनकुमार आमच्या मनात भरला होता. पण ते बडे पोलीस अधिकारी. त्यांची म्हणजे कुठल्या कुठे उडी. ते स्थळ कसचं मिळतंय आम्हाला ?

**महामाया :** या कारस्थाच्या लग्नात चार पैसे मिळतील त्यात भर घालून मुलीला उजवावं असं म्हणत होतो आम्ह , पण—

**फुलन :** त्यात काय, अजूनही उजवता येईल तिला. आज इथल्या इथं...बोला उडवायचा का बार ?

**रामनारायण :** ते कसं शक्य आहे फुलनदेवी ? आम्ही एक तुमच्या दमदाटीला नमलो. इन्स्पेक्टर मेहेरासाहेब म्हणजे बडे पोलीस अधिकारी. ते तुम्हाला थोडीच भीक घालताहेत ?

**फुलन :** बघायचीय का तुम्हाला गंमत ? बरजोर, कुठं आहे रे तो साला इन्स्पेक्टर मेहेरा ?

**बरजोर :** सरकार, निःशस्त्र करून आणि हातकड्या चढवून बाहेर भिंतीकडं तोंड करून उभा करून ठेवलाय त्याला.

**फुलन :** हातकड्या काढून नीट बंदोबस्तानं घेऊन ये त्याला. [ बरजोर जातो ] ( हंटर टाकीत ) दिलावर रामपुरी दे. ( दिलावर कमरेचा लखलखीत रामपुरी

सुरा काढून देतो. तो घेत ) घाबरू नका मंडळी, हे सगळं अगदी अहिंसक मार्गानं जमवणार आहे मी. आचार्य, मी म्हणते या मेहेराच्या पोरट्याचं लग्न, कार्यात कार्य म्हणून याच घडीला उरकून टाकू या. आपली संमती आहे ना ?

**दाजीबा :** फुलन, बेटी तू तर ही अहिंसक शस्त्रक्रियाच चालवली आहेस आपल्या समाजावर. मी नेहमी सांगत असतो त्याप्रमाणे ही एक भली गोष्ट आहे. दाजीबा म्हणे ( गातो ) जरी वरकरणी दिसतो हा राक्षस विवाह। तरी तो आहे ' अहिंसक सत्याग्रही विवाह.' तू आता शरण आलीच आहेस तर बेटी, तुझ्या ' टोळीची ' ' मंडळी ' करून टाक. ' अहिंसक सत्याग्रही विवाह मंडळी.' सगळी धनदौलत, पैसा अडका या मंडळीच्या तिजोरीत घाल म्हणजे पापाचे क्षालन होईल. दाजीबा म्हणे ' वेचावे धन कशाही व्यवहारे। मंडळीस अर्पावे थोरपणे। येणे उपचारे पापाचा होई निचरा। वरपित्यांचा कचरा ठामपणे। बोला पुंडलीकवर्दे हा ऽ री विठ्ठल... ज्ञानदेव तुकाऽ राम !

[ लोक साथ देऊन गजर करतात. तेवढ्यात बरजोर, इन्स्पेक्टर मेहेराला घेऊन येतो. ]

**मेहेरा :** ज्या अर्थी माझ्या हातकड्या काढून मला इथं हा माणूस घेऊन आलाय, त्या अर्थी आचार्य, ही फुलनदेवी तुम्हाला शरण आलेली दिसतेय. तर मग आचार्य तिला आणि तिच्या साथीदारांना अटक करून मी घेऊन जाऊ ठाण्यावर ?

**दाजीबा :** अरे बैजू बावरा.

**मेहेरा :** मेहेरा मेहरा...

**दाजीबा :** तेच ते. अरे, तुझा वा शासनाचा संबंध काय ? फुलनदेवी मला शरण आली, तिचं मी पुनर्वसन केले. मामला संपला. यापुढं ती एका अहिंसक सत्याग्रही विवाह–मंडळाची संचालिका म्हणून काम करणार आहे, समजलास ?

**मेहेरा :** असं कसं करता येईल आचार्य ? शासन ते मान्य करणार नाही. मला अशी सक्त ऑर्डर आहे की–

**आचार्यदाजीबा :** तुझी ऑर्डर ठेव तुझ्या बॉर्डरमधे. कपडे बदलून अगोदर विवाह समारंभसाठी तयार हो पाहू. भगवतीप्रसादांची कन्या आणि रामनारायणजींचा मुलगा यांचा विवाह होतोय आज.

**रामनारायण :** पाठोपाठ जेवायची पंगत देखील बसणार आहे. लाडू आहेत लाडू. चला चला, अगोदर कपडे बदला. दुपारपासून भुके आहात तुम्ही.

**मेहेरा :** ते खरंय. पोटात अन्नाचा कण नाही दुपारपासून.

**दाजीबा :** अरे अरे अरे ! तर मग या चावराला लग्नाचे लाडू खायला घाला आणि त्याचा गड्डू करून परत पाठवा.

**मेहेरा :** अहो पण त्यासाठी हा युनीफॉर्म कशाला उतरायला हवा ?

**रामनारायण :** असं कसं? असं कसं? लग्न समारंभात तुम्ही प्रमुख वऱ्हाडी म्हणून उभे राहणार तर तुमची वेशभूषा प्रसंगाला साजेशी नको?

[ तेवढ्यात भगवतीप्रसाद मुंडोळ्या लावून नटून थटून आलेल्या वधूवरांना घेऊन येतात. दोघेही सगळ्या वडीलधाऱ्यांना आशीर्वादासाठी वंदन करतात. ]

**दाजीबा :** भगवतीप्रसाद, या बैजू-बावराला प्रसंगाला साजेलसा तुझ्या ठेवणीतला एक पोशाख दे बरं.

**मेहेरा :** अहो त्याची खरोखरीच काही गरज नाही.

**फुलन :** दिलावर, बरजोर घेऊन चला मेहेरासाहेबाना आत आणि ते 'नको नको' म्हणाले तरी पोशाख बदलून टाका त्यांचा.

[ मेहेरा "अरे पण....अहो पण...." असे काही नाराजीने म्हणत असतानाच बरजोर, दिलावर त्यांना घेऊन जातात. मग ]

**भगवती :** हा काय प्रकार आहे आचार्य?

**दाजीबा :** कार्यात दुसरे कार्य. ( गातो ) हा मेहेरा होतोय रामनारायणजींच्या मुलीचा सासरा। म्हणून त्या नाठाळाच्या गळ्यात बांधताहेत हा कासरा.

**भगवती :** आच्छाऽ! असं आहे होय? अहो पण——

**फुलन :** बोलू नका. मेहेराला पोशाख देऊन नटवा अगोदर.

[ भगवतीप्रसाद वधूवरांना घेऊन जातात ] महामायावती घरी जा आणि झटपट तुमच्या कन्येला दुल्हन करून घेऊन या.

**महामाया :** ही आत्ता घेऊन येते. पण देण्याघेण्याचं काय?

**फुलनदेवी :** तुम्ही दिडकी द्यायची गरज नाही. या मेहेराकडूनच मी माझी सगळी फी, कार्याचा खर्च, मेहनताना, ओव्हर टाईम, टी. ए. डी. ए. चापून वसूल करणार आहे. आजवर लोकांच्या जिवावर रगड चर चर चरलाय तो. तुम्ही चला.

**रामनारायण :** नुसती कमल आणि एक नारळ घेऊन या. दागदागिनेसुद्धा नको.

[ महामाया जाते ] फुलनदेवी आता काय काय करायचं?

**फुलनदेवी :** मेहेराच्या घरी आणि डॉ. बिपीनकुमारच्या दवाखान्यात फोन लावा. दोन्हीकडे कळवा की मेहेराला हार्ट ॲटॅक आलाय, असाल तसे ताबडतोब या. [ रामनारायण पळतात. तेवढ्यात बाहेर बॅंड वाजायला लागतो, तशी ] आचार्य, बाहेर बॅंडवाले सुद्धा आले बरं का आमचे.

**दाजीबा :** तुमचे म्हणजे?

**फुलनदेवी :** माझे सगळे साथीदार डाकू बॅंडवाले म्हणून फावल्या वेळात काम करत असत. ते आज नेमके उपयोगी पडले. बॅंड परी बॅंड झाला शिवाय कोणी दगा-फटका करायचा प्रयत्न केला तर त्याला खतम् करायची परस्पर व्यवस्था.

तसा प्रसंग यायचा नाही. पण ही माझी सुरक्षा व्यवस्था. तर लोकहो, सगळा प्रकार तुम्ही पाहाताच आहात. ज्यांच्या मुलींची लग्नं व्हायची आहेत, त्यांची सुपारी घ्यायला आमचं अहिंसक सत्याग्रही विवाह मंडळ तयार आहे. तुम्ही फक्त हव्या त्या वरपक्षाची माहिती द्यायची आणि आमच्या निरोपाची वाट बघायची. पुढची जिम्मेदारी आमची. गुरुदेव एका वर्षात शहरातल्या सगळ्या उपवर तरुण पोरांचा असा फडशा पाडून टाकते की तुम्ही बघतच राहाल. लग्नाचा एक बाप्या शिल्लक ठेवणार नाही मी.

[ तेवढ्यात आतून सुरवार, अचकन, फेटा अशा थाटात नटलेला मेहेरा " कशा....कशाला उगीच...हे हे सगळं करताय " असं म्हणत रामनारायण व भगवतीप्रसादांच्या समवेत येतो. पाठीशी बरजोर आणि दिलावर आहेतच.]

**फुलन :** मेहेरासाहेब, तुमची ही वेशभूषा काही वाया जायची नाहीये. आपले चिरंजीव डॉ. बिपीनकुमार यांचा आज इथंच विवाह व्हायचाय.

**मेहेरा :** ( थक्क होत ) आं ऽ ? विवाह ? बिपीनचा ? कसं शक्य आहे ?

**फुलन :** ते सगळं ठरलंय. तुम्ही निमूटपणे संमती द्यावी हे बरं. नाही तर ठाण्यावर डाकूंना तुम्ही ज्या मार्गानं ठीक करता तोच मार्ग तुम्हाला दाखवू.

**मेहेरा :** अरे पण कोणाशी ? कोणाशी ठरवलंय बिपीनचं लग्न ?

( तेवढ्यात महामायावती कमलला दुल्हनसारखी नटवून घेऊन येते.]

**फुलन :** ही तुमची भावी सून. नमस्कार कर बाळ.

[ ती नमस्कारासाठी वाकते. तशी—]

**मेहेरा :** म...मला हे मान्य नाही. मी मी हे कधीच कबूल करणार नाही... मी मी मी—

**फुलन :** ( त्याच्या गळयाला रामपुरी सुरा लावीत ) आशीर्वाद दो....बकवास बंद....फक्त आशीर्वाद....

**मेहेरा :** ( ओरडत ) ओ....ओय....देतो देतो आशीर्वाद आहे.

**फुलन :** महामायावती, मुलीला घेऊन आत जा. इतक्यात जावईबापू आणि विहीणबाई येतीलच. ( त्या दोघी जातात ).

**मेहेरा :** अरे पण आहे काय प्रकार ? कोणी कधी ठरवलं हे लग्न ? देण्याघेण्याचं काय ?

**फुलन :** देण्याचा प्रश्नच नाही. घेणं सवडीनं वसूल करीन मी तुझ्याकडून.

**मेहेरा :** कसलं घेणं ? एक पैसा द्यायचा नाही मी कुणाला. सक्तीनं लग्न लावाल तर मुलीला घराची पायरी चढू देणार नाही मी. बजावून ठेवतोय.

**फुलन :** ते सगळं होऊन जाईल, मेहरा. लग्नकार्य आटोपताच तुला नेण्यात येईल आमच्या तळावर. एका गुहेत.

**मेहेरा :** गुहेत ? गुहेत कशासाठी ?

**फुलन** : ओलीस म्हणून. माझी सगळी फी, मेहेनताना, भत्ता, ओव्हरटाईम, टी. ए. डी. ए. वगैरे रक्कम वसूल झाली आणि मुलीला सासरी प्रेमानं वागवतात याची पावती मिळाली म्हणजे तुझ्या सुटकेचा विचार करू. दिलावर, या मेहेराला बंदोबस्तानं घेऊन जा आणि एका जागी बसवून ठेव. पोलीसवाला आहे. गडबड करायला लागला तर—

**दिलावर** : गळाच कापतो.

**फुलन** : गळा नकोस कापू. आपण अहिंसक आहोत. फक्त एक कान कापून हातात दे त्याच्या. मलमपट्टीही तयार ठेव. जा. [ " अरे पण.. अरे अरे ऽ... " असे मेहेरा ओरडत असतानाच त्याला दिलावर व दोघे तिघे लोक घेऊन जातात. त्याच्या पाठोपाठच सौ. मेहेरा गडबडीनं " काय झालं ? कुठं आहेत हे ? " विचारीत येतात. तशी— ] घाबरू नका बाई. आत इन्स्पेक्टर मेहेराना निजवून ठेवलंय. भगवतीप्रसाद, पूर्णामाई घेऊन चला सौभाग्यवती मेहेरांना.

[ भगवतीप्रसाद व पूर्णामाई सौ. मेहेराना धरून नेतात. दरम्यान लाऊड स्पीकरवर रेकॉर्डस लागल्या आहेत. तेवढ्यात गडबडीने घाबऱ्या घाबऱ्या डॉ. बिपीनकुमार बॅग घेऊन येतात. ]

**रामनारायण** : वेळेवर आलात डॉ. बिपीनकुमार. तुमच्यासाठीच सगळे खोळंबलेत.

**डॉ. बिपीनकुमार** : चला चला, कुठं आहेत डॅडी— ?

**रामनारायण** : घाबरायचं कारण नाही. आधी बूट तर काढाल ?

**बिपीन** : बूट कशाला काढायला हवेत ? राहू देत.

**फुलन** : ' राहू देत ' काय ? आत सोवळ्याचा कारभार आहे सगळा. काढा काढा बूट....

**बिपीन** : ( बूट काढीत ) इथे लग्न वगैरे आहे का आज कोणाचं ?

**रामनारायण** : आत चला म्हणजे समजेल सगळं.

[ बूट काढून बॅग घेऊन डॉक्टर रामनारायणजींच्या आणि फुलनदेवीच्या बरोबर आत जातात. थोड्या वेळाने आत गलका उसळतो. लाऊड स्पीकर-वर त्याच वेळी " जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा " ही रेकॉर्ड लागते. क्षणार्धात " नाही....नाही....मी नाही लग्नाला उभा राहायचा " असे किंचाळत आरडत ओरडत मंडोळ्या बांधलेला बिपीनकुमार धावत बाहेर येतो. " पकडो...पकडो... " करीत लोकच त्याला पकडतात. फुलनदेवी पिस्तूल काढून येते. छतावर धाड धाड गोळ्या मारते आणि कडाडते " नाही ' म्हणजे काय ? गोळी घालून मी तुला ठार करीन. मी फुलनदेवी आहे. माझ्याशी मिजाशी करू नकोस. चलो ऽऽ वापस चलो ऽ " असे म्हणत पिस्तुलाची नळी त्याच्या कानावर ठेवते. भेदरलेला बिपीन " येतो....येतो...

म....म....म...माझं काही नाही...काही नाही...." म्हणत आत जातो. मग फुलनदेवी हसून आचार्यांना म्हणते...." पाहिलंत ना गुरुदेव, सगळा कसा अहिंसक सत्याग्रह आहे. दुसरं तिसरं काही नाही. वधुवरांना आशीर्वाद द्यायला आपण आणि सर्व मंडळींनी आत चलावं." आचार्य दाजीबा—" धन्य धन्य, फुलनदेवी तू धन्य आहेस " म्हणत उठतात. लोकही उठतात. आत मंगलाष्टकं सुरू होतात. क्षणभरातच बँडचा धडाका सुरू होतो. अंधार होतो.

क्षणमात्रच. क्षणभराने सर्वत्र सामसूम आणि एक प्रकाशझोत पडतो एका रेडिओवर.

रेडियोतून निवेदक :-थांबा ऽ ! शासनातर्फे एक विशेष महत्त्वाचे निवेदन करण्यात येत आहे—सावधान.

नागरिकांना सक्त ताकीद देण्यात येत आहे की त्यांनी आपापल्या घरातल्या तरण्याताठ्या अविवाहित मुलांना—पुन्हा ऐका, अविवाहित मुलांना, नीट पुन्हा ऐका, मुलींना नव्हे, मुलांना, एकटे दुकटे घराबाहेर जाऊ देऊ नये. रस्त्यावर, कॉलेजात, बागेत, सिनेमानाटकासाठी कोठेही तरुण अविवाहित पुरुषांना एकट्याने जाऊ देण्यात धोका आहे. घरातसुद्धा प्रौढ विवाहितांचा पहारा सतत त्यांच्याभोवती ठेवा. अविवाहित तरुणांना पकडून आणि पळवून नेऊन, त्यांची जबरदस्तीने लग्ने लावण्यात येत आहेत. बहुसंख्य वधु पित्यांचे या प्रकाराला प्रोत्साहन मिळत असल्यामुळे तरुणांना पळवून नेणाऱ्या टोळीचा शासनाला सुगावा लागत नाही वा बंदोबस्तही करता येणे कठीण झाले आहे. जिवाच्या भयामुळे, लग्नानंतरही कोणी नवविवाहित नवरे वा त्यांचे आईबाप तक्रार करण्यास धजावत नाहीत. सबब वयात आलेल्या तरुणांनीच स्वतःला संभाळून घरी राहावे वा साथ सोबत घेऊनच दिवसाउजेडी बाहेर येणे जाणे करावे, हे त्यांच्या हिताचे आहे. निवेदन संपले. आता ऐका सुगम संगीत.

[ पाठोपाठ रेडिओवरच गाणे लागते—" जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी राहा...." आणि त्याच वेळी—पडदा ]

❋ ❋

# अंधेर नगरीत चौकशी : फाशीची

[ पुनश्च अंधेर नगरी ! अलीकडे अंधेर नगरी, साखरसम्राट पुंजादादा झेंडेपाटील, त्यांचा सहकारी साखर कारखाना, त्यातली राजकारणे, मारामाऱ्या, निवडणुका आणि भ्रष्टाचार यामुळे सर्वत्र गाजत असली तरी अंधेर नगरीचा प्राचीन इतिहास आणि परंपरा काही वेगळ्याच वैभवाची साक्ष देतात. प्राचीन काळी अंधेर नगरी विख्यात होती ती इथल्या न्यायदानाबद्दल. 'अंधेर नगरीतला न्याय' त्या काळी खुद्द रामशास्त्रीदेखील परमपूज्य मानीत असत. हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टातही आज अंधेर नगरीतले न्यायनिवाडे वकील मंडळी मोठ्या अदबीने उल्लेखीत असतात. 'चोर सोडून संन्याशाला सुळी' ही म्हण ज्या न्यायनिवाड्यामुळे प्राचीन काळी प्रचारात आली, तो चोर, तो संन्याशी आणि असा लोकोत्तर न्याय देणारा न्यायी राजा याच अंधेर नगरीचे नाव उज्ज्वल करून गेले. माननीय पुंजादादा हे त्याच नृपश्रेष्ठाचे आजचे वंशज. पूर्वजांच्या परंपरेला स्मरूनच ते आजकाल नगरीत न्यायनिवाडे करीत असतात. आपल्या एका बंधुतुल्य चोरासाठी ज्या संन्याशीबाबाने सुळाला कवटाळले, त्याचे स्मारक म्हणून गावकऱ्यानी हे 'संन्याशी न्यायालय' स्थापन केले आहे. या न्यायभवनात न्यायाधीशांच्या आसनामागे संन्याशीबोवांचे मोठे तैलचित्र लावले असून, पुढे आरोपींचा पिंजरा आणि फिर्यादींची आसने मांडली आहेत.

अशा या न्यायभवनात आज खास न्याय सभा भरली आहे. न्यायाला मदत करण्यासाठी पंच म्हणून पाटील साहेबराव, सरपंच भुईटे, हेडमास्तर गिरमे, खासदार आक्काताई मोगल आणि पुराणिक हरीहरेश्वर शास्त्रीबोवा न्यायासनाच्या डाव्या उजव्या बाजूला बसले आहेत. आरोपींच्या पिंजऱ्यात म्हातारा फकीरा, त्याचा तरुण मुलगा दंगल, आणि धाकटा मुलगा बिऱ्या बसले आहेत. तर फिर्यादींच्या बाकावर ट्रक ड्रायव्हर जगन्नाथ, क्लिनर कृष्णा आणि वनरक्षक हिंमतबहाद्दर बसले आहेत. आरोपींच्या मागे फौजदार धटींगण उभे आहेत. दोन कॉन्स्टेबल डोईफोडे आणि तूपलोंढे उभे राहून गुन्हेगारांवर नजर ठेवताहेत. मधून मधून दमदाटीही करताहेत. वकील लुकतुके आरोपी नि फिर्यादी यांच्याशी आळीपाळीने जाऊन बातचित करतानाच रंगमंच उजळतो. पंचमंडळी पान जमवीत, तपकीर ठाशीत नाही तर मोठ्या जांभया देत आपसात त्रस्त होऊन कुजबूज करताना दिसतात. अखेर–]

**गिरमे** : ( घड्याळात बघत ) अहो साहेबराव, अहो भुईटे साहेब, बुडाला काटे फुटायची वेळ आली.. किती वेळ तिष्ठत बसायचं आम्ही ?

**साहेबराव** : गिरमे मास्तर, न्यायदानाचं काम आहे हे. काट्याचा निवडुंग झाला

तरी वाट पाहायलाच हवी. पुंजादादा आल्याशिवाय कोर्टाचं काम कसं सुरू होईल ?

**भुईटे :** तर काय ? अंधेर नगरीतलं कोर्ट आहे हे. पुंजादादांशिवाय न्यायाधीशाच्या आसनावर बसणारा कोणी बदली न्यायाधीश आहे का या गावात ? बसा मुकाट्यानं.

**गिरमे :** आनंद आहे ! बसायला काही नाही म्हणा ऽऽ... बसलोच आहोत की. तिकडं माझ्या माघारी शाळेत कारट्यांनी बाजा केला म्हणजे पुंजादादा पुन्हा उखडणार आमच्यावरच.

**भाक्राताई :** गिरमे मास्तर, तुम्ही शाळेत असलात अगर नसलात, तरी तेवढ्यानं कधी फरक पडलाय का ? बाजा व्हायचा तो होतोच.

**शास्त्रीबोवा :** त्यांचं ठीक आहे हो; पण आम्हाला चार घरी एकादष्ण्या उरकायच्या आहेत, हे कोर्ट संपल्यावर. इथं तर भलताच गंभीर मामला दिसतोय. आज काही अन्न ग्रहण वेळेवर घडेल असं——

[ तोच " आले आलेऽऽ " असा गलबला उसळतो. तशी दचकून मंडळी उठून उभी राहातात. साहेबराव आणि भुईटे लगबगीने बाहेर धावतात.क्षणभराने त्यांच्यासह पुंजादादा आणि पाठोपाठ आचार्य दाजीबा येतात. येता येता— ]

**पुजादादा :** नमस्ते . नमस्ते मंडळी....काय लई टायेम झाला नाही ना ?

**भुईटे :** छे छे पुंजादादा तुम्ही अगदी टाइमात आलात.

**साहेबराव :** आणि झाला थोडासा उशीर म्हणून बिघडलं काय ? न्यायाचं काम आहे हे. पद्धतशीरच व्हायला हवं.

**पुंजादादा :** या या....आचार्य दाजीबा, असे इकडं वर या...या गादीवर निचिंतीनं टेका.

**दाजीबा :** ( सभोवार बघत ) दाजीबाला गादी नको, मादी नको, बसायला लादी हवी लादी. ( जमिनीवर बसकण मारतात. )

**भुईटे :** थांबा, थांबा आचार्य. झाडून तरी घेतो फरशी. खाली धूळ आहे.

**दाजीबा :** धूळ म्हणजे सूळ तर नव्हे ? अरे बालकांनो, धूळ म्हणजे ब्रह्मांडाचं मूळ.. तुम्ही खुशाल म्हणा त्याला खूळ. ( गातो ) दाजीबा म्हणे संग करावा सदा जमिनीशी । रंग करू नये कामिनीशी.

( सगळे ' वा वा ' करून दाद देतात.)

**पुंजादादा :** जाऊ दे.... त्यांना बसू दे बसायचं तिथं. आज मुद्दाम त्यांना बोलावून घेतलंय आम्ही. अंधेर नगरीत न्यायनिवाडा कसा चालतो ते पाहायला. काय रावसाहेब... राज्याचा कारभार काय म्हणतोय ? तुम्ही आपल्या गावचे पाटील——

**साहेबराव :** झ्याक चाललाय दादा.

**भुईटे** : आबादी आबाद आहे सगळीकडं.

**पुंजादादा** : काय आक्काताई, फार दिवसात पार्टी झाली नाही तुमच्या वाड्यावर. काही तरी काढा की—सणफीण...

**आक्काताई** : इश्य, त्यासाठी सण कशाला हवा ! तुम्ही दिवस ठरवा आणि मला कळवा. परसातली चार कोंबडी उचलायची नि कापायची, आहे काय त्यात ?

**पुंजादादा** : अरे अरे.... इथं दाजीबा बसलेत, शास्त्रीबोवा बसलेत त्यांच्यासमोर तरी कापाकापीची भाषा काढू नका.

**दाजीबा** : ( खांद्यावरील पिशवीतून कापूस व टकळी काढून सूतकताई करू लागत ) कोंबडा खाई तो होई चोंबडा, बायकात पुरुष लांबोडा.

( सगळे उगाचंच हसतात.)

**शास्त्रीबोवा** : आता आम्हाला सगळ्याची सवय झालीय. आम्ही मारे सोवळं ओवळं करून नाचलो तरी आमची कारटी ऐकताहेत का ? तुम्ही निदान श्रावण तरी पाळता. आमचा पोरगा श्रावणातल्या सोमवारीसुद्धा मासळी आणून हादडतो.

**पुंजादादा** : काय गिरमे मास्तर, शाळंचं कसं चाललंय ?

**गिरमे** : आनंद आहे...आनंद आहे.

**पुंजादादा** : नाही, तुम्हाला सदाचाच आनंद आहे. पण बोर्डाच्या परीक्षेला बरीच पोरं नापास झाली म्हणे आपल्या शाळेतली ?

**गिरमे** : ते आपल्या हाती आहे थोडंच ? तो बोर्डाचा कारभार. पण दहावीपर्यंत एक पोरगा नापास होत नाही आपल्या शाळेत. दादा, आपल्या अंधेर नगरी-तल्या मास्तरांना बोर्डाच्या परीक्षेला परीक्षक नेमण्याची खटपट करा एकदा. तिथं एकदा आपली माणसं घुसली की सगळा आनंद !

**पुंजादादा** : बघू बघू. सेशनच्यावेळी मुख्यमंत्र्यांशी बोलून ठेवतो. काय फौजदार धटींगणसाहेब, कोर्टाला काय काम काढलंय आज ? काही भानगडीचं प्रकरण नाही ना आणलंत ?

**धटींगण** : ( सॅल्यूट करीत ) छे छे....अगदी स्वच्छ गुन्हा आहे एक साहेब, आपल्या इन्स्ट्रक्शनप्रमाणं आमदार—खासदार वगळले. पुढाऱ्यांच्याकडं डोळे-झाक केली. अधिकारी मंडळी बाजूला सारली. पैकेवाल्यांना सूट दिली. राहाता राहिलं अंधेर नगरीतलं भिकार. त्यातला एक गुन्हा पकडून आणलाय.

**पुंजादादा** : कोणता गुन्हा पकडलास बाबा ?

**धटींगण** : बलात्काराचा आणि खुनाचा.

**पुंजादादा** : अरतिच्या मारी. बलात्कार आणि वर खून. म्हणजे फाशी आलीय की. कोणी कोणावर बलात्कार केला ? कोणाचा खून झाला ?

**दाजीबा** : ( वर पाहात ) अरे वा. बलात्कार म्हणजे चमत्कारच की, भोगाभोगात-

सुद्धा रुचिभेद असतो म्हणायचा. आणि तुमची ती बलात्कारसुंदरी कोठे दिसत नाही.

**घटींगण :** तिचाच तर खून झालाय आचार्य दाजीबा साहेब.

**पुंजादादा :** काय मंडळी कोर्टाच्या कामाला सुरुवात करायची ना ?
( सगळे " हो हो " म्हणतात. ) ठीक आहे. प्रथम प्रकार काय घडला तेवढा सांगा.

**लुकतुके वकील :** ( पुढे येत ) मी सांगतो साहेब.

**पुंजादादा :** लुकतुके तुम्ही वकील मंडळी जरा जादा बोलता. आमच्या अंधेर नगरीत तसं काही चालणार नाही. गुंता झटक्यात उरकायचाय.

**लुकतुके :** हो हो दादासाहेब...अगदी झटक्यात गुंता सुटणार. हे इकडे आरोपी. हा पहिला आरोपी म्हातारा दिसतोय तो फकीरा. हा दुसरा आरोपी त्याचा मुलगा दंगल आणि हा तिसरा दंगलचा भाऊ बिऱ्या. इकडे हे फिर्यादी. पहिला ट्रक ड्रायव्हर जगन्नाथ, दुसरा क्लीनर कृष्णा आणि तिसरा वनरक्षक हिम्मतबहाद्दर.

**पुंजादादा :** ठीक ठीक. आता गुन्ह्याचा प्रकार सांगा.

**लुकतुके :** सुमारे पंधरा दिवसापूर्वी सीताबाई नावाची एक आदिवासी सोळा वर्षाची मुलगी अंधेर नगरीच्या रानात दुपारची सर्पण गोळा करीत हिंडत होती.

**पुंजादादा :** एकटी ?

**लुकतुके :** होय दादा, अगदी एकटी.

**शास्त्रीबोवा :** तिच्यावर या आरोपीनी बलात्काराचं अघोर कर्म केलं काय? आणिक वर खून ?

**लुकतुके :** छे छे शास्त्रीबोवा, गैरसमज होतोय. जिच्यावर बलात्कार झाला आणि त्यातच जिचा खून झाला ती सीताबाई या फकीराची सून, या दंगलची बायको आणि बिऱ्याची वहिनी.

**साहेबराव :** दिसतात साले सुके बोंबील....हे काय बलात्कार करणार ?

**भुईट :** हा फकीरा तर जख्ख थेरडा आहे की—

**दाजीबा :** पण वासना थेरडी होते का? उलट म्हातारपणी कोवळी काकडी कराकरा खावीशी वाटते. दाजीबा म्हणे वासनेला नाही अंत । साधू संत देखील होती जंत । हा हन्त ! हा हन्त ! पुंडलिक वरदे हरी विठ्ठल.

**शास्त्रीबुवा :** पण बलात्कार आणि खून करणारी नक्की माणसं कोण ?

**लुकतुके :** ज्यानी सीताबाईवर बलात्कार केला तीच आजच्या खटल्यात प्रमुख फिर्यादी आहेत. हा जगन्नाथ ड्रायव्हर, कृष्णा क्लीनर आणि वनरक्षक हिम्मत बहाद्दर या तिघानी पाळीपाळीने सीताबाईवर बलात्कार केला आणि त्यातच ती केव्हा तरी मेली. हे बलात्कारकर्म चालू असताना सीताबाईने दांडगाई तर

केलीच, म्हणजे चावली, ओरडली, नखानं बोचकारलं वगैरे पण तिचा आरडा-ओरडा ऐकून हा फकीरा, दंगल आणि बिस्या धावून आले आणि त्यानी या फिर्यादींना अटकाव केला, मारहाण केली आणि पर्यायानं सीताबाईला ठार मारण्यास फिर्यादींना त्यानीच भाग पाडलं.

**शास्त्रीबुवा :** म्हणजे खरे गुन्हेगार हे तिघे चांडाळ. जगन्नाथ, कृष्णा आणि हिम्मत बहाद्दर. मग हे फिर्यादीच्या जागेवर कसे ?

**साहेबराव :** असं काय करता शास्त्रीबुवा, या तिघानी बलात्कार केला त्यावेळी फकीरा आणि त्याची मुलं यांनी त्यांना अडथळा नाही का केला. मारहाणसुद्धा केली. अंधेर नगरीत असं चालत नाही.

**शास्त्रीबुवा :** मग त्यांनी काय बाईवरला बलात्कार मुकाट्यानं बघायचा का बलात्काराला मदत करायची ?

**साहेबराव :** तुम्ही अंधेर नगरचे रहिवासी असून असले बालीश प्रश्न विचारता याचं नवल वाटतं शास्त्रीबुवा.

**गिरमे :** साहेबराव, शास्त्रीबुवा अलीकडंच अंधेर नगरीत राहायला आलेत, नव्हे का ? त्यांना इथल्या कायद्यांची माहिती नाहीये.

**शास्त्रीबुवा :** अंधेर नगरीतले कायदे निराळे आहेत का ?

**आक्काताई :** एकदम निराळे आहेत. फार प्राचीन काळी म्हणजे अंधेर नगरीचं स्वतंत्र राज्य होतं तेव्हापासून इथले कायदे निराळे, न्यायदानाची पद्धत वेगळी.

**पुंजादादा :** माझ्या खापर खापर पणजोबाचा खापर खापर पणजोबा त्या टायमाला अंधेर नगरीत राज्य करीत होता. त्या काळीच त्यानं चोराला सोडून संन्याशाला सुळी दिलं आणि नवे कायदे केले. आचार्य आठवतेय ना ती गोष्ट ?

**दाजीबा :** मी सांगतो ती गोष्ट. अंधेर नगरीत एक चोर होता. रोज रात्री तो दोन घरं फोडायचा, पोटापुरतं लुटायचा आणि घरी जाऊन बायकामुलात सुखानं नांदायचा एका रात्री चोरी करायला म्हणून एका घराच्या खिडकीच्या गजाला धरून तो भिंत चढू लागला तर ती खिडकीच भिंतीतून निसटून आली. चोर खाली पडला आणि त्याला खूप लागलं. बरं झाल्यावर चोर राजाकडं आला आणि त्यानं आपली हकीकत सांगून घरमालकावर फिर्याद घातली. राजानं घर-मालकाला बोलावून जाब विचारला. 'घराच्या खिडक्या तुम्ही मालक मंडळींनी अशा कच्च्या बसवल्या तर चोरांनी चोऱ्या कशा करायच्या ? चोराला इतकं लागलं त्याला जबाबदार कोण ?" मालक म्हणाला– "सरकार, तुमची तक्रार रास्त आहे. पण या चुकीला मी जिम्मेदार नाही. ज्या गवंड्यानं भिंत बांधली तोच जबाबदार आहे या चुकीला." राजानं गवंड्याला बोलावून आणून त्याला जाब विचारला तर गवंडी म्हणाला–"सरकार चूक झाली खरी पण त्याचं कारण मी नव्हे. मी खिडकी बसवीत होतो त्यावेळी रस्त्यावर आपली चंद्रा

नायकीण लालचुटूक रंगाची झगमगीत साडी नेसून चालली होती. त्या साडीत माझं लक्ष गुंतलं म्हणून हा घोटाळा झाला." राजानं मग चंद्रा नायकिणीला बोलवून जाब विचारला. चंद्रा म्हणाली,– "इतका भडक रंग साडीला ज्या रंगाऱ्यानं दिला त्यालाच मी रागवायला चालले होते त्यावेळी. सगळा अपराध रंगाऱ्याचाच आहे." राजानं रंगाऱ्याला पकडून आणला. तो लागला त त प प करायला. तशी राजा म्हणाला, "हाच लुच्चा खरा गुन्हेगार आहे. देऊन टाका रे याला फाशी." शिपाई रंगाऱ्याला पकडून घेऊन गेले. पण पुन्हा जरा वेळानं राजाकडं आले आणि म्हणाले– "सरकार, रंगारी फार बुटका आहे. आपले फाशीचे तख्त तर उंच आहे. मग काय करायचं?" राजा म्हणाला– "गाढवानो विचारीत काय बसलात? रंगाऱ्याला सोडा आणि दुसरा भला उंच बळकट माणूस पकडून देऊन टाका त्याला फाशी." शिपाई परत जाऊ लागले तो रस्त्यातून एक भला उंच बळकट संन्याशी जाताना त्यांना दिसला. म्हणाले, "हा रे हां...हा बरा दिसतो. पकडा याला आणि द्या फाशी." पकडला त्यांनी संन्याशाला आणि देऊन टाकला फाशी. राजा टाळ्या वाजवून म्हणाला, "कशी झाली खाशी!"

**पुंजादादा** : तेव्हापासून राजानं अंधेर नगरीचे सगळे कायदे स्वतंत्रपणे तयार केले.

**शास्त्रीबुवा** : असं का? हे आम्हाला ठाऊक नव्हतं बुवा.

**पुंजादादा** : तेवढंच नाही शास्त्रीबुवा, भारत स्वतंत्र झाल्यावर अंधेर नगरीचं संस्थान भारतात विलीन करताना माझ्या बापानं मुळी अटच घातली होती भारत सरकारला. बाकी तुम्ही वाट्टेल ते करा. पण अंधेर नगरीतल्या न्यायव्यवस्थेत ढवळाढवळ करू नका. इथले कायदे आणि न्यायनिवाडा करण्याची पद्धत तशीच राहिली पाहिजे.

**शास्त्रीबुवा** : ते आलं आता लक्षात, पण प्रस्तुत प्रकरणी बलात्काराचा कायदा काय आहे अंधेर नगरीत?

**पुंजादादा** : हा प्रश्न कसा नेमका विचारलात शास्त्रीबुवा. लुकतुके शास्त्रीबोवांना कायदा समजावून सांगा.

**लुकतुके** : सांगतो. कायदा असा आहे शास्त्रीबुवा. आमच्या या अंधेर नगरीत तरण्याताठ्या वा लहान मोठ्या स्त्रियांना एकदुकटीनं उघड्यावर हिंडायफिरायची सक्त बंदी आहे. जिथे एकांत आहे अशा स्थळी म्हणजे नदीकाठी, रानावनात, देवळात, मैदानावर, बागेत, मळ्यात इत्यादी इत्यादी ठिकाणी बाईनं एकटीनं मुळीच जाता कामा नये. अशी एकटी तरणीताठी बाई पाहिली की पुरुषांच्या वासना खवळतात आणि त्यांच्याकडून बलात्कार कर्म घडतं. म्हणजे बलात्काराला जबाबदार, कायदा मोडून एकटीनं फिरण्याचा, एकांत स्थळी जाण्याचा, धोका पत्करणारी स्त्रीच असते. तेव्हा या गुन्ह्यात सीताबाईनं कायदेभंग केला. सर्पण

आणण्यासाठी ती एकटी रानात गेली आणि तिला पाहाताच ट्रकमधून जाणाऱ्या जगन्नाथ, कृष्णा आणि वनरक्षक हिम्मत बहाद्दर--

**दाजीबा :** या मर्दांना उकळी फुटली. वा ह वा रे वाहवा !

**घटींगण :** जगन्नाथनं तिला पकडली आणि ओढून पडक्या देवळात नेली. तिथं या तिघांनी आळीपाळीने तिच्यावर बलात्कार केला. पण तिनं तो निमूटपणे सोसला असं समजू नका. तिनं हातातला विळा वापरायचा प्रयत्न केला. ती चावली. नखानं ओरबाडलं तिनं. नाना तऱ्हा केल्या, फिर्यादी मंडळी बलदंड होती म्हणून तिचं काही चाललं नाही त्यांच्यापुढं.

**लुकतुके :** अब्रू तर गेलीच पण बिचारी मारामारीत जीवही गमावून बसली.

**अक्काताई :** पुंजादादा, कायदा मोडून सीताबाई एकटी रानात गेली ही तिची चूक आहे. फिर्यादींनी बलात्कार केला हेही फारसं वावगं नाही. पण तिचा जीव घ्यायला नको होता या मंडळींनी.

**पुंजादादा :** लुकतुके बलात्कार प्रकरणाचा पुढला कायदेशीर भाग बाईंनला समजावून सांगा.

**लुकतुके :** बाईसाहेब, कायदा असं सांगतो की एकटी स्त्री, उघड्यावर बलात्कारी पुरुषांच्या तावडीत गवसल्यावर, आपल्या चुकीचे प्रायश्चित्त म्हणून निमूटपणे तिनं बलात्काराला तोंड दिले पाहिजे. म्हणजेच तिने बलात्कार पत्करला पाहिजे.

**पुंजादादा :** तेवढं नाही. तिने कोऑप्रेशन दिलं पाहिजे.

**साहेबराव :** बरोबर. कोऑप्रेशन असेल तर तिला जीवे मारता येणार नाही कोणाला.

**शास्त्रीबुवा :** अहो पण कोवळ्या मुलीवर दहा-बारा बाप्यांनी आपली वासना पुरवून घ्यायची ठरवली तर तेवढ्यानेंसुद्धा ती मरेलच की ?

**पुंजादादा :** तरी सुद्धा तो खून म्हणता यायचा नाही.

**भुईटे :** तर काय, बया उघड्यावर कायदा मोडून आलीच कशाला ? त्यावेळी अक्कल कुठं गेली होती ?

**दाजीबा :** पुंजादादा, अंधेर नगरीतल्या मर्दांना रानावनात, नदीकाठी अशा बऱ्याच बलात्कार सुंदरींची चमचमीत मेजवानी वारंवार मिळत असेल नाही ? काही नाही तरी पाणी भरायला या मदनमस्त मैना नदीच्या घाटावर नाही तर विहीरीवर येणारच की.

**पुंजादादा :** कुठलं आलंय हो. अंधेर नगरीतल्या बायकासुद्धा आता वस्ताद झाल्या आहेत. पाणी भरायला वीस वीस जणींचा जथा येतो एकदम. हाती काठ्या नि फरशा परजीत.

**आक्काताई :** इथल्या पुरुष मर्दांनीच वस्तादपणा शिकवलाय बायकांना. तरी पण

सीताबाईसारख्या अडाणी आदिवासी बायका सापडतात अधून मधून काही टोळभैरवांना.

**पुंजादादा :** असो असो. तर लुकतुके वकील पुढं चालवा काम.

**लुकतुके :** तर न्यायाधीश महाराज, कायद्याप्रमाणे जगन्नाथ आणि मंडळींच्या हाती गवसलो हे लक्षात आल्यावर सीताबाईनं निमूटपणे सहकार्य द्यायला हवं होतं. त्या ऐवजी विरोध केला. फिर्यादींना जखमी, जायबंदी करण्याचा प्रयत्न केला. प्रथम मयत सीताबाईनं आणि नंतर आदिवासी माणसांना जमवून या फकीरा आणि त्याच्या दोन्ही मुलांनी. परिणामी फिर्यादींना जी मारहाण झाली, त्यांना जो मनःस्ताप झाला त्याबद्दल न्याय मिळावा अशी त्यांची प्रार्थना आहे.

**पुंजादादा :** ठीक आहे.

**दाजीबा :** बलात्कार सुंदरी मेली कशी ते समजलं नाही अजून? म्हणजे बलात्कार जारी असताना तिची प्राणज्योत निमाली की कोणी गळा घोटून तिला यमसदनास पाठवली?

***धटींगण*** **:** फिर्यादींचं म्हणणं असं आहे की—

**पुंजादादा :** ते फिर्यादींना सांगू दे की. तुम्ही कशाला मधेच तोंड वाजवताय धटींगण-साहेब. तूपलोंढे पुकार जगन्नाथ ड्रायव्हरला.

**तूपलोंढे :** जगन्नाथ ड्रायव्हर...जगन्नाथ ड्रायव्हर हजर है?

**जगन्नाथ :** (उठत) हजर है सरकार.

**पुंजादादा :** तर तू ट्रक चालवतोस रोज.

**जगन्नाथ :** होय सरकार. जंगली लाकडाची ने-आण करणं हा माझा धंदाच आहे. हा कृष्णा क्लीनर नेहमी गाडीची देखभाल करायला बरोबर असतो.

**लुकतुके :** आणि हिम्मत बहाद्दर?

**जगन्नाथ :** हिम्मतबहाद्दर फक्त त्या दिवशी गाडीत होता आमच्याबरोबर. तो शहरातून जंगलाकडे ड्यूटीवर निघाला होता.

**दाजीबा :** तर ही 'ड्यूटी' पार पाडली या बहाद्दरानं. काय रे जगन्नाथ, तू बलात्कार केलास म्हणजे काय काय केलंस. जरा वर्णन करून तपशीलवार सांगशील का?

**आक्काताई :** इश्श, काय हे दाजीबा? इथं एक बाई बसली आहे याचा काही विचार? मला नाही हो चावट प्रश्नोत्तरं चालायची. बलात्कार म्हणजे बलात्कार. सगळ्यांना कळतं सगळं काही.

**पुंजादादा :** तरी पण दाजीबा ब्रह्मचारी आहेत. त्यांना नीट समजायला नको का सगळं?

**दाजीबा :** असो असो... बलात्कारासारखा बलात्कार. आम्हाला एवढंच जाणून घ्यायचं होतं की या जबरी संभोगात समागमातली समाधी लागते की नाही?

**अक्काताई** : त्याला काय बोडकं कळणार आहे समाधीयोग म्हणजे काय ते आचार्य. अहो ट्रक ड्रायव्हर आहे तो.

**गिरमे** : काय रे, बलात्कार करताना थोडीशी मजा आली की नाही ?

**जगन्नाथ** : आता सरावच पडला, तेव्हा मजा येणारच की. जितकी मस्ती, जितकी हाणामारी जास्त, तितकी रग वाढते आपली आणि रंगही येतो.

**दाजीबा** : असं का ? म्हणजे मस्तीतली कुस्तीच म्हण की. (गातो) दाजीबा म्हणे मस्तीत करावी कुस्ती । देहभान अवघे सांडोनी जिरवता रग । अहो उसळे रंग समाधीचा...बोला सीताकांत स्मरण जय जय राम !

**पुंजादादा** : तू सराव पडला म्हणालास म्हणून विचारतो. आतापर्यंत किती वेळा बलात्कार केलेस ?

**जगन्नाथ** : कोणी लेकानं मोजलेत. दोन तीन डझन पोरी घातल्या असतील अंगाखाली आजवर. आपल्याला ना बायको ना पोर. जंगलातल्या पोरी हाच आमचा प्रपच की.

**दाजीबा** : अरे म्हणजे तू चांगला प्रापंचिक बलात्कारी दिसतोस की ?

**पुंजादादा** : किती बायका मारल्यास त्यातल्या.

**जगन्नाथ** : देवाश्यान् सांगतो दादा, एकही मेली नाही आजपोत्तर. कारण म्हणाल तर कॉप्रेशन होतं सगळ्या बायांचं. हीच सटवी अमळ मस्तवाल निघाली. माझं काही बिघडलं नाही. तिची तीच मेली. म्हणजे नंतर पुढे मेली असावी.

**लुकतुके** : म्हणजे तू बलात्कार करताना ती अखेरपर्यंत जिवंत होती ?

**जगन्नाथ** : चांगली ठणठणीत होती की बया. घामटं काढलं माझं.

**लुकतुके** : अरे मग ती मेली केव्हा ? काय रे कृष्णा ?

**कृष्णा** : (उठत) माझं काम आटोपेपर्यंत ती जिवंत होती. हां अमळ मस्ती संपून निपचीत पडली होती; तरी पण जिवंत होती.

**लुकतुके** : उठा हिम्मतबहाद्दर, तुम्ही रंग केला तेव्हा जिवंत होती का ती ?

**हिम्मतबहाद्दर** : वो मुझे मालूम नही. वह होष मे नही थी. हो सक्ता है वह मर गयी थी......लेकीन मुझे मालूम नही.

**दाजीबा** : वा बहाद्दर, म्हणजे तुम्ही प्रेताशी समागम केलात तर ?

**लुकतुके** : दादासाहेब, यावरून एक गोष्ट सिद्ध होते की केवळ बलात्कार करण्यापलीकडे या तिघांचा तिला काही अपाय करण्याचा मुळीच उद्देश नव्हता.

**पुंजादादा** : बरं, तीन बाप्ये म्हणजे काही जीव जाण्या इतपत अत्याचार करणारी संख्या नव्हे. अमळ कोऑप्रेशन असतं तर वाचली असती बिचारी. असो. फिर्यादींना कोणाला काही विचारायचंय ?

**दाजीबा** : (हात वर करीत) दाजीबाला खूप काही विचारायचंय.

**अक्काताई** : माझी हरकत आहे हं पुंजादादा. दाजीबांना चावट प्रश्न विचारायचे

असतील तर या तिघांना आपल्या आश्रमात घेऊन जाऊ दे त्यांना.

**साहेबराव :** तसंच करा आचार्य. हा जगन्नाथ, कृष्णा आणि हिम्मतबहाद्दर, यांना खटल्याचं काम आटोपल्यावर तुम्ही आपल्या आश्रमात घेऊन चला आणि तपशीलवार मुलाखात घ्या एकेकाची.

**दाजीबा :** मान्य आहे ! मान्य आहे ! नंतर आश्रमात धाडा मात्र. फक्त बलात्कार सुंदरी सीता मात्र आश्रमात येऊ शकणार नाही. जगन्नाथ, तुझ्या दोन चार बलात्कारित स्त्रियांना घेऊन येता आलं तर पाहा. निदान त्यांचे पत्ते, ठावठिकाणा तरी कळव. एखादी बलात्कार सुंदरी भेटली तरी पुरे. ती दाजीबाची जिज्ञासा खूपच काही पुरी करील. फक्त जिज्ञासा. दाजीबा ब्रह्मचारीच आहे.

**जगन्नाथ :** आता मी काय जंगलातल्या पोरींची यादी न् पत्ते खिशात ठेवून हिंडतो का काय ?

**पुंजादादा :** असो असो. ते नंतर बघू. तर लुकतुके, आता आरोपींना काही म्हणायचं असेल तर म्हणा म्हणावं.

**लुकतुके :** त्या आधी दादासाहेब आपण चहासाठी थोडा ब्रेक घेऊ या.

**पुंजादादा :** आणा च्या मारी... चहा आणाच. डोक्याला ताप झालाय फार. आचार्य, तुम्ही काय घेणार ?

**दाजीबा :** दूध गाईचं.

**पुंजादादा :** आणा...आणा (हळूच) दाजीबाना सांगा विलायती गाईचं आहे म्हणून.
(चहा आणला जातो. दूध येते. फिर्यादी-आरोपी सोडून बाकी सगळ्यांना.)

**गिरमे :** बाकी त्याचा काही उपयोग आहे असं नाही. केस अगदी क्लिअर आहे. बाकी साहेबराव, तुमच्याबरोबर जंगलात एकदा शिकारीला यायला हवं हं.

**साहेबराव :** टाळी द्या हेडमास्तर. मग आम्ही तुम्हाला सांगत काय असतो ?

**आक्काताई :** मी इथं बसलेय नि सगळं ऐकतेय, विसरू नका, साहेबराव आणि गिरमे मास्तर.

**गिरमे :** अरे म्हणजे कमाल झाली. मी काय बोललो ? जंगलात शिकारीला एकदा जायला हवं एवढंच ना ?

**साहेबराव :** मी तरी वेडंवाकडं काय बोललो ? आक्काताई तुमची मिजाशीची भाषा वाड्यावर बरं का, इथं माझ्या पुढ्यात नाही. आय ॲम द पाटील ऑफ धिस अंधेर नगरी !

**पुंजादादा :** घटींगण, इकडं ये. (घटींगण जवळ येतात) साली एवढी फर्मास होती का रे ही सीताबाई ? (घटींगण उजव्या पंजाचा आंगठा आणि जवळचे बोट यांचे वर्तुळ करून डोळा मारीत नाचवीत "दादा, काय सांगू तुम्हाला...." एवढेच उद्गारतो, तशी) भडव्या, मग आधी सांगायचं नाहीस ? वाड्यावर आणून सोडायची नाहीस ?

**धटींगण :** दादासाहेब, मला हो काय ठाऊक तुम्हाला जंगलचा मेवा चालतो म्हणून ?

**पुंजादादा :** पुन्हा लक्षात ठेव. आपल्याला कुठलाही मेवा वर्ज्य नाही. आक्काताई-पासून सीताबाईपर्यंत. काऽय ? ( हसतात ).

**आक्काताई :** दादा, सगळं मी नीट ऐकतेय म्हटलं.

**पुंजादादा :** अगं नीट कान खोलून ऐक. दिल्ली दरबारात तुझी कशी वाट लागलीय ते ठाऊक आहे मला. गमज्या करू नकोस. चला मंडळी चहा आटोपा. कोर्टाचं काम आहे हे. पद्धतशीर व्हायलाच हवं. लुकतुके वकील, चहा संपला की नाही तुमचा ? टायेम होतोय आमाला. आचार्य दूध चांगलं होतं ना ?

**दाजीबा :** दूध अमळ पांचट होतं. ठीक आहे. अलीकडं गाई तरी कुठं पूर्वी-सारख्या दूध देताहेत. भेसळीचं चरतात आणि भेसळ दूध देतात. चला, खटला पुढं चालवा.

**पुंजादादा :** तर कॉन्स्टेबल डोईफोडे, आरोपींना पुकारा.

**डोईफोडे :** आरोपी फकीरा हजर है ? फकीरा हजर है ?

**दंगल :** बापूस, उठून उभा राहा ना....' हजर है ' म्हणून सांग की.

**फकीरा :** नाही सांगणार. मी इथं हजर आहे हे काय भोसडीच्याना दिसत नाही ? फाशी द्यायचं तर ठरलंय त्यांचं. मग उगाच नखरे कशासाठी ? पकडलेल्याना कुठं कोणी पुकारतात ?

**शास्त्रीबुवा :** माफ करा, पण तिकडे म्हणजे भारतात, न्यायालयात गुन्हेगार आरोपींना पुकारीत नाहीत. ते मुळी पकडलेलेच असतात की.

**पुंजादादा :** इथली सिस्टीम वेगळी आहे शास्त्रीबोवा. ही आमची अंधेर नगरी आहे. इथं पकडलेल्या आरोपीनासुद्धा पुकारलं जातं. ते उठून उभे राहिले तर ठीकच आहे नाही तर भडवे जातील विनाचौकशी फासावर. डोईफोड्या, पहिला आरोपी मेला. दुसऱ्याला पुकार, पाठोपाठ तिसऱ्याला पुकार ! नाही तर निकालच जाहीर करतो.

**डोईफोडे :** आरोपी....दंगल फकीरा हाजीर है ? दंगल फकीरा हाजीर है ?

**दंगल :** ( तोंडावर हात घेऊन बोंब मारतो. मग म्हणतो ) हाजीर है.

**लुकतुके :** एवढं सांगायला तोंडावर हात घेऊन बोंबलायला कशाला हवं ? कायदेशीर भाषेत सांगता येत नाही ?

**दंगल :** आमचा कायदा हाच. पत्करला तर व्हा नाही तर झ्याट मारी !

**साहेबराव :** भडव्या कोर्टात अश्लील बोलतोस ? शिव्यागाळी करून कोर्टाची बेअदबी करतोस ?

**पुंजादादा :** शिक्षा ऐकली की सुतासारखा सरळ येईल. पुढं चला वकीलसाहेब.

**लुकतुके :** दंगल फकीरा, तुझी बायको सीताबाई सर्पण आणण्यासाठी एकटी

जंगलात गेली आणि म्हणून तिच्यावर बलात्कार झाला हे तुला मान्य आहे ?

**दंगल :** साहेब, आमच्या घरातल्या प्रत्येकाला कष्टाची भाकर मिळवावी लागते. बाईमाणसं घरात बसून राहातील तर खातील काय, माती ?

**लुकतुके :** ते आम्ही जाणत नाही. ती एकटी घराबाहेर रानात गेली म्हणून तिच्यावर बलात्कार झाला. बलात्कार होताना तिनं सहकार्य दिलं नाही, विरोध केला म्हणून तिचा मृत्यू ओढवला. पण फकीरा, तू आणि बिस्या यांनी मात्र इतर आदिवासी गुंड जमवून या तिघांना ठोकून काढलं तेव्हा तुम्ही दुहेरी गुन्हा केला आहे. सीताबाईला एकटी रानावनात धाडून तिला मृत्यूच्या धोक्यात लोटण्याचा, आणि जगन्नाथ, कृष्णा आणि हिंमतबहाद्दर यांना शिवीगाळ करून मारहाण करण्याचा गुन्हा मान्य आहे ?

**फकीरा :** मान्य करायलाच हवा. तुम्ही काय तसे सोडणार आहात आम्हाला ?

**पुंजादादा :** ठीक आहे तर, आम्ही आता शिक्षा जाहीर करतो. काय मंडळी फाशीच सुनवायची ना ?

**शास्त्रीबुवा :** मला वाटतं फाशी जरा जास्त कडक शिक्षा होईल. त्या पेक्षा थोडी सौम्य शिक्षा द्यावी.

**पुंजादादा :** नाही नाही, ज्यांच्या मूर्खपणामुळं एका बाईवर बलात्कार घडला आणि बलात्कार करणाऱ्यांना मात्र हकनाक मारहाण सोसावी लागली, असले गुंडपुंड जिवंत ठेवण्यात काय अर्थ आहे ? त्यांना फाशीच मिळाली पाहिजे.

**शास्त्रीबुवा :** ज्यांनी बलात्कार केला त्यांना काही थोडं तरी शासन कराल की नाही तुम्ही ?

**साहेबराव :** का म्हणून ? त्यांनी घरात शिरून सीताबाईला धरली होती का ? नाही. कायदा मोडून ती एकटी जंगलात सर्पण गोळा करीत होती. कोणता पुरुष मंडळी असली संधी सोडतील ?

**भुइटे :** शास्त्रीबुवा, तुम्ही अजून या अंधेर नगरीत रुळला नाहीत. इथले कायदे एकापेक्षा एक भारी आहेत. तुम्ही आपले सगळी मंडळी म्हणतात त्यात आपला सूर मिळवा.

**शास्त्रीबुवा :** तुम्ही काही म्हणा, पण मला काही हा निवाडा पसंत नाही.

**पुंजादादा :** शास्त्रीबुवांचं सोडून द्या. बाकीच्या सगळ्या मंडळींचं तर एकमत आहे ना फाशीबद्दल ? फाशी द्यावी म्हणणाऱ्यांनी हात वर करा.

( शास्त्रीबुवा सोडून सगळे हात वर करतात. ) ठीक आहे. मुख्य न्यायाधीश म्हणून मी निकाल देतो की प्रमुख आरोपी फकीरा, दंगल आणि बिस्या यांना त्यांच्या गुन्ह्याबद्दल जाहीरपणे फाशी देण्यात यावी.

**साहेबराव :** चला फौजदार, आरोपींना घेऊन चला आणि फाशी कुठं, कधी देणार ते आम्हाला प्रत्येकाला अगोदर कळवा.

**भुईटे :** जाहीर फाशी म्हणजे गर्दी जमायचीच की बघायला. व्ही. आय. पी. साठी बसायची स्पेशल व्यवस्था करून ठेवा.

**गिरमे :** मला वाटतं त्या दिवशी शाळेला सुट्टी ठेवावी, विद्यार्थ्यांनाही फाशी कसं देतात त्याचं प्रात्यक्षिक बघायला तरी मिळेल.

**दाजीबा :** जरा थांबा. तुम्हाला फाशीची शिक्षा अमलात आणता यायची नाही. भारताच्या घटनेनुसार दोरखंडानं फाशी देणं म्हणजे नागरिक स्वातंत्र्यावर घाला घालणं आहे. दोरखंडान कैद्याला फास देणं हे क्रूर कर्म आहे. अतएव फाशीची सजा ही बेकायदेशीर आहे.

**पुंजादादा :** हे तुम्ही तिसरंच एक खेकटं काय काढलंत दाजीबा ?

**शास्त्रीबुवा :** तिसरंच खेकटं नाही पुंजादादा दाजीबांचा पॉइंट बरोबर आहे. दोरखंडानं फाशी देणं ही रानटी पद्धत म्हणून जगात सगळीकडं टाकून दिली गेलीय.

**गिरमे :** यूरोप-अमेरिकेत तर इलेक्ट्रिक चेअरवर कैद्याला बसवतात आणि शॉक देऊन मारतात.

**आक्काताई :** मग तसली चेअर आणू या का आपण अंधेर नगरीत ?

**भुईटे :** फाशीची पद्धत रानटी असली, क्रूर असली तर सोडून दिली. अरे माणसांना मारायची काय तेवढीच एक पद्धत आहे. शेकडो रीती सापडतील. मुख्य मुद्दा एवढाच आहे की गुन्हेगार मेला पाहिजे.

**पुंजादादा :** बघा, काय ते आत्ताच ठरवा. फाशी रद्द करायची तर त्या ऐवजी दुसरी कोणती पद्धत ठेवायची ते सांगा. गुन्हेगार मेला पाहिजे एवढं नक्की.

**आक्काताई :** मला वाटतं दादा, गुन्हेगाराला झोपेच्या गोळ्या खायला दिल्या तर ? म्हणजे गोळ्या खाऊन रात्री झोपला की कायम झोपला. त्याला कटकट नाही आणि इतराना झकझक नाही.

**पुंजादादा :** म्हणजे काय झालं ? त्याला शिक्षा काय झाली ? गडी तब्येतीत जेवून खाऊन झोपेल तो उठायचा नाही इतकंच. मरण्याचा काही त्रास व्हायला हवा की नाही ?

**साहेबराव :** दादा, माझी आयडीया अशी आहे, गुन्हेगाराचं तरवारीनं मुंडकंच उडवावं. एक घाव की दो तुकडे.

**गिरमे :** यानं काय साधलं ? रक्तपात, जखम, बोंबाबोंब आलीच की. मग फाशी काय वाईट आहे ?

**पुंजादादा :** मंडळी, पद्धत अशी शोधून काढा की त्रास तर झाला पाहिजे, शिक्षा क्रूर, रानटी तर दिसता कामा नये आणि परिणामी कैदी हमखास मेला पाहिजे.

**भुईटे :** मला वाटतं गुन्हेगाराला जालीम विषाचा पेला प्यायला द्यावा. म्हणजे तो तडफडून मरेल.

**पुंजादादा :** छा छा, त्यात काही दम नाही. काही भक्कम, मजबूत माणसं विष पचवतात. उतारा सगळ्या विषावर निघालाय.

**गिरमे :** कैद्याचा एखाद्या कड्यावरून कडेलोट केला तर ?

**साहेबराव :** म्हणजे कडेलोटासाठी पहिल्यांदा कडे शोधायला हवे आणि सगळा ताफा घेऊन कड्यावर जायला हवं. ही तर अगदीच जुनाट रानटी पद्धत झाली.

**दाजीबा :** तुम्ही सगळे महामूर्ख आहात. (गातो) दाजीबा म्हणे मुर्खांच्या मसलती। काय कळे त्याना कायद्याची मर्म रिती। उपाय उशाशी असूनी दुनिया धुंडाळती। आंधळे खुळे. अरे अडाणी बालकांनो, शिक्षा म्हणजे सूड नाही उगवायचा. शासन असे करावे की ज्या योगे गुन्हेगाराला प्रायश्चित मिळूनही त्यांची सुधारणा होईल.

**पुंजादादा :** अहो, मेल्यावर कसली बोडक्याची सुधारणा ?

**दाजीबा :** या जन्मी नाही तर पुढल्या जन्मी तरी होईल.

**साहेबराव :** पुढच्या जन्माचं कोणी पाहिलंय ?

**पुंजादादा :** फाशीच्या बदली द्यायची शिक्षेची पद्धत सुचतेय का तुम्हाला आचार्य दाजीबा ?

**दाजीबा :** आहे. एक प्रायःश्चित्त रीती आहे माझ्या पोतडीत. अगदी सभ्य, सात्विक, पवित्र आणि आत्मोन्नतीकारक.

**पुंजादादा :** कैदी मरेल का हमखास ?

**दाजीबा :** त्याची प्राणज्योत हमखास मालवणार.

**साहेबराव :** पण कैद्याला त्रासबीस रग्गड झाला पाहिजेल. उगाच गपकन् डोळे मिटले नी मेला, असं नाही उपयोगी.

**दाजीबा :** तो सोहोळाही माझ्या प्रायःश्चित पद्धतीत अगदी डोळा भरून पाहायला मिळेल. पुन्हा दिडकीचा खर्च नाही की मारण्यासाठी कोणाच्या हाताला विटाळ नको.

**पुंजादादा :** अहो मग का अंत बघताय आमचा आता ? सांगून टाका की तुमची पवित्र, सात्विक प्रायःश्चित्त पद्धती.

**दाजीबा :** या प्रायःश्चित्ताला म्हणतात आमरण उपोषण. गुन्हेगाराला एकशे एक दिवसाच्या उपवासाचे प्रायःश्चित्त द्यावे. नुसता पाण्यावर ठेवावा. खारकेसारखा सुकत जाईल. अन्तर्यामी शुद्ध होत जाईल. शेवटी मेला तरी या शुद्धीमुळेच पुढल्या जन्मी साधूसंत होऊन जन्माला येईल.

**पुंजादादा :** ही बाकी नामी आयडीया काढली हां दाजीबानी काय मंडळी ?

**साहेबराव :** मुख्य म्हणजे कैद्याला काही 'द्यायला' नको, 'प्यायला' नको की कुठं न्यायला नको. बसल्या जागी हळूहळू मरेल कैदी.

**आक्काताई** : पुन्हा त्याचा तोच मरेल. त्याला मारल्याचं पातक कुणाला लागायचं नाही.

**शास्त्रीबुवा** : पुन्हा एकशे एक दिवसात भरपूर पश्चात्ताप.

**गिरमे** : नुसता पश्चात्ताप नाही. भुकेनं कासावीस होऊन माशासारखी अहोरात्र तडफड तडफड होईल.

**पुंजादादा** : तुम्हाला उपोषणाचा अनुभव असेलच की आचार्य?

**दाजीबा** : हे काय विचारता पुंजादादा? फाशी देणाऱ्या न्यायाधीशाला फाशी जाण्याचा अनुभव असतो का? नाही. पण उपोषणाचं तसं नाही. गांधीजींपासून दाजीबापर्यंत रग्गड मंडळींनी उपोषणाचा अनुभव घेतलाय. अरे काही नर-वीरांनी तर मरेपर्यंत उपोषण करून पाहिलंय. म्हणून (गातो) दाजीबा म्हणे जळो ती फाशी। कैद्याला ठेवा फक्त उपाशी। भुके होता कासावीशी। स्वर्गलोकी पावेल पा. बोला पार्वती पते हरहर महादेव.

**पुंजादादा** : मंडळी मग ठरलं का? फाशी ऐवजी उपाशी.

**सगळे** : ठरलं दादा...... फाशी ऐवजी उपाशी.

**पुंजादादा** : लुकतुके वकील तिकडं गुन्हेगाराशी कुजबूज कसली चाललीय तुमची?

**लुकतुके** : फकीरा आणि त्याची मुलं यांनी वेगळाच पॉईंट पुढं केलाय दादासाहेब.

**पुंजादादा** : आता हे पॉईंट बीईंट फार झाले बाबा. ठरलं म्हणजे ठरलं. घटींगण, कैद्यांना ताब्यात घ्या. आज रात्री पोटभर जेवायला घाला. उद्यापासून उपोषण सुरू. अगदी कडक बरं का.

**साहेबराव** : चोरून मारून कोणी अन्न देईल त्यांना, नीट लक्ष ठेवा.

**घटींगण** : त्याची काळजीच सोडा. अहोरात्र पाहाऱ्यात राहाणार आहेत कैदी.

**आक्काताई** : पण दादा...चोरून मारून काही बाही कैद्यांनी खायचंच ठरवलं तर—

**पुंजादादा** : हे बघा आक्काताई, तुम्ही आता फाटे फोडू नका. थोडे थोडके दिवस नाही, एकशे एक दिवस नुसत्या पाण्यावर काढायचेत. चोरून मारून कुठं चतकोर खाल्ला तरी तेवढ्यानं काय होणार आहे? चला उठा मंडळी, न्याय-सभा बरखास्त.

**लुकतुके** : पुंजादादा, आरोपींचं म्हणणं तरी ऐकून घ्या एकदा. शिक्षेबद्दल त्यांची तक्रार नाहीये.

**पुंजादादा** : मग काय म्हणणं आहे त्यांचं?

**लुकतुके** : हा फकीरा सांगतोय की उपासमारीची त्यांना एवढी सवय पडलीय की एकशे एक दिवस ते हसत हसत काढतील.

**पुंजादादा** : आरतिच्यामारी...हा एक पॉईंटच आहे की. या आदिवासी जंगला-तल्या माणसांच्या पाचवीलाच उपोषण पुजलंय. त्यांना उपोषणाची काय भीती?

**लुकतुके** : तेवढंच नाही दादा, ही मंडळी म्हणतात की प्रसंग पडला तर आम्ही

गवत खातो, शेवाळं खातो, किडा, मुंगी जे गवसेल ते मट्ट करतो. आता तुरुंगात ठेवलं तरी त्यांचं हे असलं खाणं त्यांना कुठं तरी मिळणारच की.

**पुंजादादा :** अ रा रा रा....म्हणजे घोटाळाच झाला की.

**साहेबराव :** हे नव्हतं आमच्या लक्षात आलं.

**शास्त्रीबुवा :** कोर्ट बरखास्त झालंय. आता काही उपाय नाही. दिलेली शिक्षा अंमलात आणलीच पाहिजे.

**भुईटे :** म्हणजे मग आरोपी मरायचेच नाही म्हणता ? मग कसलं हो हे प्रायश्चित्त ?

**शास्त्रीबुवा :** त्याला आता काय इलाज. एकशे एक दिवस झाले की कैद्यांना तुम्हाला सोडावंच लागेल.

**पुंजादादा :** शास्त्रीबुवा, तुम्ही कायद्यात फार नाक खुपसू नका. मुकाट गप ऱ्हावा. नाही तर तुम्हाला फारच जड जाईल.

**शास्त्रीबुवा :** जड आम्हालाच जाणार आहे पुंजादादा, एकशे एक दिवस संपून कैदी बाहेर पडले की बघतो कशी तुमची फटफजिती होणार आहे ती.

**पुंजादादा :** असं का ? मंडळी, मी अंधेर नगरीचा राजा आहे. न्यायाधीशाचा माझा हक्क वापरून मी हुकूम देतोय. धटींगण, एकशे एक दिवसांचं उपोषण जारी झ लंच पाहिजे. रंगारी बुटका पडला तेव्हा माझ्या पूर्वजांनी, संन्याशाला फाशी चढवला. त्याच न्यायानं मी हुकूम देतोय की फकीरा आणि त्याची पोरं यांना द्या सोडून आणि या शास्त्रीबुवाला पकडा आणि बसवा या क्षणापासून एकशे एक दिवस उपोषणाला.

**शास्त्रीबुवा :** ( घाबरून ) अहो हे काय, हे काय ?

**धटींगण :** हा अंधेर नगरीतला न्याय ! तूपलोंढे, डोईफोडे, बघता काय, पकडा या शास्त्र्याला— (" मी नाही...मी नाही " ओरडत शास्त्रीबुवा पळू लागतो. पोलीस त्याला पकडतात. गलबला उसळतो. त्यातच पडदा. )

❋ ❋

# फक्त एकच कारण !

[ **मध्यमवर्गीय पांढरपेशा कुटुंबातील** माणसांची सुखी, समृद्ध आणि सफल जीवनाबद्दल असून असून काय महत्त्वाकांक्षा असणार ? स्वतःच्या मालकीची एक छोटी टुमदार बंगली, एक गाडी, दुसऱ्याकडे हात पसरावा लागू नये एवढी आर्थिक सुबत्ता, बऱ्यापैकी नावलौकिक, कर्तबगार मुलगा, तोही परदेशातून उच्च शिक्षण घेऊन आलेला, त्याला लठ्ठ पगाराची नोकरी, घरात येऊ पाहणारी सुंदर खाशी सुबक....आज्ञाधारक सुनबाई, शिवाय म्हणाल तर टी. व्ही., फ्रीज, वगैरे....बास बास, रग्गड !

शासाहेब सबजीवाले याना ही सुखे अगदी विनासायास मिळाली होती. म्हणजे त्यासाठी आयास...खडतर केले ते सौ. चारुशीलाबाईंनी. तीस वर्षे इच्छारामभाई गर्ल्स हायस्कूलमध्ये नोकरी करून मुख्याध्यापिकेच्या पदावर पोचलेल्या आणि आता वर्षभरातच सेवानिवृत्त होणाऱ्या चारुशीलाबाई या प्रपंचाचा एकमेव आधार. संसाररथाचे चालणारे एकमेव चाक. दुसरे चाक म्हणजे—शासाहेब. आपले ओढले रखडले म्हणूनच चालले म्हणायचे. नाही म्हणजे, माणूस तसा हुशार, हरहुन्नरी, पण बुद्धी चंचल. कोठे एका जागी पाय स्थिर नाही. जन्मभर शासाहेबांनी थोडे का उद्योग केले ? पण शासाहेबानी नव्या उद्योगाला हात घातला की त्यातून उपद्व्याप तेवढा निर्माण व्हायचा, आणि तो मग चारुशीलाबाईंनी निस्तरायचा—अशा अशांत प्रपंचातील उमेदीची वर्षे गेली. तरी पण बाईंनी खबरदारीने घरादारावर वचक ठेवून संसार केला म्हणून तर त्यांचा एकुलता एक पुत्र प्रशांत जर्मनीला जाऊन इंजिनियर होऊन परतला, त्याला बऱ्यापैकी नोकरी मिळाली, कलानगरात जागा मिळाली, त्यावर छोटीशी बंगली उभी राहिली—ही सगळी बाईच्या तपश्चर्येची फलश्रुती !

तर अशा या घरातली एक सायंकाळ. पडदा वर जातो तेव्हा, दिसतो एक दर्शनी हॉल. समोरून आत येण्याचा मुख्य दरवाजा. बाहेर ट्रेलीसचा व्हरांडा, पलीकडे बाग, फाटक वगैरे असावे. हॉलच्या एका बाजूला एक मोठी खिडकी. आता बंद केली आहे. दुसऱ्या बाजूला आतल्या दालनात नेणारे दार. हॉलमधील सजावट बऱ्यापैकी—पण पांढरपेशांच्या बजेटात बसणारी. या घरात किमती चीज वस्तूंची रेलचेल नसेल पण— चारुशीलाबाई आत कोणाला तरी काय सांगताहेत ते जरा ऐका.... " आमच्या घरीसुद्धा रेडियोग्रॅम आणि टी. व्ही. घेतलाय हो. प्रशांतनं जर्मनीहून येताना हा फ्रीज आणला... काही विचारू नकोस....तो तर कुकींग रेंजच घेऊ या म्हणत होता. पण देशी वस्तूवर पैसा उधळण्यात काही अर्थ उरलाय का ? हा मिक्सर फॉरीनचा बरं का. एका पारशाकडून घेतला. हे वॉशिंग मशीन देखील प्रशांतनंच आणलंय, जर्मनीहून. पण आपल्याकडचं लेबर कसं आहे ते जाणतेसच तू. असली मशीनं रामा गड्याच्या हातात द्यायची काही सोय आहे का ? मी बाई आणल्यापासून हे मशीन तस्सं ठेवून दिलंय. म्हटलं प्रशांतला —तुझी बायको आली

म्हणजे बघील त्याचं काय करायचं ते....'' इत्यादी इत्यादी. मुख्य म्हणजे भिंतीवर निसर्गचित्रांच्या बरोबरीने चारुशीलाबाई आणि प्रशांत यांची निरनिराळ्या वयातील छायाचित्रे लावलेली दिसतात. शासाहेब मात्र लग्नानंतर काढलेल्या एका छायाचित्रात काय ते दिसतात. छायाचित्रात देखील बाईंची कुर्रेबाज मुद्रा आणि चष्म्याच्या भिंगातूनही वटारल्यासारखे वाटणारे त्यांचे डोळे पाहूनच नवीन माणसे धसकतात.

पडदा वर जातो त्या वेळी दिवाणखान्यात कोणीही नाही. पण आत दूर कोठे तरी बाईंचा आवाज ऐकू येतो. कोणा पाहुण्या बाईंना त्या आपले घर कौतुकाने दाखवीत असाव्यात. आतमध्ये बाईंचे घरपुराण चालू असतानाच केव्हा तरी कोंबडीच्या पिल्लांचा फडफडाट आणि आरव ऐकू येतो. त्या पाठोपाठ शासाहेबांची धावपळ आणि बसक्या आवाजात गर्जना कानावर येते.... ''हां हा हां ऽ हॉक हॉक हॉक.... अरे अरे अरे... तिकडे नाही... तिकडे नाही.... इकडे इकडे.... अरे अरे गुलामानो तुमचे खुराडे कोठे आणि चाललात कोणीकडे? हॉक हॉक हॉक...आय् शीऽऽ! चलो चलो...'' तेवढ्यात एक पिल्लू नजर चुकवून थेट व्हरांड्यातून आत येऊ पाहाते. तशी शासाहेब 'अरे चोरा....' असे उद्गारत आत येत झडप घालून पिल्लू पकडतात आणि याचवेळी ते प्रेक्षकांना दिसतात पिल्लू पकडून, उचलून छातीशी घेत शासाहेब प्रथम घाबऱ्याघाबऱ्या आत डोकावून बघतात. हॉलमध्ये कोणीही नाही आणि बाईसाहेबांचे आत कोठे तरी घरपुराण रंगात आलेले पाहाताच अमळ हायसे वाटून हातातल्या पिल्लाला गोंजरीत ते म्हणतात-.... .

''लेको तुम्हाला काही अक्कल? शभर वेळा बजावलं तरी डोळा चुकवून तुम्ही थेट घरात घुसता? बाईसाहेबांचं पित्त खवळलं तर तुम्हा पोरट्यांचं काय होईल याचा नतीजा जाणता तुम्ही? लेकोऽऽ इराण्याच्या हॉटेलात तंदुरी होऊन गिऱ्हाइकांच्या भुकेपायी खर्ची पडाल हक्नाक्, ठाऊक आहे? इकडं तुमच काय गाठोडं ठेवलंय रे? आं? अरे बेटा हे देखील एक खुराडंच आहे. फक्त या खुराड्यात आम्ही माणसं राहातो. कशी राहातो ते विचारू नकोस. राहातो. तुमच्या खुराड्यात काय कमी केलंय रे मी तुम्हाला? आं? काय उकीरड्यावर जाऊन दाणेकिडे वेचायचे असतील, ते स्वातंत्र्यदेखील तुम्हाला मी देतो. देतो की नाही? मग तडफडायला या घरात कशाला कडमडता रे तुम्ही? चलो बेटा चलो. खुराड्यात मजा करा. मनःपूत मजा करा. फक्त मला अंडी द्या भरपूर अंडी द्या. दो या तीन हा नियम तुम्हाला नाही बरं का?........मजा करा. पण मुख्य म्हणजे प्रकृतीला जपा. लेको साथीबिथीला बळी पडलात तर हा शासाहेब जाईल बाराच्या भावात फक्त एक वर्ष सहकार्य द्या......उत्पादन वाढवा......मग बघा या शासाहेबाची करामत. चलो बेटा चलो...इकडं पुन्हा चुकूनसुद्धा फिरकायचं नाही हो. जो कोणी फिरकेल त्याची मसाला मुरगी बनवून खाऊन टाकीन...हां ऽऽ''

अशी जरब देत शासाहेब लगबगीनं बाहेर पळतात. कारण पाहुण्या बाईच्या समवेत चारुशीलाबाई बोलत बाहेर येताहेत याचा त्यांना सुगावा लागला असावा. शासाहेब बाहेर पडतात न पडतात तोच आतल्या दालनातून चारुशीलाबाई आणि पाहुण्या-बाई–गंगूताई धांगट बोलत बाहेर येतात. गंगूताई धांगट यांना पाहिल्याबरोबरच या आमदार असाव्यात हे सहज लक्षात येते. बाहेर येतायेताच गंगूताई म्हणतात– ]

**गंगूताई** : ( न्याहाळत ) लई बेस लई बेस.... अर्शी बूटीफूलच... येकदम् माडर्नच की.... समदं कसं आपटूडेट.... बाई, शी. एम्. ना येकदा ह्यो बंगला दावायाच होवा.

**चारुशीला** : गंगूताई तू बरंच इंग्रजी बोलायला लागलीस की ?

**गंगूताई** : (अमळ लाजत ) आता आमदार जालं मंजी काय तरी येस फयॅस कराया होवच की. फारीनची लोकं येतात नवं... डेलीगेशण म्हून.... त्येंच्याशी हवा-पान्याचं तर बोलाया होवं. विंग्रजी शिकवाया मास्तरच ठिवलाय येक. तासाला संबर रुपये फी हाय त्येची. पर बाई, तुमी काय बी म्हना, ह्यो मास्तर लोकांना शिंशीरीटीच म्हायली नाय. उगाच जीव खात्यात ‘ अभ्यास करा.... अभ्यास करा ’ म्हून. आता या वयात आमी अभ्यास करायचा तर आमदारकी कोन करंल वो ?

**चारुशीला** : ते खरं आहे. पण शिकायचं म्हणजे त्यातूनच वेळ काढायला हवा. मी तर म्हणते की मराठीसुद्धा तू मास्तर ठेवून शिकायला हवंस.

**गंगूताई** : हाय.... त्येचीबी मनामंदी हाय बाई. पर आधी विंग्रजी, मंग मऱ्हाटी.

**चारुशीला** : बरी आठवण झाली. गंगूताई, तू आमदार झाली आहेस तर बाई माझं एक काम तू करायलाच हवंस. सगळ्यांना सांगून सांगून थकले. पण एकजण कोणी मनावर घेत नाही. ( असे म्हणत समोरची बंद खिडकी उघडू लागतात. )

**गंगूताई** : सांगा की. काम जालंच म्हून समजा. (पाहात) दारं जाम जाल्याती जनू ?

**चारुशीला** : ( ठोकून दार उघडू पाहात ) जाम होतील नाही तर काय ? कधी उघडी टाकायची सोयच ठेवली नाही मेल्यांनी. जरा मोकळी जागा सापडली की रातोरात तंबू टाकलाच यांनी. ( दार उघडते तशी ) पाहा... तूच पाहा. रस्त्याच्या एका बाजूला आमचा बंगला आणि पलीकडं ही झोपडी.

**गंगूताई** : ( पाहात ) अगो बया बयाऽऽ मंजी झोपडपट्टी उभी करत्यात की काय ?

**चारुशीला** : तूच पाहा म्हणजे झालं. घर बांधायला काढलं तर आम्हाला छपन्न ठिकाणी सवाशेसाठ हेलपाटे. पण यांना आहे कसली दरकार ? झोपडी काढा म्हटलं तर वर आम्हालाच दमदाटी.

**गंगूताई** : तसं कशापाई ? कमीशणरलाच सांगतू की, घटकाबरात झोपडी भुईसपाट करत्याल. आमदाराची आर्डर हाय ही.

**चारुशीला** : सांग सांग बाई. मेल्यांचा चांगला पक्का बंदोबस्त करा म्हणावं.

**गंगूताई :** काम जालंच म्हून समजा. पर बाई, आदुगर येक सांगा, ह्यो कलानगरात तुम्हास्नी प्लाट मिळाला कसा ? न्हाय मंजी ऽऽऽ

**चारुशीला :** ( उसळून ) येऊन जाऊन प्रत्येकजण मेला हाच एक प्रश्न विचारतात.

**गंगूताई :** तसं न्हाय बाई पर–

**चारुशीला :** अगं गंगेऽऽ (जीभ चावत) माफ कर हो. मेली तोंडाला सवयच पडलीय 'गंगे गंगे' करण्याची– तर गंगूताई–

**गंगूताई :** न्हाय बाई. तसं म्हनायचं नाय तुमी. जगाल' हाय म्या गंगूताई धांगट... आमदार. पर तुमास्नी म्या हाय गंगीच.

**चारुशीला :** असं कसं ! असं कसं ?

**गंगूताई :** अवो बाई, म्या मागचं इसरले नाय काई. आठ वरसं तुमच्या घरी म्या केरपोतेरं, धुनं बांडी केलीया... तुमी साळंत जात व्हता तवा तुमच्या परशांतला म्याच संबाळला आन् सायबांना बी म्याच गरम गरम पोळ्या भाजून खाया घातलंया–

**चारुशीला :** अगं तो काळ गेला. संपला. जुन्या झाल्या त्या गोष्टी. त्या काळी तुझा नवरा विठ्ठल– (जीभ चावत) विठ्ठलराव म्हणायला हवं आता त्यांना. ते ड्रायव्हर म्हणून काम करत होते त्यांच्या सिनेमा स्टुडीओत.

**गंगूताई :** पर सायबांनी किरपा केली म्हणून तर हे डायवरचे मॅणेजर झाले. आन पुडं स्टुडीओ बुडाला तवा बी सायेबांनीच त्येंनला ट्रकचा बिजनेस काढून दिला की. पर आमच्या मानसांची दानतच लई खराब.

**चारुशीला :** हे तू मला सांगतेस ? अग गंगूताई पैशासाठी विठ्ठलनं काय काय उचापती केल्या, कोणाकोणाला डुबिवलं, तो पुढारी कसा झाला, निवडून कसा आला, ते सगळं ठाऊक आहे मला.

**गंगूताई :** त्येचं काय न्हाय म्हना. समद्या फुडाऱ्याना त्ये करायाच लागतं. पर त्यो काय मानूस म्हनायचा ? जलमभर मारझोड केली मला, घरात रोज बाई बाटली आन बाहीर गावगुंडी.

**चारुशीला :** आणि असल्या गावगुंडावर आमच्या भोळ्या सांबाची कृपा !

**गंगूताई :** पर काय फळली ती किरपा ? शेवटी मारामारीतच मरण आलं न्हवं ? द्येव समदं उगड्या डोळ्यांनी पगतोया वरून. त्यो काई तमाखू चोळीत न्हाई बसला हातावर.

**चारुशीला :** काही का असेना–मारामारीत त्याचा खून झाला म्हणून लोकानी तुला उभी करून निवडून आणली–हे तर खरं ना ?

**गंगूताई :** वाईटातून चांगलं निगतं त्ये आसं ऽऽ

**चारुशीला :** नशीबवान आहेस तू म्हणून तुझं सगळं चांगलं झालं अगदी बिनबोभाट ....घर बसल्या. नाही तर आमचं. खरं म्हणजे, हे त्यावेळी सिनेमा धंद्यात होते,

म्हणून कलानगरातला हा प्लॉट आम्हाला हक्कानं मिळायला हवा होता. ६ की नाही ? पण तेवढ्यासाठी वरपर्यंत भांडभांडून रक्त आटवावं लागलं म एकटीला.

**गंगूताई :** मंजी सायबांनी फिल्लम इंडष्ट्री सोडली म्हनता का काय ?

**चारुशीला :** अगं त्यावेळीच दिवाळं काढलं, सगळे सोपस्कर झाले...मी त्यांना घरी घेऊन आले म्हणून दोन वेळची भ्रांत पडली नाही, समजलीस. त्यानंतर छपन्न उद्योग झाले यांचे सगळे आतबट्ट्यात. मी आहेच पुन्हा निस्तरायला.

**गंगूताई :** पर मंजी सायेब आता ऽऽ–

**चारुशीला :** आताऽ ? आताचा उद्योग बघायचाय तुला यांचा ? ( तिच्या हाताला धरून खिडकीशी नेत ) पाहा पाहा.... ते खुराडं पाहा एकदा....

**गंगूताई :** ( पाहात ) अगो बया बया... कोंबड्या का काय ? ब्रायलर दिसत्याती. मंग काय वो बाई.... बक्कळ पैका–

**चारुशीला :** ( उसळून ) पैका गेला चुलीत. अगं मी एवढी इच्छा रामभाई गर्ल्स हायस्कूलची प्रिन्सीपॉल, माझा मुलगा प्रशांत, एवढा फॉरीन रिटर्न्ड इंजिनीयर आणि आमचे हे उद्योग काय करतात ? तर–

( त्याच वेळी शासाहेब बाहेरून "हॉक....हॉक...हॉक...हां....हां.... हां...." अशी साद घालीत गडबडीनं प्रवेशतात. तशी– ) पाहिलंस ?

**शासाहेब :** ( आपल्याच तंद्रीत ) प्रिन्सीपॉलसाहेब, दोन कोंबड्या आल्यात का इथं ? म्हणजे चुकून चुकून.... वाट चुकून....

**चारुशीला :** ( रागानं ठसक्यात ) इथं फक्त आम्ही दोघी आहोत.

**शासाहेब :** ( मिस्कीलपणे ) छे छे, इतक्या निबर नाहीत. कोवळ्या आहेत कोंबड्या.

**चारुशीला :** पांचटपणा पुरे. घरी कोण आलंय ते नीट पाहा तरी एकदा.

**शासाहेब :** ( न्याहाळत ) कोण आलंय ? अरेऽऽच्या ! म्हणजे... म्हणजे.... विठ्याची तू गंगी तर नव्हेस ? काय हो गंगीच ना ही ? गंगीच तू.

**चारुशीला :** ( नाक फेंदारीत ) विठ्या काय, गंगी काय ?

**शासाहेब :** होय होय...नक्कीच...गंगीच ही.

**चारुशीला :** ( उसळून ) अहो पण गंगी काय म्हणताय तिला ? पूर्वीसारखी धुणंभांडी करणारी मोलकरीण राहिली नाही ती आता. आमदार झालीय आमदार. विठ्ठलराव वारल्यावरत्यांच्या जागेवर निवडून आलीय ती. गंगूताई तरी म्हणा.

**शासाहेब :** ( खळाळून हसत ) अच्छा अच्छाऽऽ ! म्हणजे आमदार गंगूताई भांगट म्हणतात ती तूच होय गंगे ?

**चारुशीला :** पुन्हा गंगे ?

**गंगूताई :** म्हणू द्या. अवो जंतेला हाय म्या गंगूताई चांगट...आमदार...पर तुम्हास्नी म्या गंगीच.

**शासाहेब :** ( गडगडून हसत ) नाही नाही नाही....प्रिंसीपॉलसाहेब म्हणताहेत तेच बरोबर आहे. आता आम्ही तुला गंगूताईच म्हणायला हवं. तर गंगे, तू विठ्ठलच्या जागेवर निवडून आलीस, आमदार झालीस, फार छान झालं. विठ्या लेकाचा हुशार पण हरामखोर निघाला. मला त्यानं बुडवलं म्हणून म्हणत नाही. मी तर बुडायचाच होतो पण—छोड दो. मेलेल्या माणसाबद्दल फार वाईट बोलू नये, पण चित्रपट सृष्टीबद्दल मी जी काही स्वप्नं बघितली होती ती त्याच्या पायात खलास झाली.

**चारुशीला :** त्यात नवीन काय आहे ? तुम्ही स्वप्नं बघायची, बायको मुलानं हात पोळून घ्यायचे, नोकराचाकरानी इस्टेटी करायच्या, अशा अशात जन्म गेला आपला.

**शासाहेब :** असो असो. तरी पण गंगे तू आमदार झालीस ही फारच नामी गोष्ट घडली. आता काही तरी कार्य करून दाखीव आणि मंत्रीमंडळात चंचूप्रवेश करून घे.

**गंगूताई :** ( लाजत ) त्येची बी खटपट चालू हाय. मंजी दर गुरुवारी नेमानं शिरडीला जाऊन येत्ये मी. दर्सन घेतल्याबगर त्वांडात पान्याचा थेंब न्हाय घालीत मी.

**शासाहेब :** नाही, ते ठीक आहे...ठीक आहे...पण काही समाजकार्याला वाहून घे.

**चारुशीला :** ते तुम्ही कशाला सांगताय ? समाजकार्य कशाशी खातात ते तुम्हाला ठाऊक तरी आहे का ? मी सांगितलंय तिला. तिलाही पटलंय ते. गंगूताई आता झोपडपट्टीच्या कार्याला वाहून घेणार आहे.

**शासाहेब :** असं का ? छान छान. प्रिन्सीपॉलसाहेब, तुम्ही तर बहारच केलीत की. नेमकं माझ्या मनातलं सांगितलंत. तुला सांगतो गंगे—आय मीन गंगूताई— ( खिडकीतून समोरच्या झोपडीचा निर्देश करीत ) त्या त्या झोपडीत— उदाहरणादाखल सांगतोय मी—भला म्हणून एक म्हातारा आणि बाबल्या म्हणून त्याचा पोरगा राहातात. म्हातारा घरीच असतो. पण पोरगा गिरणीत कामाला जातो. मूळचे आमच्या सातारा जिल्ह्यातले शेतकरी. अगदी वाळवे तालुक्यातले. पण—

**चारुशीला :** अहो ते सगळं भारूड हिला कशाला सांगतात ? मी सगळं सांगितलंय तिला. आपल्या बंगल्या समोरची झोपडी उद्या सकाळच्या आत भुईसपाट करायची ऑर्डर देणार आहे ती कमिशनर साहेबांना.

**शासाहेब :** ही ही झोपडी ? भुईसपाट करणार ? उद्या सकाळी ?

**चारुशीला :** हो हो ही झोपडी, भुईसपाट करणार, उद्या सकाळच्या आत.

शासाहेब : अरे अरे अरे...मग ते बापडे कुठं जाणार हो ?
चारुशीला : ( उसळून ) तुम्हाला त्याची का काळजी ? जातील कुठंही मसणात.
शासाहेब : छे छे, स्मशानातदेखील राहायला जागा मिळत नाही आताशा.
चारुशीला : मग बोलवा त्या बाप-लेकांना पाहुणे म्हणून घरात राहायला.
शासाहेब : एवढं रागवायचं कारण नाही प्रिन्सीपॉलसाहेब. झोपडवासीयांच्या मागण्या तशा काही फार नाहीत. फक्त एक सार्वजनिक नळ, संडास—
चारुशीला : पण का म्हणून ? त्यांचा काय हक्क आहे या जमिनीवर ?
शासाहेब : तसा कोणत्याच जमिनीवर कोणाचाच हक्क नाही. सब भूमी गोपाल की.
चारुशीला : ते मला नका शिकवू. पंचा नेसून एक आश्रम काढा आणि दुनियेला सांगा गंगूताई, ही झोपडी उद्या सकाळच्या आत उखडली गेलीच पाहिजे. आजच्या आज तशी ऑर्डरच काढ.
शासाहेब : अहो ती एक आमदार.. ती कशी काय ऑर्डर काढू शकेल.
चारुशीला : ते तिचं ती बघून घेईल. तिचे आहेत वरपोत्तर वशिले. होय ना गं गंगूबाई ?
गंगूबाई : ( गोंधळून ) बगते ! इच्चार करून सांगत्ये.
शासाहेब : ( हसत ) अत्ता कसं आमदारासारखं बोललीस ? होणार...होणार— तू मंत्री होणार, बरं का गंगे...
( त्याच वेळी बाहेरून प्रशांत आत येतो. देखणा, उमदा, साहेबी पोशाखात. हातात ऑफीस बॅग. स्वभावाने शांत, अबोल, आदबशीर.)
चारुशीला : हा आला प्रशांत. अगदी वेळेवर आलास बाई एवढा वेळ गंगूबाई थांबली तशी तुझी भेट होतेय की नाही या काळजीत होते मी.
गंगूबाई : अगो बया बया ऽऽ ! ह्यो का परशांत ? केवढा बाप्या जालाया ?
प्रशांत : एक्स्क्यूज मी... पण तुमच्या दोन कोंबड्या चुकून समोरच्या झोपडीत शिरल्या होत्या.
शासाहेब : झोपडीत ? छे छे असं कसं होईल ?
चारुशीला : ( ओरडून ) झोपडीऽऽत ? म्हणजे प्रशांत केवळ कोंबड्या परत आणण्यासाठी तू झोपडीत गेला होतास ?
प्रशांत : छे छे, मी कशाला झोपडीत जाऊ ? फाटकापाशी मला बाबल्या भेटला. बाबल्यानंच आणून दिल्या त्या.
शासाहेब : बघा ऽऽ, आणि तुम्ही त्याची झोपडी उखडायला निघालात. मी तरी असा वेंधळा...कडक शिस्तीत वाढलेल्या कोंबड्या घरात कशा घुसतील ? ( असे म्हणत लगबगीनं जाऊ लागतात तोच ).
प्रशांत : छे छे, तुम्ही जायची गरज नाही आता पपा. मी खुराड्यात घातले आहे त्यांना ( आत जाऊ लागतो तशी ).

**चारुशीला :** प्रशांत, अरे क्षणभर तरी थांब. तुला भेटायसाठी गंगूताई मुद्दाम थांबलीय.

**प्रशांत :** ( गोंधळून थबकत ) गंगूताई ? म्हणजे पपा ऽऽ—

**शासाहेब :** जिच्याबद्दल तुला मी मागे एकदा बोललो होतो तीच ही गंगूताई घांगट. आता आमदार आहे.

**चारुशीला :** काऽय, काय बोलला होतात तुम्ही प्रशांतला ?

**शासाहेब :** काही नाही.... हा सहा महिन्याचा होता त्यावेळी गंगूताईनंच वर्षभर प्रशांतला संभाळला होता... म्हणजे धुणंभांडी करून शिवाय...

**चारुशीला :** तुझे पपा त्यावेळी सिनेमाच्या उचापती करीत होते.... आठवतंय का रे मेल्या ?

**गंगूताई :** वरीसभराचं लेकरू त्येची काय याद असनार त्येनला ?
( तेवढ्यात प्रशांत चटकन् वाकून नमस्कार करतो, तशी गलबलून... ) इतकं वाकून ? .. न्हाई न्हाई .. ह्यो मंजी लई लईच जालं.

**चारुशीला :** ( खुलून ) गंगे, तो माझ्या वळणात वाढलाय.

**शासाहेब :** ( त्याच वेळी नजर बाहेर खिडकीतून जात ) अरे ? ही कोंबडीची पिल्लं पुन्हा बाहेर ? कधी या कोंबडीच्या पिल्लांना वळण लागणार, देव जाणे ( लगबगीने जाऊ लागतात तशी— )

**चारुशीला :** यांचं एक तिसरंच. अहो चाललात कुठं ? मुलगा थकून भागून घरी आलाय, काही चहापाण्याचं तरी बघाल की—

**शासाहेब :** आलोच ( लगबगीनं बाहेर जातात ).

**चारुशीला :** पाहिलंस गंगूताई—हे अजून असं आहे. दिवसभर शाळेत मर मर राबायचं आणि घरात आल्यावर पुन्हा यांची उस्तवारी. जीव नकोसा झालाय मला. तरी—

**प्रशांत :** ममी तू काहीही नाही केलंस तरी चालेल. येताना मी ब्रेड घेऊन आलोय. माझा चहा मी करून घेईन.

**चारुशीला :** तू घेशील रे. पण यांनी काही तरी हातपाय हालवायला नकोत का ? बाहेर नाही तर निदान घरात तरी—

**प्रशांत :** पपा सगळं करतात ममी....त्याची जाहीर चर्चा नको.

**चारुशीला :** तू मेल्या त्यांच्याच बाजूनं बोलणार. तुझे लाड करतात ना ते....

**प्रशांत :** ते जाऊ दे. तुला बाहेर जायचंय आत्ता, एवढंच ना ?

**चारुशीला :** हो हो, जायचंय. कुठं निरवायसाठी नव्हे. तुझ्याचसाठी. तुला सांगून ठेवते गंगूताई, एकदा या पोराचे दोहोचे चार झाले की मी सुटले. तडक हृषिकेशला जाऊन सरळ मठातच राहाणार.

प. प्र. ग्रं. ग्रंथ, वाचनालय शाखा.
प्र. क्र. 29CE0 नों. दि 22-1-96
वि. 8186...... क्र. ..................

**गंगूताई** : तसं कशापाई? बाई आपून फॉरीणलाच जाऊ या. माझ्यासंग तुम्हासनीबी डेलीगेशणवर धाडाया सांगत्ये म्या शी. एम्. सायबांना.

**चारुशीला** : उज्जेड. भारत बघायला होईना अन् फॉरीनला जातेय.

**प्रशांत** : ताई, तुमच्याबद्दल पपांनी मला खूप सांगितलं होतं. आज भेटीचा योग आला. आनंद वाटला. मी लहान होतो त्यावेळी तुम्ही तरी माझा संभाळ केलात. धन्यवाद. येतो मी. नमस्ते. ( जाऊ लागतो ).

**चारुशीला** : थांब प्रशांत. मी चंदूलाल शेटजींच्या घरी जाते व ज्योतनला घेऊन येते.

**प्रशांत** : ज्योतनला ?

**चारुशीला** : हो हो, ज्योतनला, टंगळमंगळ पुष्कळ झाली. आज काय तो सोक्षमोक्ष करून टाका.

**प्रशांत** : सोक्षमोक्ष ?

**चारुशीला** : हो. तुम्हा आजकालच्या मुलांना प्रेम करून लग्न कसं ठरवावं ते वडीलधाऱ्यांनी शिकवायची वेळ आलीय. आज तिला मागणी घाल. तू तोंड उघडलं नाहीस तर ती बिचारी काय बोलणार ?

**प्रशांत** : ममी, मला जरा विचार करायला हवा.

**चारुशीला** : विचार पुष्कळ झाला. दोन वर्षं नुसती विचार करण्यातच गेली. मी सांगते मुलगी छान आहे. श्रीमंत घरातली, गोरीपान, नाकीडोळी नीटस, ग्रॅज्यूएट, शिवाय गाणंबिणं म्हणते, भरत काम करते, तशी फॅशनेबल आहे पण पुन्हा आज्ञाधारक. गरीब, अगदी घरेलु वळणातली. सांग तिला, तू मला आवडली आहेस म्हणून.

**प्रशांत** : मी पपांना सांगतो. ते—

**चारुशीला** : त्यांना कशाला ? तिला सांग. पुढचं मी बघून घेते. काऽय ?
( तो गप्प राहातो तशी ) म्हणजे गंमत बघ गंगूताई, या मुलाचा कल जाणून इंटरकास्ट मॅरेजसाठीदेखील मी तयार झाले आणि हा तिला विचारायला-देखील तयार होत नाही, म्हणजे काय म्हणायचं ?

**प्रशांत** : ममी मी पपांशी बोलतो. ते तुला सांगतील.

**चारुशीला** : का ? तुला सरळ माझ्याशी बोलता येत नाही ?

**प्रशांत** : बघतो, आधी पपांशी बोलतो. ( चटकन् पाठ वळवून आत जातो ).

**चारुशीला** : बोल नाही तर बोलू नकोस. मी ज्योतनला घेऊन येते आहे. पाहिलंस गंगूताई, अस्सा आहे हा चमत्कारिक मुलगा.

**गंगुताई** : बाई बाई.... काय सोन्यासारखं प्वार दिलंय वो देवानं तुम्हांस्नी. नाही तर आमची कारटी. पावण्याला नमस्कार कर म्हटलं तर आईलाच शिव्या-गाळी करत्यात.

**चारुशीला :** पुरे झालं कवतीक. तुला वाकून नमस्कार केला एवढ्यानं हुरळून जाऊ नकोस. ( खिडकीशी जात ) अहो अहो ऽऽ शासाहेब....
( शासाहेब "आलो आलो ऽऽ" अशी ओ देत येतात ) तिकडं काय चाललंय तुमचं ?

**शासाहेब :** अहो या पोरानं खुराड्याचं दार उघडं टाकलं. सगळ्या कोंबड्या–

**चारुशीला :** जळळ्या मेल्या कोंबड्या.

**शासाहेब :** जळून कसं चालेल ? प्रशांतचे पैसे गुंतले आहेत त्यांच्यात.

**चारुशीला :** कळलं ! मी चंदूलालजींच्या ज्योतनला घेऊन येते आहे.

**शासाहेब :** बरं आहे. या.

**चारुशीला :** तोवर तुम्हा बापलेकांना काय बोलायचंय ते उरकून टाका.

**शासाहेब :** छे छे....म....मला कुठं काय बोलायचंय ?

**चारुशीला :** तुम्हाला नसलं तरी त्याला बोलायचंय तुमच्याशी.

**शासाहेब :** असं म्हणाला तो ? तुमच्यापाशी म्हणाला ?

**चारुशीला :** हो.

**शासाहेब :** मग नक्कीच त्याला तुमच्याशी बोलायचंय. फक्त माझ्यामार्फत. थोडक्यात, मी म्हणजे एक बफर स्टेट किंवा पोस्टमन्.. इकडची डाक तिकडं पोचवणारा .

**चारुशीला :** ते तुमचं तुम्ही पाहा. पण प्रशांतला तयार करा. जरा प्रेम कसं कसं करायचं ते शिकवा त्याला.

**शासाहेब :** मीऽऽ? मी त्याला प्रेम कसं करायचं ते शिकवू ?

**चारुशीला :** तुमच्या एवढा व्यासंग दुसऱ्या कोणाचा आहे या शास्त्रात ?

**शासाहेब :** अहो काही तरीच काय बोलताय बाईसाहेब ?

**चारुशीला :** का ? त्या राजकन्या प्रभादेवीला बोल बोल म्हणता कशी कटवलीत ते विसरले नाही मी अजून.

**शासाहेब :** पंचवीस वर्षे झाली त्या घटनेला बाईसाहेब.

**चारुशीला :** म्हणून त्यातलं शहाणपण थोडंच मावळतंय ? मुलाला दोन धडे शिकवा त्यातले. आज हे लग्न ठरलंच पाहिजे. काय ?

**शासाहेब :** बघतो, प्रयत्न करतो. ( खिडकीतून बाहेर नजर जाते ) अरे या कोंबड्या....हॉक हॉक हॉक....( ओरडत बाहेर पळतात ).

**चारुशीला** अस्सा आहे गंगूताई आमचा हा संसार. चल बाई, सगळीकडं मलाच मरायला हवं...( चारुशीलाबाई गंगूताईला घेऊन जातात. बाहेर शासाहेबांचे "हॉक हॉक हॉक... हां हां हां...." चाललंच आहे. क्षणभराने एक गृहस्थ दबकत बाहेरून आत येतात. पायजमा, झब्बा, गळयात शबनम पिशवी, हातात छोटी सूटकेस, पायात कोल्हापुरी चप्पल्स. वय साठीचे. मुद्रा सदैव हसरी आणि

मिस्कील. सूटकेस खाली ठेवून सदर पाहुणे खिडकीशी जातात आणि हसत गर्जना करतात–" शासाहेब शासाहेब...मी आलोऽऽ!"

**शासाहेब** : ( बाहेरूनच ) अरे ? कोण भय्याऽ? तू.... ?

( असे आश्चर्योद्‌गार काढीत शासाहेब धावतच आत येतात. )

**शासाहेब** : (प्रेमानं हात धरत ) भय्या, तू कधी आलास ? कळवायचंस तरी ?

**भय्या** : शासाहेब अरे तुला किती धाप लागलीय...किती घामाघूम झाला आहेस. बैस बैस जरा...

**शासाहेब** : अरे या कोंबड्या रे ऽऽ एकेकीला पकडता पकडता जाम झालोय मी. बैस बैस–निचिंतीनं बैस...येतोच मी इतक्यात....( लगबगीनं जातात ).

**भय्या** : अरे पण...गेलाच. ( खिडकीतून पाहात ) ते बघ....ते बघ एक पिल्लू. झाडाच्या आड आहे बघ... लवकर येरे ..जायचंय मला परत... अरेऽऽच्या.. कमाल आहे तुझी शासाहेब....ते तुझ्या मागंच आहे.

( शासाहेबांची धांदल, धावपळ पाहून भय्यासाहेब मजेत हसत असतानाच चहाचा ट्रे घेऊन आतून प्रशांत येतो. घरगुती वेश. भय्यासाहेबांना पाहताच उचंबळून "भय्याकाका तुम्हीऽऽ?" असे आश्चर्यानंदानं ओरडत ट्रे टिपॉयवर ठेवतो. तशी भय्यासाहेब ताडकन वळतात आणि– "हॅल्लो माय बॉय...." असं म्हणत प्रशांतला कडकडून भेटतात. "किती दिवसांनी आलात हो काका ?" असं प्रशांत प्रेमभरानं म्हणतो. पण तिकडं दुर्लक्ष करीत प्रशांतचे दोन्ही खांदे धरून त्याला आपादमस्तक न्याहाळीत– )

**भय्या** : गट्टूलाल, आधी सांग कसा आहेस तू ?

**प्रशांत** : छान आहे की. पण गट्टूलाल काय ?

**भय्या** : बरं बजरबट्टू. एऽऽ जरा रोडावलास. काळवंडलास देखील.

**प्रशांत** : इथल्या हवेचा आणि खाण्यापिण्याचा परिणाम असेल.

**भय्या** : काही बिघडत नाही झंप्या. थोडं टॅनींगं व्हायलाच हवं. मातृभूमीला परवडणारा खुराक पचवायला शिकव पोटातल्या आतड्यांना. काऽय ?

**प्रशांत** : शिकवायला नको. दगड देखील पचायला लागलेत मला. पण पपा कुठे गेले एवढ्यात ? ( खिडकीशी जात– ) पपाऽऽ

**भय्या** : ते आपल्या फौजेला बराकीत ठाणबंद करण्याच्या उद्योगात गुंतलेत. काय रे, आमच्या या झंटूनं कुक्कुटपालनाचं झेंगाट कधीपासून मागं लावून घेतलं ?

**प्रशांत** : आता सहा महिने होतील की. पाहा, सहा महिन्यात तुम्ही इकडं आला नाहीत काका.

**भय्य** : कसा येणार ? ताडोबाच्या जंगलात आदिवासी पोरापोरींना घेऊन घोळ घालून बसलोय ना मी एक.

**प्रशांत** : खरंच काय प्रकरण आरंभलं आहेत हो भय्याकाका तुम्ही ?

**भय्या** : ते नुसतं असं उभ्या उभ्या मी सांगायचा नाही आणि तुला ते बसल्या बसल्या कळायचंही नाही. गंप्या, तू एकदा सवड काढून चार आठ दिवस ये आमच्या जंगल कँपवर मुक्कामाला. येताना आमच्या झंटूलाही घेऊन ये.

[ तेवढ्यात हाश हुश करीत शासाहेब येतात आणि बसतात. तशी... ]

**भय्या** : सगळया कोंबड्या मुलाबाळांसुद्धा अंत:पुरात दाखल झाल्या ना ?

**शासाहेब** : झाल्या. प्रशांत तुझी तरी कमालच आहे यार. खुशाल खुराडं सताड उघडं टाकलंस आणि—

**प्रशांत** : मी नाही पपा—

**शासाहेब** : मी नाही काय ? मघाशी दोन कोंबड्या आत टाकताना तूच दार उघडलं होतंस.

**प्रशांत** : अहो पण मी नंतर दार बंद केलं होतं. खिटीसुद्धा लावली होती.

**शासाहेब** : मग काय कोंबडीनं जाळीतून हात घालून खिटी काढली का रस्त्यावरला कोंबडा आला होता कडी काढायला ?

**प्रशांत** : पपा मी देवाशपथ सांगतो—

**भय्या** : बापलेकहो.... झगडा मत करो. खुराड्याचं दार मी उघडलं होतं.

**शासाहेब** : भय्या तू ऽऽऽ ?

**भय्या** : हो मी. बघतोस काय असा आ वासून ? अरे कोंबडीवाल्या, मला येऊन बराच वेळ झाला. तुझ्या बेगमसाहिबा बाहेर पडण्याची वाट पाहात मी फिरत होतो.

**शासाहेब** : तुला घरात यायला तिनं बंदी केलीय ?

**भय्या** : तो मोठा विषय झाला. पण फारच कंटाळा आला तेव्हा म्हटलं जरा गंमत करावी. दिलं खुराडं उघडून आणि सगळी चिलीपिली बाहेर काढली. हाय हाय, काय धमाल उडाली.

**शासाहेब** : चांगली गंमत केलीस बाबा. आता चहा पी आणि—

**भय्या** : टळ एकदाचा—असंच ना ? टळणार आहे बंधो, चहा पिऊन होताक्षणीच तुला गुडबाय करणार आहे.

**शासाहेब** : चघळपणा पुरे झाला. या खेपेला मी काही तुला आल्या आल्या जाऊ द्यायचा नाही. प्रशांत एक कप लागेल रे आणखी. ( प्रशांत वळतो तोच )

**भय्या** : थांब— जाऊ नकोस ( शबनम पिशवीतून ग्लास बाहेर काढीत ) आमचा पेला आमच्या पोतडीत. ओत यात चहा.

**शासाहेब** : आमच्या घरी कप मिळाला असता तुला.

**भय्या** : कशाला बाटवायची तुमची भांडी ? मी महारोग्यांच्या वस्तीवर काम करणारा, रात्रंदिवस त्यांच्यात राहाणारा माणूस...

**शासाहेब :** मला ठाऊक आहे ते सगळं. मला चालतं.

**भय्या :** प्रश्न तुझा एकट्याचा नाही राजा. चहा पी...चहा पी...अगोदर चहा पी. ( चहाचा घोट घेत ) व्वा ! फर्मास ! झंप्या लेका एवढा तीन-चार वर्षे जर्मनीला राहून आलास, तुला प्रेम कसं करावं ते देखील तुझ्या बापानं शिकवायला हवं काय रे ?

**प्रशांत :** ( गालात हसून ) काही तरीच काय काका ?

**शासाहेब :** भय्या, तो बाईसाहेबांचा आणि आमचा संवाद बाहेरून ऐकलास वाटतं ?

**भैय्यासाहेब :** अगदी सगळा ! बघतोस काय असा ? तुझ्या बंगल्याभोवतीचा बगीचा म्हणजे काय राजभवनची पार्क समजलास तू ? इच्छा नव्हती तरी तडातड एकेक शब्द कानात घुसत होते. अगदी राजकन्या प्रभादेवीला तू–

**शासाहेब :** ( दटावीत ) हां.. हां....हां ऽऽ भय्या–

**भैय्यासाहेब :** ओ हो हो ! हा पोरगा इथं आहे हे ध्यानातच आलं नाही माझ्या. सॉरी. तर हा चंदुलालजी म्हणजे ऽऽ

**शासाहेब :** पटेल पॉटरीचे मालक.

**भैय्यासाहेब :** म्हणजे एकेकाळचे तुझे पार्टनर. पुढं नेहमीप्रमाणं तू भांडून वगैरे वेगळा झालास आणि नंतर ठरल्याप्रमाणे धंद्याचा उत्कर्ष झाला इ. होय ना ? बहोत अच्छा ! तर ज्योतन त्यांची मुलगी काय ? मग गंप्या, तुझा काय विचार आहे ?

**प्रशांत :** तूर्त तरी काही नाही.

**भैय्यासाहेब :** मूर्ख आहेस. अरे तूर्तवाल्या–तूर्त नाही तर कधीच नाही. ते काही नाही. तुझा बाप तुला शिकवायला तयार नसला तरी मी तुला दोन धडे सांगतो. तू नुसते गिरव की ती पोरगी तुझ्या पायांवर एकदम लोळणच घेणार. त्या पोरीला घेऊन जा कुठं तरी...हँगिंग गार्डनवर आणि एखाद्या झाडाखाली मुक्काम ठोक आणि ठणकाऊन म्हण–

( स्वतः भसाड्या आवाजात गात )–

कभी कभी मेरे दिल में खयाल आता है
के जैसे तुझको बनाया गया है मेरे लिये.

काय रे शासाहेब–रस्ता बरोबर आहे ना ? तू त्यातला दर्दी, आणि शिवाय–

**शासाहेब :** अरे पुरेरे !

**भैय्यासाहेब :** अरे पुरे काय ? चुकत माकत, ठेचा खात मिळवलेलं हे ज्ञान समस्त तरुण मंडळींना शिकवण्यासाठी खरं म्हणजे तू एक ग्रंथच लिहायला हवास.

**प्रशांत :** काका, कोणी काही शिकवून माझ्यावर काही परिणाम होणार नाही. मी आहे इंजिनियर. रोमान्स कशाशी खातात ते मला ठाऊक नाही.

**भैय्यासाहेब :** अरे इंजिनियरच्या बच्चा तरीसुद्धा तू माणूसच आहेस ना? अरे, तुम्हा तरुण पोरांना झालंय तरी काय आजकाल? पहावं तो अकाली प्रौढ— अगदी जख्ख म्हातारा. कुठं बोंबलला तुमचा रोमान्स? नो नो धिस वोंट डू! अरे तुझ्या वयाचा असताना या शासाहेबाने—

**शासाहेब :** भैय्या ऽऽऽ—

**भैय्यासाहेब :** केवढा लोकसंग्रह केला होता? फक्त लोकसंग्रह. दुसरं तिसरं काहीही म्हणत नाही मी. ( हसत ) बरं ते सोडून दे....आता आधी मला एक सांग— ( चहाचा घोट घेत ) बंड्या, तुझं नोकरीत कसं काय चाललंय रे?

**प्रशांत :** तसं बरं चाललं होतं.

**भय्या :** बरं चाललं होतं? म्हणजे नोकरी चालू आहे ना?

**प्रशांत :** आजच राजीनामा दिला. काही प्रॉब्लेम्स होते.

**भय्या :** प्रॉब्लेम्स काय होते? वरिष्ठांशी तटा, सहकाऱ्यांशी मतभेद, लाचलुचपतीला विरोध, इत्यादी इत्यादी वगैरे वगैरे... राईट? ( प्रशांत गालात हसतो तशी ) मग कसचा या देशातल्या चाकरीत रुळणार तू?

**प्रशांत :** नाही रुळलो तर रूळ सोडून दुसऱ्या रुळावर जाईन. आपलं पोट आपल्या हातावर. जगात कुठंही गेलो तरी मीठ-भाकरीला तर कमी पडणार नाही?

**भय्या :** आय सी! ( क्षणमात्र त्याला न्याहाळत ) शासाहेब जरा खुराड्यातली पिलं बाजूला ठेव आणि या पिल्लाच्या डोक्यात कोणता किडा वळवळतोय त्याचा शोध घे जरा.

**शासाहेब :** ( आपल्याच तंद्रीत ) किडे? छे छे पिल्लांना किडे घालायची गरज पडत नाही. केंद्रावर पॅकबंद पुडे मिळतात पिल्लांच्या खाण्याचे. फक्त—

**भय्या :** ह्या ऽऽ! आता या झंटूपुढे कोणती गीता वाचायची? (हसतात).

**शासाहेब :** (दचकून) का? काय झालं म्हणत होतास तू भय्या?

**भय्या :** कोंबडीवाले, अंडी काय भावानं विकता हल्ली?

**शासाहेब :** फुकट वाटतो शेजारपाजाऱ्यांना. काय म्हणणं आहे तुझं?

**भय्या :** (हसत) एकूण हिशेब तोच पडत असला पाहिजे.

**शासाहेब :** पडला तर पडू देत. पण भय्या, आजही तू इथे मुक्कामाला राहाणार नसलास तर मात्र —

**भय्या :** अरे अरे....पण हो हो हो. मुंबईत मी राहाणार असतो तरचा सवाल आहे ना? मुंबईत राहाणार असतो तर मी नक्कीच इथंच मुक्काम ठोकला असता.

**प्रशांत :** म्हणजे भय्याकाका, तुम्ही खरोखरीच आज जाणार आहात?

**भय्या :** ( ग्लास पिशवीत टाकीत उठत ) आज नव्हे—आता जाणार आहे. अरे गद्दूलाल, बजरबट्टू—तिकडे ताडोबाच्या जंगलात माझी पिल्लं उघड्यावर टाकून आलोय मी.

**शासाहेब :** (अजीजीनं) पण भय्या. माझं जरा ऐक... त्यावेळी प्रिन्सिपॉलसाहेब तुला काहीही बोलून गेले असले तरी—

**भय्या :** (नाकावर बोट ठेवीत) शूऽऽक. आपल्या पिढीतले गुंते आपल्यापाशी. अरे शा, तू भेटलास, हा बजरबट्टू भेटला, तुझी पिल्लं पाहिली—घोटभर चहा तुमच्या संगतीत घेतला. रग्गड झालं...सगळं भरून पावलं. (घड्याळात पाहात) आता गाडी गाठायला हवी.

**प्रशांत :** (गोंधळून) कसले गुंते ? काय भानगड आहे ही पपा ?

**भय्या :** भानगड बिनगड काही नाही गुंडोपंत... तुम्ही हे रूळ सोडून दुसऱ्या रुळावर जायचं असं नक्की ठरवलंत, म्हणजे आम्हाला कळवा. 'टाटा' करायला येऊ आम्ही विमानतळावर. अच्छा...बाय बाय...

(झटकन सूटकेस उचलून निघून जातात. शासाहेब लगबगीनं— " अरे पण... माझं ऐक भय्या...." असं म्हणत मागोमाग जातात. पण ते फाटकापर्यंत पोचण्यापूर्वीच भय्यासाहेब नाहीसे झाले असतात. प्रशांत तसाच विचारमग्न उभा. शासाहेब परत येतात तेच मुळी—)

**शासाहेब :** छे छे छे — याच्या पायाला देवानं पंख लावलेत की काय ? अरे फाटकापाशी मी पोचेतोवर हा गायब ? (बसत) असा हा प्रत्येकवेळी धूमकेतूसारखा अकस्मात उगवतो आणि चटका लावून चालता होतो.

**प्रशांत :** ( विचारमग्न मुद्रेने ) पपा, तुम्हाला एक गोष्ट विचारू ?

**शासाहेब :** अरे राम राम राम ! हे पाहा, प्रिन्सिपॉलसाहेबांच्याबद्दल जर काही विचारणार असलास—

**प्रशांत :** नाही. ते तुमच्या पिढीतले गुंते तुम्हीच सोडवा. मी माझ्याबद्दल विचारतोय. मी हा देश सोडून परत जर्मनीला जायचं ठरवलंय हे भय्याकाकांना कोणी सांगितलं ? तुम्ही ?

**शासाहेब :** ( चक्रावत ) क...काय काय काऽय ? काय म्हणालास ? तू हा देश सोडून जर्मनीला जायचं ठरवलंस—

**प्रशांत :** हे भय्याकाकांना कोणी सांगितलं ?

**शासाहेब :** जहन्नमूमध्ये गेला तुझा भय्याकाका. पण म्हणजे तू खरोखरीच जर्मनीला जाणार आहेस ?

**प्रशांत :** हो.

**शासाहेब :** सरकारतर्फे ?

**प्रशांत :** नाही. अगदी स्वखर्चानं.

**शासाहेब :** आणखी एखादी पदवी घेण्यासाठी की ऽऽ

**प्रशांत :** नाही. चक्क नोकरी करण्यासाठी.

**शासाहेब :** म्हणजे...म्हणजे... थोडा जास्त अनुभव मिळावा म्हणून काही महिन्यांसाठी. फार तर एखाद दुसऱ्या वर्षासाठी–

**प्रशांत :** नाही. कायमच्या वास्तव्यासाठी.

**शासाहेब :** अरे चल हट् ! मी असा बावळा खुळा बघून चेष्टा करतोस होय गुलामा माझी ?

**प्रशांत :** पपा मी चेष्टा करीत नाही तुमची. मी खरं तेच बोलतोय. आय मीन इट !

**शासाहेब :** अरे पोरा, तुझ्या एकूण आयुष्यक्रमाबद्दल तुझ्या आईनं केवढे बेत ठरवले आहेत –

**प्रशांत :** माझे प्लॅन्स वेगळे आहेत पपा.

**शासाहेब :** तुझ्या आईसमोर हे....हे....बोलण्याची हिम्मत आहे तुझी ?

**प्रशांत :** प्रसंग पडलाच तर बोलावं लागेल मला, पण–

**शासाहेब :** तू महामूर्ख आहेस. या घरात परमेश्वरासारखीच सर्वशक्तिमान अशी तुझी आई राज्य करते आहे. तिच्या मर्जीशिवाय बागेतलं एक पान हालत नाही की एक फूल फुलत नाही हे तुला ठाऊक नाही का ?... ( प्रशांत गालात हसत मानेनं होय म्हणतो ) आणि तरी देखील तू, मी अमुक ठरवलंय, अशी बेछुट भाषा बोलू धजावतोस ?

**प्रशांत :** पपा, तुम्ही नाही ममीच्या इच्छेविरुद्ध कोंबड्या पाळल्यात ?

**शासाहेब :** ते वेगळं आहे, पोरा, ते वेगळं आहे. एक तर तुझ्या ममीच्या हिशेबी मी एक वाया गेलेला कंडम माणूस आहे. घरातल्या घरात हा उद्योग चालतो म्हणून तिनं मला फक्त क्षमा केलीय.

**प्रशांत :** ममीचे हिशेब वेगळे, माझे वेगळे...

**शासाहेब :** मोठ्यानं बोलू नकोस चांडाळा ऽऽ तुझी ममी फाशी देईल.

**प्रशांत :** मला ऽऽ ?

**शासाहेब :** नव्हे मला. ( तो हसू लागतो तशी ) हसू नकोस पोरा ऽ ऽ तुझ्या ममीला आधीच एक जबरदस्त शंका आलीय.

**प्रशांत :** ( हसू आवरीत ) कसली ?

**शासाहेब :** आज ना उद्या तू माझ्याच वळणावर जाणार, आणि–

**प्रशांत :** छे छे...त्यात काही तथ्य नाही...ते खरं नाही. तेवढी माझ्यात हिम्मत नाही.

**शासाहेब :** म्हणून तुला सांगतो. मूर्खांच्या नंदनवनात राहू नकोस. तू कुठंही जात नाहीस...जाणार नाहीस....जाऊ शकत नाहीस. तुझ्या ममीनं, तुझं जे जे काय होणार आहे ते सगळं आधीच ठरवून टाकलंय. अगदी तारीखवार. सगळं काही तस्संच घडणार आहे.

**प्रशांत :** पण पपा––

**शासाहेब :** अरे तुला सांगतो, कायमच्या वास्तव्यासाठी आपण पुण्याला बंगला

बांधू या...ही मुंबई नको....यासाठी मी जीवाचा कमी का आटापिटा केला ? पण शेवटी काय झालं ? तुझ्या ममीनं जे ठरवलं, तेच झालं. अरे तुझी ममी म्हणजे ऐरी तैशी मामुली नारी नाही. ती साक्षात् नियतीची औलाद आहे. ती म्हणेल, बोलेल, तसंच घडणार.

**प्रशांत** : (हसत) काही तरीच काय पपा—

**शासाहेब** : काहीतरीच नाही बेटा— भृगूसंहितेतील तिची पूर्वजन्मीची पत्रिका अभ्यासून सावधपणे विधान करतोय मी हे.

**प्रशांत** : म्हणजे पपा तुम्ही....तुम्ही आता ज्योतिषशास्त्राचा अभ्यास आरंभलाहेत ?

**शासाहेब** : केवळ गंमत.. एक हौस म्हणून...म्हणजे आपल्या आयुष्यात, आपल्या प्रत्येक संकल्पाचे दरवेळी असे तीन तेरा का वाजतात, त्याचा शोध घ्यावा म्हणून मी—

**प्रशांत** : – (हसत) तुम्ही खरोखरीच ग्रे ऽ ट आहात.

**शासाहेब** : शिवाय या कोंबड्यांचा कोणी भरंवसा द्यावा ? मुंबईच्या या प्रदूषणात एखाद्या रात्रीत सगळ्या टवळ्या रोग लागून पटापट मरणार आणि माझे घरीदारी वांधे करणार. तेव्हा वेळीच शहाणपणानं...

(प्रशांत खूप मोठ्यानं हसू लागतो तशी—) प्रशांत, तुझ्या हसण्याचा मला राग नाही. कारण पूर्वी मी काय काय केलंय आणि माझं काय काय झालंय, हे तुला ठाऊक नाही.

**प्रशांत** : (एकदम गंभीर होत) पपा ते मला सगळं ठाऊक आहे.

**शासाहेब** : छे छे...शक्यच नाही.

**प्रशांत** : मी पुन्हा सांगतो पपा, तुम्ही खरे कसे आहात आणि तुमच्या आयुष्यात काय काय घडलंय, ते मला ठाऊक आहे.

**शासाहेब** : (क्षणमात्र गांगरून, थबकून, घाम पुसत) म्हणजे...म्हणजे... मी खरा कसा आहे ते तुझ्या ममीला कळलं नाही, पण तुला कळलंय असं तर तुला—

**प्रशांत** : (थंडपणे) तसंच मला म्हणायचंय.

**शासाहेब** : तर मग अगोदर एक सिगरेट दे मला. आणि त्याआधी बाहेरचं दार लावून घे. नाही तर तुझी ममी टपकेल आणि—

**प्रशांत** : (सिगरेट पेटी देत) पपा, मी ममीच्या समोर सिगरेट ओढतो.

**शासाहेब** : (सिगरेट शिलगावीत) तुझी गोष्ट वेगळी, माझी वेगळी. तू मुलगा आहेस तिचा, मी नवरा आहे. तुला सगळ्या गोष्टी माफ आहेत. मला माफी नाही... कारण... (भका भका धूर सोडून) प्रशांत, मला वाटतं तुझा काही तरी घोटाळा होतोय. म्हणजे, तुला माझ्या एकूण छंदफंद वा उपद्व्यापांची फारच जुजबी आणि ऐकीव माहिती असावी, असा माझा तर्क होतोय.

**प्रशांत :** ( थंडपणे ) घोटाळा वगैरे काही नाही. मला सगळ्या, सगळ्या, सगळ्या घटनांची अगदी तपशीलवार माहिती आहे.

**शासाहेब :** असं ? कोणी दिली ही माहिती ? प्रिन्सिपॉलसाहेबांनी ?

**प्रशांत :** पपा, ममीवर तुम्ही फारच अन्याय करता आहात.

**शासाहेब :** ( सुस्कारून ) हूं ! मग तुला माहिती मिळाली कशी ?

**प्रशांत :** पपा, चौकस बुद्धीच्या मुलानं ठरवलंच तर आपल्या आवडत्या वडिलांची माहिती गोळा करणं इतकं कठीण नसतं.

**शासाहेब :** तू काय मला आदर्श माणूस समजतोस ?

**प्रशांत :** मी ' आवडते वडील ' असा शब्द वापरलाय पपा. आदर्श माणसं देखील आवडती असतातच असं नव्हे. उदाहरणार्थ ममी.

**शासाहेब :** मग नक्कीच तुझी काही तरी गफलत झालीय. प्रशांत, एरवी तू माझ्याशी एवढ्या आदरानं बोललाच नसतास. अरे मी एक कंडम माणूस.

**प्रशांत :** भलतंच काय बोलताय पपा ?

**शासाहेब :** अरे खरंच ! तीर्थरूपांनी माझ्या नावे चाळीस हजार रुपये ठेवले होते. पण ऐन तारुण्यात मी ते उडवून टाकले, हे तुला ठाऊक आहे ?

**प्रशांत :** उडवून टाकले नाहीत. तुम्ही एक प्रोप्रायटरी शाळा काढलीत.

**शासाहेब :** तेच रे ! शाळा काढली मोठ्या झाकीत. पण झक् मारीत सोसायटी स्थापन करून सहकाऱ्यांच्या स्वाधीन शाळा करावीच लागली ना मला ?

**प्रशांत :** तेही खरं नाही. पपा, भिडे गुरुजी तुमचे शिष्य. त्यांना तुम्ही घडवलंत. तुम्ही त्यांना शाळेत ओढून आणून शिक्षक केलंत. सोसायटी स्थापन करण्याची कल्पना तुम्ही त्यांच्या डोक्यात भरवलीत आणि शेवटी तुम्हीच त्यांच्याशी भांडून बाहेर पडलात.

**शासाहेब :** ( उसळून ) तो भिड्या, आता मोठा गुरुजी झाला असला तरी एक नंबरचा गाढव माणूस आहे, असं माझं स्पष्ट मत आहे.

**प्रशांत :** पपा, भिडे गुरुजी आजही तुम्हाला फार मानतात.

**शासाहेब :** ( रागानं ) असेल. पण त्याचं मराठी शुद्धलेखन फार वाईट आहे. आशीर्वाद मधला ' शी ' दीर्घ असतो हे सुद्धा त्या गधड्याला कधी कळलं नाही आणि हा म्हणे शाळेचा प्राचार्य !

**प्रशांत :** ( गालात हसत ) आणि तरीदेखील जिवापाड प्यार असलेली तुमची शाळा तुम्ही त्यांच्याच स्वाधीन केलीत ?

**शासाहेब :** नापासात पहिला नंबर म्हणून.

**प्रशांत :** तरी देखील दहा हजाराचं नुकसान सोसून शाळा तुम्ही त्यांच्याच स्वाधीन केलीत.

**शासाहेब :** दहा हजाराचं नुकसान म्हणजे ?

**प्रशांत :** शाळेवर तुम्ही खर्च केलेत चाळीस हजार. तुम्हाला मिळाले फक्त तीस.

**शासाहेब :** ( उसळून ) हेही शपथ मोडून त्या भिड्यानंच सांगितलं तुला ?

**प्रशांत :** हो–जेसुइट मिशनऱ्यांच्याप्रमाणं शाळा चालवावी अशी तुमची इच्छा होती. पण—

**शासाहेब :** प्रशांत, एस. एस. सी. च्या वेळी मी तुला त्या भिड्याकडं शिकवणीला प ठवला—

**प्रशांत :** तुम्ही नव्हे पपा–ममीनं.

**शासाहेब :** तेच रेऽऽ, आम्ही दोघं एकच. पण शिकवणीच्या वेळी हा गलिच्छ, पोट-भरू इसम, तुला गणित शिकवीत होता की माझा आणि एकूण शाळेचा वृत्तांत तुला सांगत होता ?

**प्रशांत :** पपा, त्यांनी आपण होऊन मला काहीही सांगितलं नाही.

**शासाहेब :** मग तुला कसं कळलं ?

**प्रशांत :** ( गालात हसत ) चौकस बुद्धी !

( क्षणमात्र अवाक होऊन शासाहेब गालात हसणाऱ्या प्रशांतकडे बघतच राहातात. मग क्षणभराने–)

**शासाहेब :** हूं ऽऽ ! तर मग... म्हणजे तुझी चौकस बुद्धी उत्तरोत्तर वाढतच गेली असणार ?

**प्रशांत :** ( गालात हसत ) अर्थात. वयोमानाप्रमाणं !

**शासाहेब :** ( सुस्कारून ) हूं ऽऽ ! मग अर्थातच राजकन्या प्रभावती देवीचं ते प्रकरण, चित्रपटाच्या पायात मी दिवाळखोर झालो ती गोष्ट....

**प्रशांत :** ( थंडपणे ) मला ठाऊक आहे.

**शासाहेब :** आणि तरी देखील तुला माझ्याबद्दल प्रेम वाटतं म्हणजे तू भलताच संत सज्जन दिसतोस. एरवी हे एवढे औदार्य—

**प्रशांत :** औदार्य वगैरे काही नाही पपा. मला तुमच्यातला अबन्डन् आवडतो. ममी मला लहानपणापासून फक्त टीचर वाटते.

**शासाहेब :** मोठ्यानं बोलू नकोस चांडाळा...मी येईल इतक्यात.

**प्रशांत :** आली तर येऊ दे मी तिला घाबरत नाही.

**शासाहेब :** अरे तू कायमच्या वास्तव्यासाठी जर्मनीला जातो आहेस हे कळल्यावर ती जो थयथयाट करील—

**प्रशांत :** तो तुमच्यापुढं. माझ्यापुढं तिची हिंमत नाही.

**शासाहेब :** हिंमत नाही म्हणजे ?

**प्रशांत :** कारण तिला ठाऊक आहे की मी काही उत्तराला प्रत्युत्तर करीत बसणार नाही. सरळ बॅग उचलेन आणि चालता होईन. तुमचं तसं नाही. ममीला सोडून तुम्ही जाणार कुठं ?

**शासाहेब :** ( न्याहाळत, सुस्कारून ) हूं ऽ, फारच भारी माणूस निपजलास तू आमच्या घरात प्रशांत, ( थबकून ) पण मला एक सांग, इथे तुला काय कमी आहे आणि जर्मनीत तुला जास्त काय मिळणार आहे, म्हणून तू हा बेत ठरवला आहेस ?

**प्रशांत :** त्यावर आपण जरूर चर्चा करू. अट एवढीच आहे की तुम्ही मला कळेल अशा भाषेत बोललं पाहिजे आणि आपलं बोलणं एकमेकाला कळेनासं वा आवडेनासं झालं की न रागावता बोलणं थांबवलं पाहिजे.

( शासाहेबाची नजर दाराकडे जाते. दारात चारुशीलाबाई प्रक्षुब्ध मुद्रेनं उभ्या. तशी शासाहेब गांगरतात आणि— ) या या.... अगदी वेळेवर आलात तुम्ही. तुमचे चिरंजीव—

**चारुशीला :** ( जरबेनं ) ' तुमचे ' म्हणू नका. आपले. कायमच्या वास्तव्यासाठी जर्मनीला जायला निघालेत, हेच ना ?

**शासाहेब :** हो हो, तेच मी त्याला विचारतोय की—

**चारुशीला :** इथं काय कमी आहे, आणि तिथं काय जास्त मिळणार आहे ?

**शासाहेब :** हो हो बरोबर.

**चारुशीला :** काय म्हणण आहे त्याच ?

**शासाहेब :** म्हणणं... म्हणणं म्हणणं म्हणजे ऽ ऽ... काय म्हणणं आहे रे तुझं ?

**प्रशांत :** ममी, ' इथे काय कमी ' आणि ' तिथे काय जास्त ' याबद्दलचे माझे आणि तुमचे हिशेब जुळणारे नाहीत. आपण एका घरात रहात असलो तरी आपली जगेसुद्धा भिन्न भिन्न आहेत.

**चारुशीला :** अरे पण मेल्या तुझे हिशेब काय आहेत ते तरी सांगशील की नाही आम्हाला.

**शासाहेब :** (चाचरत) त्याबद्दल तो तुमच्या-माझ्याशी काही एका अटीवर बोलणार आहे. अट एवढीच की त्याला कळेल अशा भाषेत आपण बोललं पाहिजे आणि कळेनासं झालं की न रागवता बोलणं थांबवलं पाहिजे.

**चारुशीला :** म्हणजे का ऽ य ? आम्ही काय कानडीत बोलतो त्याच्याशी ?

**प्रशांत :** भाषा मराठीच असली तरी वयोपरत्वे तिच्यातसुद्धा जनरेशन गॅप पडते.

**चारुशीला :** तू परदेशात जाऊन राहायचं ठरवलं आहे म्हणतोस, आई-बापांचा काही विचार ? म्हातारपणी तरी आमचा मुलगा आमच्याजवळ असावा असं आम्हाला वाटू नये का ?

**प्रशांत :** जरूर वाटावं. त्यासाठी तुम्हाला बरोबर न्यायची तयारी आहे माझी. ते शक्य नसेल तर मी वरचेवर इथं येऊन भेटेन तुम्हाला. विमानामुळं युरोपचा प्रवास हा काही तासांचाच झालाय.

चारुशीला : पण इतक्या तातडीनं परदेशात कायमच्या वास्तव्यासाठी जायची गरज काय पडलीय ?

प्रशांत : तातडीची गरज निर्माण झाली. कारण पहिल्या दोन नोकऱ्यांप्रमाणंच या नोकरीतूनही मला आज सन्मानपूर्वक मुक्त करण्यात आलं.

चारुशीला : म्हणजे ? नोकरी सोडलीस तू ?

प्रशांत : सोडावी लागली. माझ्या याही कचेरीत पैसे खाल्ल्याशिवाय बिनबोभाटपणे नोकरी करता येण्यासारखी परिस्थिती उरलेली नाही. दुसरी गोष्ट माझ्या शास्त्रात मी जे नवे अत्याधुनिक ज्ञान जर्मनीत पैदा करून परतलोय, त्याची आमच्या वरिष्ठांना मुळीच गरज नाही. प्रत्येक वेळी—"तुमचा शहाणपणा तुमच्या जर्मनीत जाऊन दाखवा. इथे हे सगळे पूर्वापार चालत आल्याप्रमाणेच चालणार. तुम्हाला ते पसंत नसेल तर राजीनामा द्या आणि मोकळे व्हा—" हे शब्द ऐकावे लागले. थोडक्यात वरिष्ठांना माझे ज्ञान नको आणि हाताखालच्या कामगारांना मी दिलेलं काम अंग मोडून करायला नकोय. मला पैसे खायला नको आहेत. मग मी इथं कसा राहू ?

चारुशीला : तू सांगतोस त्यात नवीन काही नाही आणि देशान्तर करण्यासारखं तर त्यात काहीच नाही. आपण चालू माणसासारखं राहावं.

प्रशांत : म्हणजे डोळ्यावर कातडं ओढून निबरपणानं आणि निर्लज्जपणानं.

चारुशीला : तुला प्रत्येक गोष्ट वेडीवाकडी आणि उलटीच दिसते का रे ?

प्रशांत : ममी तुला सरळ साधा विचार समजेनासा झाला काय ?

चारुशीला : अरे बाळा, तसं काय—अलिकडं खूप माणसं पैसे खातात, कामं करीत नाहीत. त्यात कोणी फारसं गैर मानीत नाहीत.

प्रशांत : हो आणिक अलीकडं खूप माणसं जसे पैसे खातात तशी दारूही पितात.

चारुशीला : हो पितात.

प्रशांत : आणिक केवळ चैन करायची म्हणून बाहेरख्यालीपणा करतात.

चारुशीला : हो करतात.

प्रशांत : प्रसंगी ऑफीसमधल्या गोऱ्यागोमट्या मुलींच्यावरही डोळा ठेवतात.

चारुशीला : हो हो ठेवतात.

प्रशांत : तर मग मी हे सगळं केलं तर चालेल काय ?

चारुशीला : अरे मेल्या आपल्या आईला कोणी असले प्रश्न विचारतात का ?

प्रशांत : तर मग मी काय म्हणतो हे तुला समजायला हवं ममी.

चारुशीला : मला समजत नाही, समजलेलं नाही आणि कधीही समजणार नाही. आपला देश सोडून तू गेलेलं मला खपायचं नाही. इथं तू राहावंस यासाठी आम्ही काय करावं ते सांगणार असलास तर सांग.

प्रशांत : ठीक आहे ममी. आता जरा उलट रीतीनं आपण हा प्रश्न सोडवू या.

माझी कारणं तुम्हाला पटत नाहीत. तर आता असं करू या मी या देशातच का राहावं याबद्दल मला पटेल असं फक्त एकच कारण सांगा. मला पटेल असं एकच कारण मिळालं की माझं जाणं रद्द.

**चारुशीला :** अहो अहोऽ.. नुसती गंमत काय ऐकत बसलात. त्याला एकच कारण हवंय ते विचार करून सांगा की ?

**शासाहेब :** त्याला नुसती कारणं सांगून भागणार नाही बाईसाहेब, ती त्याला पटायला हवीत.

(तेवढ्यात एक देखणी तरुणी प्रवेशते तशी—)

**चारुशीला :** बरी वेळेवर आलीस बाई ज्योतन. मला सांग हा आपला देश सोडून सगळा जन्म परदेशात घालवणं तुला तरी योग्य वाटतं का ?

**ज्योतन :** मला तितकंसं योग्य वाटत नाही पण ताई, प्रशांतची इच्छा असेल तर माझी काही ना नाही. शेवटी ज्याच्याबरोबर जन्म काढायचा त्याची मर्जी संभाळायला नको का ?

**चारुशीला :** अग पण आपल्या देशाबद्दल काही भक्ती, माया, प्रेम वगैरे वाटतं की नाही तुम्हा दोघांना ?

**ज्योतन :** मला वाटतं... पण थोडं थोडंच....

**शासाहेब :** थोडं थोडं ? म्हणजे ?

**ज्योतन :** म्हणजे कॉन्व्हेंटमधे आमचं शिक्षण झालंय ना त्यामुळं असेल. पण त्या शाळेत देशाबिशापेक्षा आकाशातल्या बापावर जास्त प्रेम करायला शिकवतात. पण प्रशांतचं मत निराळं आहे. तो म्हणतो की भारत हा मुळी एक देशच नाही. तो एक प्रदेश आहे, म्हणून आपल्याला बेताचंच प्रेम वाटतं.

**चारुशीला :** काय ? काय म्हणालीस ? काय रे भारत हा देश नाही ? फक्त प्रदेश आहे. ?

**प्रशांत :** ममी एकदम भडकू नकोस. माझं म्हणणं प्रथम नीट समजून घे. या प्रदेशात ब्रिटिश अंमल जारी होता तेव्हा भारत हा एक देश होऊ पाहात होता. त्यावेळी देश सेवेचं कंकण बांधून आपली आयुष्ये मोठमोठ्या कार्यासाठी भिरकावून देणाऱ्या महात्म्यांनी हा प्रदेश गजबजला होता. पण ब्रिटिश लोक निघून गेले आणि स्वातंत्र्य मिळाले. देश सेवा वगैरे संपली, या प्रचंड भूप्रदेशात ब्रिटिशांच्या पूर्वी होती तशी छोटी मोठी स्वतंत्र राज्ये निर्माण करण्याचे काम जोरात चालू आहे. सत्तेसाठी वा पैशासाठी हवी ती पापकर्मे करणाऱ्यांचा पूर्वीप्रमाणेच पुन्हा एकदा सुळसुळाट झालाय. सामान्य जनतेला फसवण्यासाठी म्हणून पुढारी वगैरे मंडळी, लो. टिळक, म. गांधी, स्वा. सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस वगैरे महात्म्यांची सारखी नावे उच्चारत असले तरी ते केवळ दाखवण्याचे दात आहेत. जो तो आपली पोळी भाजून घेण्याच्या खटपटीत आहे.

**चारुशीला :** अरे पण तुमचा जन्म या मातीतच झाला ना ? मग आपल्या मातीचे तरी ऋण फेडाल ?

**प्रशांत :** मम्मी, जगात सगळीकडे माती एकच आहे. हवा पाणी बदलत असले तरी आपण सगळी या पृथ्वीमातेचीच लेकरे आहोत. सध्याच्या अवकाशयानाच्या युगात देशांच्या सीमांना फारसा अर्थ उरला नाही. तसाच कोण कोणत्या मातीत उपजला यालाही फारशी किंमत देण्याचं कारण नाही. पंजाबी माणूस केरळात जाऊन नोकरी करतो तर मद्रासी माणूस पिढ्यान् पिढ्या पुण्या-मुंबईत सुखानं नांदतो. यात जर काही गैर नाही तर भारतातल्या माणसाने युरोपात जाऊन नांदले तर बिघडले कुठे ? सध्याच्या परिस्थितीत आपल्याला रुजायला कोणती माती योग्य आहे एवढेच त्याने पहावे. परदेशात म्हणजे अगदी रामराज्य आहे असे नाही. भ्रष्टाचार तसा सगळीकडेच आहे. पण भारत नामक उप-खंडात तो निर्लज्जपणे राजरस्त्याने मिरवतो आहे, आणि सदाचार मात्र हास्यास्पद आणि केविलवाणा ठरलाय. म्हणून स्वच्छ आणि स्वाभिमानी जीवन जगण्याचा ज्याचा हट्ट असेल त्याने स्वतःला रुजण्यासाठी त्यातल्या त्यात बरी माती शोधून काढली पाहिजे, नाही तर काळवंडलेले लाचार जिणे निमूटपणे पत्करले पाहिजे.

**चारुशीला :** अरे पण शहाण्यांनो, ही—ही परिस्थिती बदलायची कोणी ? तुमच्यासारख्या ताज्या रक्ताच्या तरुणांनीच ना ?

**प्रशांत :** मम्मी, तू मला पुढाऱ्यासारखे प्रश्न टाकू नकोस. जरा सामान्य माणसाप्रमाणे आजूबाजूला पाहून विचार करून बोल. ही परिस्थिती बदलायची असेल तर दुष्टांचे निर्दालन आणि साधुजनांचे रक्षण करणाऱ्या भगवान श्रीकृष्णालाच पुन्हा एकदा या भूमीत अवतार घेतला पाहिजे. पण अवतार घ्यायचा तोही फार धोरणीपणाने, योग्य ती जातपात पाहून, एखाद्या शुगर लॉबीतल्या लक्षभोजन-वाल्याच्या कुळातच घेतला पाहिजे. आणि लहानपणीच दिल्लीशी आपली 'निष्ठा' सिद्ध करायला लागेल. एरवी देवपणाच्या मिजाशीत गेले, तर या प्रदेशात, भगवान श्रीकृष्णांना देखील अनेक मुख्यमंत्र्यांप्रमाणे फक्त हेलपाटाच पडेल.

**चारुशीला :** ( रागानं ) अरे कारट्या, देवादिकांनासुद्धा जन्म कुठं घ्यावा हे सुचवण्याइतकी अक्कल वाढलीय का तुझी ? मी तुला सांगते ज्योतन, ही अक्कल आणि शहाणपण काही या पोराचं नाहीये. हे पांडित्य त्याला पढवणारे त्याचे पपा आहेत पपा.

**शासाहेब :** गहजब आहे गहजब, बाईसाहेब, तुम्ही चुकलात. असले देशद्रोही पाखंडी विचार, स्वातंत्र्योत्तर जन्माला आलेली तरुण मंडळीच करू शकतात आणि बोलू शकतात. आपल्या पिढीला नुसती, गांधी टोपी पाहिली वा 'भारत माता की

जय ' अशी घोषणा कुठे ऐकली तरी अजून गदगदून गहिवर फुटतो. तेव्हा हे विचार तुमच्या चिरंजीवांचेच आहेत. माझा त्याच्याशी—

**चारुशीला :** ( संतापानं ) तुम्ही एक अक्षर बोलू नका. बापलेक तुम्ही सगळे एका माळेचे मणी आहात.

**प्रशांत :** ममी, तू रागावली आहेस.

**चारुशीला :** हो हो रागावलेय ! का नाही रागावणार ? जरूर रागावणार.

**प्रशांत :** याचाच अर्थ ठरलेल्या शर्तीप्रमाणे आपला संवाद संपला. ज्योतन वर चल. मला तुझ्याशी—

**शासाहेब :** असं करू नकोस राजा.... वाटाघाटी चालू राहू देत.

**प्रशांत :** कराराप्रमाणं वाटाघाटी चालूच राहातील. फक्त मला हवं असलेलं एक— ' फक्त एकच कारण,' सांगा. चल ज्योतन—तुम्ही शोधत राहा...

( दोघेही जिन्याने वर जाऊ लागतात तशी- )

**शासाहेब :** ( एकदम टाळी वाजवीत ) हां ऽ सापडलं ! थांब थांब.... तुला आता नेमकंच कारण सांगतो, खाली ये.

**प्रशांत** ( थबकून ) जिन्यातच ठीक आहे. कारण काय सापडलं ते सांगा.

**शासाहेब :** बाईसाहेब, एक सिगरेट ओढू का ?

**चारुशीला :** ओढा ऽ .. पण त्याला ' कारण ' सांगा.

**शासाहेब :** ( थंडपणे सिगरेट शिलगावतात, दोन झुरके घेतात; धूर सोडतात आणि मग—) हे बघ प्रशांत, या भारतवर्षात आर्यांचं आगमन केव्हा झालं ते तुला ठाऊक आहे ? वैदिक संस्कृती, रामायण, महाभारत... प्राचीन काळातले थोर थोर मुनी, महर्षी... व्यास वाल्मिकी, विश्वामित्र, वसिष्ठ वगैरे वगैरे... अरे या सगळ्यांचे आपण वारसदार आहोत. अरे हा पवित्र, समृद्ध वारसा जपण्यासाठी आपण सगळ्यांनी या या पवित्र भूमीत आयुष्य वेचलं पाहिजे, हे तुला मान्य आहे की नाही ?

**प्रशांत :** ( थंडपणे ) वारसदारांनी वारसा जपण्यासाठी आयुष्य वेचायलाच हवं की.

**शासाहेब :** ( पुन्हा झुरके घेत ) हां तर आता असे. अरे ज्या काळी इथे वैदिक संस्कृती नांदत होती.... त्यावेळी—

**प्रशांत :** यूरोप-अमेरिकेतले लोक जंगलात उघडे नागडे गुहेत राहात होते. ज्या वेळी, या आर्यावर्तात लोक मलमल तयार करीत आणि वापरीत, त्यावेळी युरोप-अमेरिकेतील माणसं वल्कलं नेसून ( थबकून ) मी अकरावीत होतो त्यावेळी तुम्ही लिहून दिलेलं आणि पाठ केलेलं भाषणच तुम्ही बोलताहात पपा.

**शासाहेब :** मुद्दा तो नाहीये. ही वस्तुस्थिती तुला मान्य आहे का नाही ?

**प्रशांत :** पपा, मीच तुम्हाला आता एक प्रश्न विचारतो. रोममध्ये राहणारे आजचे लोक, रोमन संस्कृतीचे वारसदार आहेत का ?

**शासाहेब** : छे छे ऽऽ रोमन संस्कृती केव्हाच नष्ट झाली.

**प्रशांत** : तर मग प्राचीन काळातली ऋषीमुनींची संस्कृती आज भारतात कुठे उरली आहे ? स्वच्छपणे सांगायचे तर आपण आजचे सगळे भारतवासीय, एकोणिसाव्या शतकातल्या ब्रिटिश संस्कृतीचे जे मिश्रण झाले, त्या मिश्रणाची अपत्ये आहोत. तुमचे आमचे पूर्वज जर काही चमत्काराने जिवंत होऊन परत आले तर आपले पोषाख, आचारविचार, घरातले वातावरण, खाद्यपेयांचे विधीनिषेध वगैरे बघून ते आपल्या घरातले पाणीसुद्धा पिणार नाहीत. तेव्हा मुळातच जो वारसाच नाहीये, तो जपण्याचा, आणि सांभाळण्याचा, प्रश्न कुठे येतो ? प्राचीन विद्या आणि कलांच्या अभ्यासाबद्दल म्हणाल, तर तो जर्मनीत एवढ्या तोलामोलाने झालाय, त्याच्या अल्पांशानेही इथे झाला नाही. तेव्हा तुम्हाला सापडलेले कारण अगदीच पोकळ आहे.

[ "शासाहेब मी पुन्हा आलो रेऽऽ" अशी भय्याकाकांची गर्जन ऐकू येते. ]

**शासाहेब** : भय्या पुन्हा आला वाटतं...

**प्रशांत** : (लगबगीनं खाली येत) काका ? पुन्हा आलेऽ ?

**चारुशीला** : म्हणजे मघाशी एकदा येऊन गेले होते भय्या भावोजी ? कोणी एक अक्षरानं मला सांगितलं का ते पाहा.

(शासाहेब आणि प्रशांत गेले आहेत. ते भय्या काकांना घेऊन आत येतात. येता येता भय्यासाहेब म्हणत असतात...) "ही पुस्तकं तर नेणं तातडीनं जरूर होते. त्यासाठी फोर्टमधली सगळी दुकानं पालथी घालण्यात वेळ गेला आणि गाडी चुकली. आता रात्रीची गाडी पकडणं आलं...नमस्ते वहिनीसाहेब. हीच का रे तुझी भावी धनीण ?" (तशी ज्योतन वाकून नमस्कार करते.)

**शासाहेब** : बाबा रे, तू आलास बरं झालं. आमच्याकडं एक कौटुंबिक समस्या निर्माण झालीय. ती सोडवायला तुझी मदत लागणार आहे.

**भय्या** : तुमची कौटुंबिक समस्या मला ठाऊक आहे. तुमचा हा बजरबट्टू कायमच्या वास्तव्यासाठी जर्मनीला जाणार म्हणतोय हीच ना ?

**शासाहेब** : त्याला जर कोणी योग्य, त्याला पटेल असं एक कारण दिलं तर तो आपला बेत रद्द करायला तयार आहे.

**भय्या** : अच्छा म्हणजे त्यानं तुम्हाला 'शो वन कॉज' नोटीस दिली आहे तर ? झंप्या तू खरोखर ग्रेट आहेस.

**प्रशांत** : माझ्या जाण्याबद्दल भय्याकाका खरोखरी तुमचं काय म्हणणं आहे ?

**भय्या** : माझे मत विचारशील तर हा एक दुग्धशर्करा योग आहे.

**शासाहेब** : म्हणजे ?

**भय्या** : म्हणजे असे की, हा कायमच्या वास्तव्यासाठी जर्मनीला जाण्याने किती

पक्षी एकदम ठो ऽऽ होणार आहेत त्याचा जरा विचार कर रे गंपूनाना. एक – भारताची लोकसंख्या कमी होईल. दोन–तुझा आणि तुझ्या भावी कुटुंबियांचा रेशन खात्यावरील ताण हलका होईल. तीन – तू तिकडून पैसे पाठवलेस की फॉरीन एक्सचेंजना प्रश्न सुटण्यास मदत होईल. चार–या बंगल्यात शासाहेबाला पागडी वा डिपॉझीट घेऊन बिन्हाड ठेवता येईल. आणि पाच आमेष्टांची जर्मनीत आल्यावर फुकट जेवणा-राहाण्याची सोय होईल. तेव्हा गटटूलाल तू लवकरात लवकर इथून प्रस्थान हलवावेस हे बरे.

**चारुशीला :** भय्या भावोजी तुम्ही हं काय त्याच्या मनात भरवताहात ?

**भय्या :** वहिनी तुम्ही त्याला हवे असलेले एक कारण शोधण्यासाठी घोळ घातलाय तो तात्काळ थांबवा. ‘ जातो ’ म्हणणाऱ्याला ‘ जाच ’ म्हणावे. पायात छत्री अडकवून वा चाटा मारून जाणाऱ्याचे पाय रोखता येत नाहीत. तेव्हा त्याला जाऊ द्या.

**प्रशांत :** ( भय्या काकांनी आणलेला पुस्तकांचा एक गठ्ठा पाहात ) हे हो काय भय्या काका ? ही कसली पुस्तकं ?

**भय्या :** खोलून पाहा म्हणजे कळेल.

**प्रशांत :** ( खोलून पाहात ) अहो काका ही तर इंजीनियरिंगवरची पुस्तकं आहेत. तुम्ही ही पुस्तकं कशासाठी आणलीत ?

**भय्या :** असली पुस्तकं उपयोगाशिवाय कोण कशाला आणील ?

**प्रशांत :** अहो काका, पण ही पुस्तकं हायली टेक्निकल आहेत. तुम्हाला त्यात काय समजणार आहे ?

**भय्या :** न समजायला काय झालं ? प्रयत्न केला, धडपड केली तर सगळं काही समजेल. सिव्हील इंजीनियरिंगची एलमेंटरी पुस्तकं वाचून मी संपवली आहेत. तेव्हा आता या पुस्तकांचा अभ्यास तुला वाटतो इतका काही मला जड जाणार नाही.

**प्रशांत :** अहो पण हा एवढा खटाटोप कशासाठी ?

**भय्या :** अरे झंप्या, यापूर्वी डॉक्टरकीचा अभ्यास करून मोकळा झालोय. कशासाठी ठाऊक आहे ? मी कुष्ठ रोग्यांची वसाहत मांडून बसलोय. तिथं कोणी डॉक्टरच यायला तयार होईनात. तेव्हा मीच अभ्यास करून डॉक्टर झालो. आत्ता मी आमच्या ताडोबाच्या जंगलात आदिवासी लोकांचं एक खेडं दत्तक घेतलंय. त्यासाठी दीड दोन मैलावरून वाहणाऱ्या एक ओढ्याचा प्रवाह बदलून या खेड्यातून तो कसा नेता येईल त्यावर माझा विचार चालू आहे आणि त्यासाठीच ही पुस्तकं मी मुद्दाम विकत घेतली आहेत.

**प्रशांत :** ( थक्क होत ) काय सांगता काय काका ? वाहत्या पाण्याच्या प्रवाहाची दिशा बदलण्याचं शास्त्र हा तर माझ्या खास अभ्यासाचा विषय आहे. त्यामुळंच तर

आमच्या इथल्या साहेबाशी माझं आज भांडण झालं आणि नोकरीचा मला राजीनामा द्यावा लागला. तो मला म्हणायला लागला की—

**भय्या :** ते जाऊ दे. तू मला मदत करायला तयार आहेस का?

**प्रशांत :** अगदी आनंदानं करीन. सध्या मोकळाच आहे की मी. तुमच्याजवळ नकाशा असला तर तुमचा नेमका प्रॉब्लेम काय आहे ते मला सांगा.

**भय्या :** तुला नकाशा दाखवतो. प्रॉब्लेम सांगतो. यायला तयार असलास तर जागा दाखवतो. भरपूर पगार देतो. रहायला छानशी पर्णकुटी बांधून देतो. काय पाच-दहा वर्षे लागतील तेवढी तिथं राहून काम कर आणि मग जा खुशाल जर्मनीला.

**प्रशांत :** आधी नकाशा कुठाय, तो द्या.

(बॅग उघडून भय्यासाहेब एक खूप घड्या घातलेला ब्ल्यू प्रिंट काढून देतात, तशी तो घेत—)

**प्रशांत :** हा टेबलावर लावून पाहायला हवा. चला काका माझ्या खोलीत जाऊ या आपण. तिथं मोठं टेबल आहे आणि सगळी इन्स्ट्रुमेंटस आहेत. चल ग ज्योतन, तूही वर चल...

**चारुशीला :** अरे पण तुला हवं होतं ते कारण मिळालं का ?

**भय्या :** वहिनी, तो जरी फक्त एकच कारण मागत होता तरी खरं म्हणजे त्याला हवं होतं फक्त एक काम. त्यात त्याला गुंतवून टाकण्याची जबाबदारी माझी. आलो रे गंपूनाना— (प्रशांत आणि ज्योतन आधीच वर गेले. भय्यासाहेबही पाठोपाठ लगबगीनं जातात. मग—)

**शासाहेब :** आता तरी झालं ना तुमच्या मनासारखं?

**चारुशीला :** (कपाळावर हात मारून घेत) कर्म माझं. मला हवं होतं काय नि आता होणार आहे काय भलतंच? हा पोरगा आगीतून सुटून फुफाट्यात जाऊन तडफडणार आहे.

**शासाहेब :** (बावचळून) म्हणजे ऽऽ?

**चारुशीला :** (संतापानं खेकसत) म्हणजे काय करता हो? अहो हा पोरटा एक वेळ जर्मनीत जाऊन कायमचा राहिला असता तरी मला चाललं असतं. पण आता याची सगळी हयात जंगलात जाणार आणि तुमचा भाऊ त्याला कुष्ठरोग्यांच्या सेवेला नेऊन घालणार. मी त्याला एवढा मोठा इंजिनीयर केला तो काय रानावनात तडफडण्यासाठी का कुष्ठरोग्यांच्या सेवेत धडपडण्यासाठी?

[बाई हताशपणे कपाळाला हात लावून बसतात आणि शासाहेब तेवढ्यात खिडकीतून बाहेर नजर टाकीत— "अरेच्या खुराडं पुन्हा उघडं कोणी टाकलं? सगळ्या कोंबड्या पळाल्या...हॉक....हॉक...हॉक..." करीत ते बाहेर धावतात— त्याच वेळी पडदा.]

# असंही एक सौभद्र

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
दा. क्र. २९८६० नों. दि. २०/५/८८
वि. ९/८५ क्र.

[ पुणे शहरातील एका श्रीमंत वसाहतीतील टुमदार बंगला. बंगल्यातील दर्शनी हॉल. हॉलची सजावट श्रीमंती आणि रसिकतेची. हॉलमधे बरीच काचेची कपाटे आहेत आणि ती जाड जाड पुस्तकांनी टिच्चून भरलेली आहेत. त्यावरून तर्क होतो की इथे कोणी विद्वान व्यासंगी प्रकांड पंडित राहात असावेत. होय होय, इथे राहतात प्रा. डॉ. शामसुंदर वासुदेव यादव आणि त्यांच्या पत्नी रुक्मिणीदेवी.

वेळ सकाळी दहा वाजण्याची. हॉलमधे कोणीही नाही पण रेडिओ चालू आहे. रेडिओवर गाणे 'नच सुंदरी करू कोपा' कोणी गात आहे. तोच दारावरची बेल खणखणते. तशी आतून 'आल्ये ऽ हो आल्येऽ' अशी ओ ऐकू येते. क्षणार्धाने पुन्हा घंटा खणखणते. तशी आतून त्रासिक स्वरात– "आल्ये ऽऽ क्षणभर थांबलात तर काय 'हे' होईल ? भाजी फोडणीला टाकतेय ना मी..." असं रुक्मिणी ओरडून सांगते. क्षणभरानं आपले लांबसडक केस कंगव्यानं विंचरीत रुक्मिणी बाहेर येते आणि प्रथम रेडिओ बंद करते. तरुण, रूपवती, आणि दोन मुले झाली असली तरी ती बांधेसूद आणि मोहक दिसते. तेवढ्यात पुन्हा घंटा. तशी बाहेरच्यांना ऐकू जाईल असे खेकसत– "इश्यऽऽ काय हेऽऽऽ ? मेलं आपण वेळी अवेळी वाट्टेल तेव्हा घरी उगवायचं आणि मग दार उघडेपर्यंत सुद्धा–" असं म्हणत ती दार उघडते, तो समोर दिसतात बाबा मुनी. पन्नाशीतले, खादीचे धोतर, झब्बा, मानेवर रुळणारे केस, खांद्यावर शबनम पिशवी, मुद्रा मिस्कील, हसरी, खट्याळ, पायात कोल्हापुरी चपला, असे बाबा मुनी 'नारायण नारायण !' म्हणत आत येतात तशी– ]

**रुक्मिणी :** अय्या ऽऽऽ ! बाबा मुनी तुम्ही ऽऽऽ ?

**मुनी :** हो. मीच तो विश्वंभर बाबा मुनी. कोण आलं म्हणून तुला वाटलं रुक्मिणीताई ? तुझा विद्वान प्राध्यापक कम् नटश्रेष्ठ नवरा शामभय्या ?

**रुक्मिणी :** होय हो. नाटकाचा दौरा संपवून काल रात्रीच परत यायचे होते. रात्रभर वाट बघतेय मी.

**मुनी :** ( बसत ) कोण शामभय्या ? आणि काल रात्री परत यायचा होता ? असं म्हणाला तो तुला ?

**रुक्मिणी :** म ऽ ग ? सुटी संपली आता मुनी. आजपासून कॉलेज सुरू व्हायचंय. आज यायलाच हवं त्यांना. काल सकाळी कोल्हापूरहून फोन आला होता त्यांचा मला. दुपारचा प्रयोग संपला की तासाभरात बस निघेल म्हणून म्हणाले ते. आता वाटेत कुठं बस फेल झाली असली तर—

**मुनी :** बस बीस काही फेल झाली नाही. दुपारचा प्रयोग रद्द म्हणून मग बस संध्या काळीच येऊन पोचली. फक्त ही दोघं तेवढी पन्हाळ्याला गेली म्हणून—

**रुक्मिणी :** पन्हाळ्याला ? ही दोघं ? कोण दोघं ?

**मुनी :** ही दोघं म्हणजे शामभय्या आणिक—म्हणजे नटराज थिएटर्सचा सेक्रेटरी, तो आपला हाऽऽ... सांगत होता होऽ मला. नाही तर तू म्हणशील—

**रुक्मिणी :** होय हो... पण दुसरं कोण होतं ?

**मुनी :** आता कोण म्हणून काय सांगायचं रुक्मिणीताई ? खरं म्हणजे तुलाच ते ठाऊक असायला हवं.

**रुक्मिणी :** सुनंदा नाईक तर नव्हे ?

**मुनी :** छे छेऽऽ... ती केव्हाच संपली. संपली म्हणजे मागं पडली म्हणजे आँट ऑफ फॉर्म झाली. नाटकाच्या दृष्टीनं म्हणतोय हो मी. सध्या शामभय्याच्या बरोबर नाटकात काम करते ती मधुवंती देसाई. तिला घेऊन तो काल दुपारीच पन्हाळ्याला गेला असं——

**रुक्मिणी :** मधुवंती म्हणजे ती उंच, सडपातळ, गोरीपान, नाकेली—

**मुनी :** छे गऽऽ.... ती निराळी. तू म्हणतेस ती सुलोचना प्रधान. दोन महिन्यापूर्वीच तिचं लग्न झालं. ही ही मधुवंती म्हणजे... ठेंगणी पण बांधेसूद, गोल चेहरा, टपोरे डोळे, लाल चुटूक जिवणी, मोत्यासारखे दात, हसली की खळ्या पडतात बघ... तू ( चुटकी वाजवीत ) डेअरीवाले अनयरावांच्या बायकोला, राधेला पाहिलं होतंस का... नसशील बहुतेक. शामभय्याच्या लग्नापूर्वीची भानगड होती ती.

**रुक्मिणी :** भानगड ?

**मुनी :** भानगड म्हणजेऽऽऽ... तशी काही खास भानगड नव्हती. पण ही मधुवंती त्या राधिकेसारखी दिसते. तिला झाकावी; हिला काढावी.

**रुक्मिणी :** तुम्ही एवढी कधी निरखून पाहिलीत तिला बाबा मुनी ?

**मुनी :** अरे हा काय प्रश्न झाला ? मी बातमीदार माणूस. दुनियेत सर्वत्र मुक्त संचार करणारा. कुठेही नाक खुपसण्याचा खास परवाना मिळालेला. शामभय्याच्या उचापती मला कळणार नाहीत तर कोणाला ? अगं बेटी, शामभय्या एखाद्या सुंदरीकडं पाहून गालात हसला तर तिच्या लक्षात यायच्यापूर्वी ते मला माझ्या कचेरीत बसल्या जागी समजतं; ठाऊक आहे ? तुला बजावून ठेवतो रुक्मिणीताई तुझा नवरा पक्का लंपट आणि महाबिलंदर आहे. तू जपून राहा.

**रुक्मिणी :** उगीच काही तरी काय बोलता हो बाबा मुनी तुम्ही ? अंमळ थट्टेखोर, मोकळ्या मनाचे आणि रसिकराज आहेत ते. पण तुम्ही म्हणता तसे ते चंगीभंगी मात्र नक्कीच नाहीत. मला अगदी पक्की खात्री आहे त्यांच्याबद्दल.

**मुनी :** हीच तर शहामत आहे त्याची. हा प्राध्यापक, जसा विद्वान तसा विद्यार्थ्यांचा लाडका; शिवाय नटांचा कौस्तुभमणी. त्यांचा आदर्श. शिवाय नटराज नाट्य संस्थेचा अध्यक्ष. इकडे कॉलेज तिकडे नाट्य संस्था. दोन्ही पीठांवर अगदी मठाधिपती होऊन बसलाय हा स्वरूपसुंदर आचार्य. मग शिष्यींणींचे तांडे गोळा व्हायला कितीसा उशीर ?

**रुक्मिणी :** ( हसत ) ते जाऊ दे बाबा मुनी, पण मला सांगा, ते मधुवंतीला घेऊन पन्हाळ्याला कशासाठी गेले असावेत ?

**मुनी :** घ्या ऽऽऽ ! हा काय प्रश्न झाला ? तिला घेऊन त्यानं पन्हाळ्याला जायचं नाही तर कुठं अंबाबाईच्या देवळात ? अग पूर्वी शंभूराजे पन्हाळ्यावर कशासाठी मुक्काम करून होते ?

**रुक्मिणी :** इश्य ऽ ऽ ऽ ! भलतंच काय हो ऽ ? ते कधी बीयरलासुद्धा स्पर्श करीत नाहीत, तर–

**मुनी :** छे छे छे छे– तुम्ही मुली अशा बावळट असता म्हणून त्याच्यासारखे लुच्चे लंपटराज तुम्हांला असे हातोहात फसवतात. अगं मुद्दा कोणता आहे आणि तू हमी कशाची देते आहेस... कशाचा काही संबंध ? बीयरला तो स्पर्श करीत नसेल. कबूल ! पण मधुवंती म्हणजे बीयर तर नव्हे ?

**रुक्मिणी :** हे बघा बाबा मुनी, ते कसे आहेत ते मला पूर्ण ठाऊक आहे. तुम्ही मला त्यांच्याबद्दल काहीही वेडंवाकडं सांगितलंत तरी मी त्यावर मुळीच विश्वास ठेवायची नाही.

**मुनी :** हीच तर भानगड होऊन बसलीय. अगं तूच का, त्याच्या परिवारातल्या कोणत्याही सुंदर तरुणीचा बाप, भाऊ वा नवरा अगदी याच खात्रीनं आणि याच शब्दात मला ठणकावत असतो.

**रुक्मिणी :** यावरून तरी माणसानं समजून जावं.

**मुनी :** काय, काय ? काय समजून जावं ? या बिलंदरानं तुला तर बोल बोल म्हणता फसवली. तू त्याच्या थापेबाजीवर भाळलीस आणि घरातून पळून जाऊन–

**रुक्मिणी :** बाबा मुनी, आमचं लग्न झालं त्याला दहा वर्षे झाली. अजून किती दिवस उगाळणार आहात तुम्ही ते ?

**मुनी :** अगं अमरावतीच्या एका मालगुजाराची कन्या तू. तुझ्यासारख्या थोर कुळातल्या मुलीनं आपल्या तोलामोलाची स्थळं सोडून एका गवळ्याशी–

**रुक्मिणी :** बाबा मुनी, बाबांचा पाठिंबा होता माझ्या लग्नाला हे विसरू नका. केवळ आमचा दादा हेकटपणानं वागला म्हणून मला–

**मुनी :** अरे पण म्हणून काय ' गवळी ऽऽऽ ? '

**रुक्मिणी :** काही तरीच काय बडबडताय बाबा मुनी तुम्ही ? हे काय गवळी होते ?

**मुनी :** भले डेअरीवाले असतील बापजादे पण विद्यार्थीदशेत हा शामभैया कधी काळी दुधाचे रतीबच घालत होता ना ? मग आमच्या भाषेत तो गवळीच.

**रुक्मिणी :** असं का ऽ ? ठीक आहे. येऊ देत आता—

**मुनी :** अग येऊ देत खुशाल. त्याच्या तोंडावर सुनवीन मी.

**रुक्मिणी :** हे नव्हे, बलरामदादा भाऊजी यायचेत आज, कॉंग्रेसचं अधिवेशन आटोपून. जांभळीच्या वाटेवर जाताना इथं उतरणार आहेत. इतक्यात येतीलच ते. सकाळीच तार आलीय त्यांची.

**मुनी :** (घाबरून) आं ऽ ? कोण ? ब...ब...बलराम दादा ? (अजीजीनं) हे पहा.. गैरसमज करून घेऊ नकोस. मी बलरामदादांच्याबद्दल काही बोललोय का ? ते द्राक्षवाले, ऊसवाले, सधन शेतकरी आहेत. मनानं सरळ, चारित्र्यानं शुद्ध—

**रुक्मिणी :** आणि प्रकृतीनं तर इतके दणकट की कोणाच्या मुस्कटात भडकावली तर पाणी प्यायला तो आडव्याचा उभा व्हायचा नाही. यांच्यावर फार प्रेम आहे दादांचं हे ठाऊक आहे ना तुम्हाला ?

**मुनी :** छे छे छे. राधामाई अग हे काय भलतंच बोलते आहेस तू ? मी तुमच्या घरातला. तुम्हा सगळ्यांना वडीलधारा. शामभैय्याचं लक्षण अंमळ ठीक दिसत नाही म्हणून वेळीच तुला सावध करायला आलो तर—

**रुक्मिणी :** यांची कोणती लक्षणं तुम्हाला बरी दिसली नाहीत हो ?

**मुनी :** बैस. बैस. सांगतो तुला. बाकी सांगायला तरी कशाला हवं तुला ? दाखवतोच. (खांद्यावरल्या शबनम पिशवीतून बऱ्याचशा वर्तमानपत्र–मासिकातून एक मासिक पुस्तक बाहेर काढीत) हा 'रंगराज' पाहा म्हणजे रगगड झालं. अरे राम राम राम ! माणसानं भानगडी करायच्या म्हणजे किती करायच्या ?

**रुक्मिणी :** (अंक हातात घेऊन चाळत) पण काऽय ?...अशा भानगडी केल्या तरी काय यांनी ?

**मुनी :** ते तुझं तू वाच. पुन्हा मी कळ लावली असं व्हायला नको.

(तेवढ्यात दारावर घटा वाजते आणि पाठोपाठ शामसुंदरच्या आवाजात... 'प्रिये पाहा रात्रीचा समय सरूनी येत उषःकाल हा..." ही ओळ दाणेदार तानेसह ऐकू येते तशी—)

**रुक्मिणी :** (मुद्रा फुलून येत लगबगीने) अग बाई ! हे आलेऽऽ...

**मुनी :** (गडबडीनं) मी निघालोच. मुख्य म्हणजे मी जे सांगितलं तुला ते तुझ्यापाशीच ठेव. निदान माझं नाव गोवू नकोस कुठं.

**रुक्मिणी :** (अंक ठेवीत) इश्यऽऽ, त्यात एवढं लपवायचं कशासाठी ?

(असं म्हणत दाराकडं धावते. मुनी जाण्यासाठी तयार होतो. तेवढ्यात दार उघडताच सूटकेस हातात घेऊन शामसुंदर येतो. तिशी-पस्तीशीतला, देखणा,

उमदा. पायजमा, रेशमी झब्बा, गळयाला मफलर. त्याला पाहाताच कृत्रीम कोपानं रुक्मिणी म्हणते–) काय हो हे येणं तुमचं ?

**शामसुंदर :** हॅल्लो राणी...हाय बाबा मुनी.... घरात सगळं आलबेल ? बाबा मुनीं आलेत म्हणून विचारतोय.

**बाबा मुनी :** ध्याऽऽ ! बघ बघ रुक्मिणी कसा द्वाड, खट्याळ आहे तुझा नवरा. का रे बाबा, मी काय तुझं घोडं मारलंय ?

**शामसुंदर :** रुक्मिणी तुला सांगून ठेवतो, हा बाबा म्हणजे–

**रुक्मिणी :** (फणकाऱ्यानं) चला ! बोलू नका माझ्याशी. रात्रभर जागी राहून मी इकडं तळमळत वाट बघतेय तुमची आणि तुम्ही मात्र–

**शाम :** पन्हाळ्याला गेलो होतो.

**रुक्मिणी :** कळलं मला. मधुवंतीला घेऊन.

**शाम :** ऊं हूं ! शब्द चुकला तुझा राणी. मधुवंतीला घेऊन नाही. तिच्या बरोबर. तिच्या जीपमधून तिनं लिफ्ट दिली म्हणून.

**रुक्मिणी :** तिची कोठली आलीय जीप ?

**शाम :** जीप तिची नव्हे; तिच्या वडिलांची–देसाईसाहेबांची. देसाईसाहेब म्हणजे आपल्या धनंजयाचे बॉस...पन्हाळा प्रोजेक्टचे एक्झीक्युटीव्ह इंजिनीयर... आलं का लक्षात ?

**रुक्मिणी :** म्हणजे मधुवंती आपल्या वडिलांना भेटायला गेली होती तर ?

**शाम :** आणि मी धनंजयच्या प्रकरणात देसाईसाहेबांचा निरोप आला होता म्हणून त्याना भेटायला गेलो होतो.

**रुक्मिणी :** म्हणजे धनंजयानं आणखी काय प्रकरण करून ठेवलंय ?

**शाम :** सांगतो. पण हा बाबा मुनी इथून गेल्यावर सांगतो. नाही तर तेवढ्यात हा वर्तमानपत्रात त्याची बातमी करून छापील.

**मुनी :** छे छे छे, आता मी कसचा इतक्यात जातोय ? (बैठक मारीत) हा मी बसलो. शामभैय्या, तुम्हा लोकांना जे काही अगदी गुप्त गुप्त वाटतं ते मला आधीच ठाऊक असतं. फक्त–

**शाम :** धनंजयाच्या बाबतीत काय ठाऊक आहे रे बाबा तुला ?

**मुनी :** सांगू ? धनंजयानं नोकरीचा राजीनामा दिला. कोठल्याशा मठात जाऊन त्यानं संन्यास घेतला. त्या पुढचं बोल.

**रुक्मिणी :** अगं बाई ! धनानं संन्यास घेतला ? तो काय म्हणून ?

**शाम :** बाबा मुनी तू ग्रेट आहेस. अरे मला ही बातमी काल कळली आणि त्याच्या आत तुला ?

**मुनी :** त्याचं कारण मी फिरत असतो...सतत बातमीचा वास घेत मागावर असतो.

तुला कोणी सांगितलं शामभैय्या ? देसाईसाहेबांनी. मी खुद्द धनाच्या तोंडून त्याची प्रतिज्ञा ऐकली.

**रुक्मिणी :** पण झालं काय असं एकाएकी संन्यास घ्यायला ?

**शाम :** संन्यास कशासाठी घेतात राणी ? आत्म्याचा उद्धार व्हावा आणि मोक्ष-साधना करता यावी म्हणून. ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या— असा साक्षात्कार झाला असेल धनंजयला तेव्हा—

**रुक्मिणी :** डोंबल तुमचं ! मोक्षसाधनेसाठी संन्यास घ्यायचं हे काय वय आहे का धनंजयाचं ?

**मुनी :** तो हव्वं ते म्हणू दे रुक्मिणीताई, पण मला पक्कं ठाऊक आहे.. प्रेमभंगाचा धक्का बसला आणि धनंजयानं ताडकन् सर्वसंग परित्याग करून रागारागात संन्यास घ्यायचं ठरवलं.

**रुक्मिणी :** म्हणजे ? मी नाही समजले. धनाचा प्रेमभंग ? हे काय नवीन प्रकरण आहे आणखी ? काय हो ?

**शाम :** प्रकरण नवीन नाही. जुनंच आहे. आपल्या सुभद्राताईचं लग्न साखरसम्राट कोन्यांच्या मुलाशी—सुयोधनाशीच करायचं असं दादासाहेबांनी ठामपणे ठरवल्याचं धनाला कळलं तेव्हा—

**रुक्मिणी :** पण ते आता कसं शक्य आहे ? चार महिन्यापूर्वी ऐन मुहूर्तावर सुभद्रा-वन्स मंडपातून नाहीशा झाल्या तेव्हाच लग्न मोडलं नव्हतं का ? केवढा भांडण-तंटा झाला....किती मारामाऱ्या उसळल्या...कोन्यांची सगळी वऱ्हाडी माणसं यादवांना शिव्याशाप देत ‘ पुन्हा तुमचं तोंड बघणार नाही ’ अशी प्रतिज्ञा करून कार्यालयातून चालती झाली, आठवतंय ना ?

**मुनी :** त्यात काही तथ्य नाही. ते भांडण तात्पुरतं होतं. दादासाहेबांनी पड घेऊन वाटाघाटी केल्या तेव्हा ते मिटलं.

**रुक्मिणी :** त्या वेळचा सगळा अपमान विसरून कोरे मंडळी आमच्या सुभद्राताईला करून घ्यायला अजून तयार आहेत ?

**मुनी :** हो हो...नुसती तयार नाहीत, अगदी उतावळी झाली आहेत.

**रुक्मिणी :** चमत्कारच म्हणायचा बाई.

**मुनी :** चमत्कार वगैरे काही नाही रुक्मिणीताई...त्या पाठीमागं मोठं राजकारण आहे, अगं सुयोधन, भीमराव पांड्यांच्या विरुद्ध येत्या निवडणुकीला उभा राहतोय. यादवांचा पाठिंबा कोन्यांना मिळणार की पांड्यांना, यावर लढतीचा निकाल अवलंबून आहे. हे लग्न झालं की कोन्यांनी लढाई जिंकलीच म्हणून समज.

**रुक्मिणी :** इश्य ऽऽ ! तेवढ्यासाठी सुभद्राताईच्या मनाविरुद्ध हे लग्न करायचं दादा-साहेबांनी ठरवलंय ? काय हो ?

**शाम :** असं दिसतंय खरं.

**रुक्मिणी :** सुभद्राताईंना न विचारता ?

**शाम :** ती एवढीशी पोर... तिला काय विचाराचंय ? तिला काय कळतंय ?– असा दादांचा विचार असेल.

**रुक्मिणी :** पण आपल्याला तरी विचारायला नको का त्यांनी ?

**शाम :** मागल्या वेळी विचारलं होतं. आता विचारलं तर आपण काय सल्ला देणार ते त्यांना कळून चुकलंय, त्या वेळच्या अनुभवावरून.

**रुक्मिणी :** म्हणून काय झालं ? आपण गप्प राहून कसं चालेल ?

**शाम :** हे बघ, दादा वडीलधारे आहेत; हट्टी आहेत. त्यांनी एखादी गोष्ट करायचं ठरवलं म्हणजे ते कध्धी माघार घेणार नाहीत.

**रुक्मिणी :** अहो पण वन्संच्या मनाचा काही विचार कराल की नाही तुम्ही ? उद्या त्यांनी आपल्या जिवाचं बरं वाईट केलं तर–

**शाम :** काही जिवाचं बरं वाईट करणार नाही ती. त्यातून धनंजयानं आपण होऊन संन्यास घेतलाय, म्हणजे सगळा प्रश्नच संपला.

**रुक्मिणी :** असा बरा प्रश्न संपेल ? मी तार करून धनाला बोलावून घेणार आहे आणि–

**शाम :** तो कुठं कुठं तीर्थयात्रा करीत हिंडतोय ते तुला तरी कुठं ठाऊक आहे ? तुझी तार त्याला मिळणार केव्हा आणि तो येणार केव्हा ? देसाईसाहेब तर मला म्हणाले की तो अलीकडे कोठल्या तरी शीख धर्मगुरूच्या नादी लागला होता. धर्मांतर करणार होता.

**रुक्मिणी :** काहीही असलं तरी आपण स्वस्थ बसून कसं चालेल ? तुम्ही त्यांना थोडी तरी मदत करायला नको का ?

**शाम :** हे बघ राणी, वडीलधाऱ्यांच्या विरोधाला न जुमानता प्रेमविवाह करायचा म्हणजे माणसाच्या अंगात गटस् लागतात.

**रुक्मिणी :** हो, तुमच्या अंगात आहेत तशा.

**शाम :** शंकाच नाही. म्हणून तर भर लग्नमंडपातून तुला पळवून नेऊन मी लग्न करून मोकळा झालो. हा काय म्हणेल आणि तो काय करील याचा काथ्याकूट करीत बसलो नाही मी. करून करून काय केलं त्यावेळी तुझ्या माहेरच्यानी ? ' हंसे मुक्ता नेली मग केला कलकलाट काकांनी ' काय बाबा मुनी ?

**मुनी :** शामभय्या, त्यावेळची डावपेच लढवण्यातली तुझी शिताफी पाहून मानलं आपण तुला.

**रुक्मिणी :** ते झालं गेलं गंगेला मिळालं. धनंजय आणि सुभद्रा वन्सं यांच्या बाबतीत तुम्ही काय करायचं ठरवलंय ते सांगा मला आधी.

**शाम :** खरं सांगू ? या घटकेला प्रथम गरम गरम चहा घ्यायचा आणि मग–

**रुक्मिणी :** चहा करतेच आहे. धनंजय आणि सुभद्रा वन्सं यांच्याबद्दल सांगा. आता तुम्हाला अशी माघार घेता येणार नाही.

**शाम :** माझ्या सगळ्या सदिच्छा त्यांच्या पाठीशी आहेत.

**रुक्मिणी :** पक्के लबाड आहात. लुच्चे आहात तुम्ही. नुसत्या तुमच्या सदिच्छा असून त्यांचा प्रश्न सुटणार आहे का ?

**शाम :** राणी, अग दादांचा विचार करायला नको का आपल्याला ? मागल्या वेळी सुभद्रा घरातून नाहीशी झाली त्याचं सगळं खापर त्यांनी शेवटी माझ्यावर फोडलं. आता पुन्हा मी काही हातपाय हलवले तर ते मला फाडफाडून खातील. आपण तर बुवा कानाला खडा लावलाय.

**रुक्मिणी** कसे वस्ताद आहेत ते पाहिलंत ना बाबा मुनी तुम्ही ?

**शाम :** मी काय बुवा वस्तादपणा केला ?

**रुक्मिणी :** त्या दोघांना एकमेकात गुंतवून आता नामानिराळे होता काय ?

**शाम :** गहजब आहे ! मी काय बुवा कोणाला गुंतवलं ?

**रुक्मिणी :** हे पाहा, तुम्ही माझ्याशी छाछुगिरी करू नका. मी सगळं काही जाणून आहे. ' आमची सुभद्राताई तुझ्यासाठी मनातून रात्रंदिवस झुरतेय ' असं वारंवार सांगून धनंजयला कोणी पेटवलं ?

**शाम :** कमाल आहे बुवा. मी पेटवलं त्याला ? अग ऽऽ—

**रुक्मिणी :** ' धनंजय तुझ्यावरून ओवाळून पडलाय. तू नाही म्हणालीस तर तो संन्यास घेईल ' हे सुभद्रा वन्संच्या मनात कोणी भरवलं ?

**शाम :** तोबा तोबा ! तोही उपद्व्याप मीच केला ? आता मात्र हद्द झाली तुझ्यापुढं.

**रुक्मिणी :** हद्द वगैरे काही नाही. या बाबतीत तुम्ही केवढे खटाटोपी आणि पाताळ-यंत्री आहात, ते मी चांगलं अनुभवलंय. धनंजय आणि सुभद्रा वन्सं यांचं प्रेम, हा सगळा तुमचा उद्योग आहे आणि आता तो तुम्हीच निस्तरला पाहिजे.

**शाम :** एवढंच ना, बघू... विचार करू.... करू काही तरी तडजोड.

**रुक्मिणी :** तडजोड बिडजोड काही नाही. धनंजयचं सुभद्रा वन्संशीच लग्न झालं पाहिजे त्या दोघांनी एकमेकांची निवड केलीय. शिवाय धनाचं स्थळही उत्तम आहे. तुम्ही यादव मंडळी सधन शेतकरी, बागाईतदार, अगदी साखर सम्राट असलात तरी धनंजय काही अगदीच दरिद्री नाहीये. कर्तबगार आहे, इंजीनियर आहे शिवाय—

**शाम :** अग हो होऽ... हे सगळं मला कशासाठी सुनावते आहेस ?

**रुक्मिणी :** थोरले बंधूराज आले म्हणजे त्यांना सुनवा तुम्ही हे सगळं. त्यांच्यापुढं मूग गिळून गप्प बसू नका. काऽय ?

**बाबा मुनी :** त्याला सांगण्याचा काही उपयोग आहे का रुक्मिणीताई ? दादानी डोळे वटारले आणि गर्जना केली की शामभैय्याच्या वाघरूचं पार कोकरू होऊन जातं.

**शाम** : बरं बरं, कळलं मुनी महाराज, तुम्ही कशासाठी आणि कोणती कळ लावायला उभे आहात इथं ?

**मुनी** : मला पाहिजे होती ती बातमी मिळाली. हा मी उठलो आणि निघालो. (जाऊ लागतो तशी)

**शाम** : थांब थांब, बाबा मुनी, निघालाच आहेस तर जाता जाता माझं एक काम करून जा.

**मुनी** : बोला काय आज्ञा आहे ?

**शाम** : मधुवंतीच्या घरी जा आणि तिला सांग की हीरो-हिरॉईन आले की तुम्ही मुहूर्ताचं उरकून घ्या, तोवर मी येतोच आहे.

**मुनी** : कोण हीरो आणि कोण हिरॉईन ?

**रुक्मिणी** : आणि मुहूर्त कसला ?

**शाम** : अरे राम राम– किती चौकशा... किती चौकशा ? मुहूर्त नव्या नाटकाचा आणि नाटकातले हीरो-हिरॉईन कळलं ?

**मुनी** : कळलं, पण पटलं नाही. नाही नाही मी निघालोच. ( जातो ).

**रुक्मिणी** : मी काय म्हणते ते ऐकलं का ?

**शाम** : ( दार लावून घेत ) सगळं काही ऐकतो; पण नंतर. अरे पंधरा दिवसांचा प्रदीर्घ दौरा करून नवरा घरी येतोय. त्याला जवळ घेऊन अंमळ गोंजारशील कुरवाळशील तरी ? तुला नवऱ्याच्या अंत:करणातली घालमेल कळते की नाही ? ( जवळ जाऊन लगट करीत ) अग अहोरात्र मी इतका तळमळतोय... इतका तळमळतोय...

**रुक्मिणी** : ( फणकाऱ्यानं ) पुरे झालं कळली डोंबलाची तुमची घालमेल. ( दूर लोटत ) आधी दूर व्हा.

**शाम** : ( पुन्हा लगट करीत ) हे हे काय बरं ? खरं तर मी घरात पाऊल ठेवल्या ठेवल्या तू धावत येऊन या आपल्या उपाशी नवऱ्याला कडकडून मिठी मारशील अशी माझी अटकळ होती.

**रुक्मिणी** : हात लावू नका माझ्या अंगाला. तुम्ही हो कसले उपाशी ? उलट रोज नव्या नव्या पक्वान्नांची मेजवानी हादडून तुम्हाला अजीर्ण झालं असेल अजीर्ण.

**शाम** : गहजब ! गहजब आहे हा रुक्मिणी.

**रुक्मिणी** : चला...काही बोलू नका. मला सगळं ठाऊक आहे. घरात बायकोनं उपास काढायचे आणि बाहेर दौऱ्यावर तुम्ही नव्या नट्यांच्या संगतीत त्याची पारणी फेडायची.

**शाम** : काही तरीच काय आरोप करतेस गं ? राणी, अगं तुझ्या समोर एकदा तरी कोणा परस्त्रीकडं मी वाकड्या डोळ्यानं पाहिलंय का ?

**रुक्मिणी :** बघा बघा ऽ ऽ, कसे बोलताहेत ! म्हणे... " तुझ्यासमोर... " माझ्या समोर असले थेर करायची हिंमत आहे का तुमची ?

**शाम :** अगं अगं अगं ऽऽ... म्हणजे मला म्हणायचं होतं की–

**रुक्मिणी :** आपले हे सगळे पराक्रम माझ्या माघारी चालतात.

**शाम :** कोणी ? कोणी येऊन कान भरले तुझे ?

**रुक्मिणी :** कोणी येऊन कान कशाला भरायला हवेत माझे ? ( आठवण होत ) काय हो त्या ' रंगराज'मधे काय आलंय छापून तुमच्याबद्दल ?

**शाम :** छे छे, काही विशेष नाही ..आपली गंमत...निव्वळ वात्रटपणा...तुला कोणी सांगितलं ? बाबा मुनी असेल ( रुक्मिणी रेडिओ खालचा अंक काढते तशी ) भेट्ट दे हा कळीचा नारद पुन्हा मला, त्याला चांगली जन्माची अद्दलच घडवतो.

**रुक्मिणी :** उगाच त्यांच्या नावानं खडे फोडू नका. मुळात काही तरी खरं असल्याखेरीज–

**शाम :** खरं काय आहे ते तुला पहायचंय का ? ( अंक ओढून घेत, एक पान काढून पुढं करीत ) ही ही एवढी बातमी वाच. हूं वाच ना... अगदी मोठ्यानं वाच.

**रुक्मिणी :** ( अंक घेऊन मोठ्यानं वाचू लागते ) गेल्या काही महिन्यात येथील एका महाविद्यालयाचे स्नेहसम्मेलन थाटामाटात साजरे झाले. या सम्मेलनातील विद्यार्थ्यांच्या नाईट प्रोग्रॅमच्या दिवशी एका सुप्रसिद्ध गोकूळकाला फेम कृष्ण-कन्हैया प्राध्यापकाने वेगळीच रात्र रंगवली, असा आमच्याकडे खळबळजनक वृत्तांत आला आहे. सदर नटवरलाल प्राध्यापक एका देखण्या नायिकेसह वर्तमान रात्रीच्या कार्यक्रमातून मधेच पसार झाले आणि– ( थबकून ) काय होऽ, हे हे सगळं तुमच्या – माझ्याबद्दल का ? आपणच तर त्या रात्री –

**शाम :** तू वाच तर पुढं...

**रुक्मिणी :** ( वाचीत ) चांदण्या रात्री विहार करण्यासाठी महाविद्यालयाच्या मागे असलेल्या राजहंस तलावाकडे – ( उसळून ) पण मेल्या तुला काय करायचं आहे ? आम्ही नवरा-बायको हव्वे तिकडं जाऊ ! ( पुढं वाचते ) तलावाच्या काठी सदर प्राध्यापक महाशयांनी आपल्या प्रियशिष्ये समवेत– ( उसळून ) इश्य ऽ ऽ ऽ ! काय हलकट आहे हो हा मेला चोंबडा. तळ्याकाठी एवढा उल्लूपणा करायला आम्ही लाज कोळून प्यालोत का आम्हाला घरदार नाही ? कोण ? कोण आहे हा लिहिणारा बेशरम माणूस ? ( अंक फेकून देत. )

**शाम :** फरगेट इट ! वृत्तपत्राची दुनिया अशी असते.

**रुक्मिणी :** हे एक सोडून द्या. पण तरी सुद्धा मी पाहून ठेवलंय की तरुण कोवळ्या मुलींचा तुमच्या भोवतालचा मेळा दिवसे दिवस वाढायला लागलाय. मला हे मुळीच खपायचं नाही हो.

**शाम** : अगं त्या माझ्या विद्यार्थिनी आहेत, मैत्रिणी आहेत. खरोखर, तुला त्यांचा मत्सर वाटावा अशी परिस्थि ी आहे का ? अगं तुझ्यासारखी सखी सहचरी प्रणयिनी म्हणजे या माझ्या हृदय सिंहासनावर आरूढ झालेली सम्राज्ञीच.... (गातो) माझ्या हृदयात तूच राणी। नाही घडणार बेइमानी। मी दास तुझाच गे इमानी...

**रुक्मिणी** : पुरे पुरे.... हे प्रत्येकीला खाजगीत ग ठून म्हणायचं.

**शाम** : अगं नाही. (गातो) मैत्रिणी मज बहु असती। प्रीती परी तुजवरती। शिष्या मज बहु असती। तू एकच परि प्रियशिष्या ती.

**रुक्मिणी** : नाही . मुळीच चालणार नाही. तरण्याताठ्या पुरुषाला एक बायको असताना, मैत्रिणी आणि विद्यार्थिनी शिष्या हो कशाला लागतात ? ते काही नाही. या पुढं, विद्यार्थिनी फक्त कॉलेजात, ते ही शिकवायच्या वेळीच, आणि मैत्रिणी तर कायमच्या बंद ! सगळ काही मी मी आणि मी.

**शाम** : ठीक आहे बोवा...म्हणतेच आहेस तर ही 'बंद योजना' मी मान्य करतो. मात्र ती अंमळ हळूहळू, हप्त्याहप्त्यानं आपण अंमलात आणू. मग तर झालं ?

**रुक्मिणी** : दरडावून ) नाही ऽऽ ! एकदम 'धडक' अंमलबजावणी. लब्बा ऽऽड ! 'म्हणे हळूहळूऽऽ आणि हप्त्या हप्त्यानं...'

(दोघेही हसू लागतात तोच बाहेरून बलराम दादांची दारावरल्या घंटेसह गर्जनापूर्ण हाक-' अरे शामसुंदर... अगं रुक्मिणीबाई...' ऐकू येते. तशी-)

**शाम** : (गडबडीनं सिगरेट विझवत) अरे बापरे ! दादासाहेब आले !

**रुक्मिणी** : (लगबगीनं) तुम्हीच उघडा दार आणि द्या त्यांना तोंड. मात्र सुभद्रा वन्संचं लग्न धनंजयाशीच झालं पाहिजे हे लक्षात ठेवा. यापेक्षा दुसरा काही प्रकार घडेल तर मी तुम्हाला जबाबदार धरीन. सरळ माहेरी चालती होईन, बजावून ठेवते.

(रुक्मिणी आत जाते. शामसुंदर दरवाजा उघडतो. बलरामदादा आणि भगव्या धोतर-कफनीतले कोणी एक स्वामी आत येतात. बलरामदादा चाळिशी ओलांडलेले पण पैलवानी अंगकाठीचे आणि चालचर्येचे. शीघ्रकोपी, भाबडे, सरळ, अंमळ गतिमंद पण गर्विष्ठ आणि स्तुतिप्रिय. भरदार कल्लेदार मिशा आणि वेश कोणत्याही सधन शेतकरी कम् आमदारासारखा. दार उघडताच पाठमोरे आत येता येता, शामने वाकून केलेल्या नमस्काराकडे ढुंकूनही न बघता, स्वामीजींना उद्देशून अदबीनं लवून-)

**बलराम** : यावं यावं इडगुंजीकर महराज. बसावं आपण. अगदी संकोच करायचं कारण नाही. हे सुद्धा आपलंच घर आहे. आमच्या वडिलांनी म्हणजे परमपूज्य कै. आबाकाकांनी त्या काळात अवघ्या पंचवीस हजारात हा बंगला बांधला (चटक्न् वळून बसक्या आवाजात जरबेनं) नमस्कार कर... (शाम हात

जोडून नमस्कार करतो.) तुम्हाला मौज सांगतो, भोलेशंकर स्वामी महाराज, आमचे वडील त्यावेळी अनमान करीत होते. पण मी त्यांना म्हटलं–आता मागे पुढे पाहू नका. डोळे झाकून पैसे गुंतवा. ही जमीन म्हणजे सोन्याचा तुकडा आहे. पहिल्यांदा मी जागा पाहायला आलो त्या वेळी एक शंख आणि शिवलिंग मला इथं सापडलं. हा शाम शाळकरी पोरगा होता तेव्हा. (बसक्या आवाजात पण चिमटा काढून) नमस्काऽर ! (शाम पुन्हा नमस्कार करीत तोंडाने 'नमस्कार' म्हणून ओरडतो) आता या जागेची किंमत काय आहे ठाऊक आहे ? अहो कमीत कमी गेला बाजार... किती असेल रे शाम ?

**शाम :** किती म्हणजे ऽऽऽ असं पहा, बंगला पाडून इथं हॉटेलसाठी इमारत बांधायला जागा दिली तर पाच, पण बंगला पाडून खाली कमर्शियल कॉम्प्लेक्स, वर ऑफिसेस, त्यावर ओनरशिप फ्लॅटस दिले तर दहा, पण एक मजला आपल्यासाठी ठेवून बाकीची जागा द्यायची ठरलं तर–

**बलराम :** अरे काय काय काय बोलतोस काय तू शाम ? मी तुला नुसता अंदाज विचारला तर तू बंगला जागेसकट विकायला काढल्यासारखीच किंमतीची भाषा चालवली आहेस. काय रे गाढवा ऽऽ तू काही कुठं व्यवहार करून बसला नाहीस ना ? नेम नाही तुझा म्हणून–

**शाम :** दादा, तुमच्या संमतीशिवाय मी आयुष्यात कसलाही व्यवहार परस्पर केलाय का कधी ?

**बलराम :** काऽ ? लग्न नाही केलंस ? परस्पर, कोणालाही न सांगता, न विचारता, तेही विदर्भातल्या एका खानदानीच्या कुटुंबातल्या मुलीला फूस लावून पळवून नेऊन ? विदर्भातले सगळे लोक तुझ्या नावानं अजून ठणाणा करताहेत, ठाऊक आहे ?

**शाम :** पण दादा, लग्न हा व्यवहार नाही. दोन मनांचं ते एक गाढ मीलन आहे.

**बलराम :** तो सगळा तुझा चावटपणा आहे. पहिल्यापासून तू असा लंपटराज.

**शाम :** नाही दादा, रुक्मिणीनं मला आपण होऊन पत्र पाठवून–

**बलराम :** (डोळे वटारत) पुरे ऽऽ समजलं ऽ! कळलं ऽ! तिनं पाठवलेल्या पत्रामागंसुद्धा तुझीच काहीं तरी फूस असली पाहिजे.

**शाम :** नाही नाही दादा–

**बलराम :** एक शब्द बोलू नकोस ! अरे आम्हाला आमच्या बायकोनं जन्मात कधी खुशालीच्या कार्डाशिवाय बोटभर चिठ्ठी लिहिली नाही आणि तुला मात्र तुझी बायको लग्नापूर्वी हातभर पत्र पाठवून 'मला घेऊन चला' म्हणून कळवते, यावर कोण विश्वास ठेवील ? तू एक नंबरचा छऱ्या माणूस आहेस. हे सगळ्या जगाला ठाऊक आहे- तुम्हाला सांगतो स्वामी महाराज–

**स्वामी भोलेशंकर** : (हातवारे करून 'जाऊ दे.... विसरून जा' असा अर्थ सुचवत) सच्चिदानंद ! सच्चिदानंद !

**बलराम** : याच्या सज्जन सत्शील बायकोकडं पाहून ते-ते सगळं विसरलोय मी स्वामी महाराज. पण वडील बंधू म्हणून हा माझा शब्द एरवीसुद्धा कितीसा मानतो ते मी पक्का ओळखून आहे. त्याला रीतभात नाही. माया माणुसकी नाही. पक्का नास्तिक आहे तो.

**शाम** : हा काय माझ्यावर भलताच भयंकर आरोप करताय तुम्ही दादा ? माझ्या-कडून काय चुकलं ते तर सांगाल ?

**बलराम** : दोन वेळा मी 'नमस्कार कर' म्हणून तुला इशारा दिला. चिमटासुद्धा काढला. पण तू–

**शाम** : दादा मी नमस्कार केला; पुन्हा नमस्कार केला आणि नमस्कार म्हणून ओरडलोसुद्धा.

**बलराम** : पुरे पुरे. नमस्कार काय (वेडावून दाखवीत) असा करतात ? ते काय तुला मत मागायला आलेले पुढारी आहेत ? अरे साक्षात् शिवाचा अवतार... स्वामी भोलेशंकर महाराज इडगुंजीकर तुझ्या घरी आलेत. त्यांच्यापुढं लोटांगण राहू दे, पण वाकून त्यांच्या पायाला तरी हात लावशील ?

**शाम** : दादा तुम्हाला ठाऊक आहे मी फक्त देवमाणसाच्या पायाला हात लावतो. आणि मी फक्त तुम्हाला देवमाणूस मानतो. देवमाणूस म्हणजे गॉडस गुड मॅन...

**बलराम** : ते मला ठाऊक आहे रे, पण हे इडगुंजीकर स्वामीसुद्धा अंशमात्र भगवानच आहेत.

**शाम** : तरी पण दादा–

**बलराम** : असो असो ऽ ! आल्या आल्या वाद नको. मी आज जांभळीच्या वाटेवर मुद्दाम उतरून इथं आलोय त्याचं कारण वेगळं आहे. सुभद्रा कुठाय ?

**शाम** : अजून ती कॉलेजातून परतली नाही...म्हणजे नसावी. मी आत्ताच नाटकाचा दौरा संपवून परत येतोय ना ?

**बलराम** : अरे राम राम राम ! अजून नाटकं चालूच आहेत ना तुझी ? कधी तुझा हा पोरकटपणा संपणार आहे, देव जाणे. रुक्मिणी कुठाय ? इथंच आहे ना अजून ? का तिला माहेरी पिटाळलीस ?

**शाम** : भलतंच काय दादा ? मी तिला माहेरी पिटाळीन ?

**बलराम** : तुझा काही नेम नाही. हे बघ, तुला तुझ्या तोंडावर स्पष्ट सांगतो. प्रत्येक वेळी या घरात आम्ही येतो. त्यावेळी स्वागतासाठी तुझी बायको म्हणून रुक्मि-णीच पुढं येते हे आमचं नशीब आहे.

**शाम** : काही तरीच काय दादा ? रुक्मिणी नाही तर कोण पुढे येईल ?

**बलराम** : अरे तुला रे काय कमी आहे ? एक रुक्मिणी गेली तर राधा येईल;

राधा गेली तर चंद्रा.. चंद्रा गेली तर आणखी कोणी तरी फटाकडी...खुबसूरत पोरी नंबर लावून उभ्याच आहेत तुझ्या घराच्या फाटकाशी.

**शाम :** दादा रुक्मिणीला तुम्ही एवढी गरीब गाय समजू नका.

**बलराम :** गरीब गाय नाही अगदी मारकी म्हैस तुझ्या अंगावर सोडली तरी तू तिला गोठ्यात आणून बांधशील. पराक्रम काय तो तेवढाच. कुठाय रुक्मिणी? अजून बाहेर कशी आली नाही?

( दुधाचे दोन चांदीचे पेले घेऊन रुक्मिणी येते आणि– )

**रुक्मिणी :** ही काय मी येतेच आहे ना भावोजी तुमच्यासाठी आणि स्वामी महाराजांच्यासाठी आटीव केशरी दूध करण्यात वेळ गेला म्हणून...(शामला) अहो, बघताय काय? हे पेले द्यायचे आपण दोघांना.

**शाम :** ( दचकून ) अं? हो हो, आण आण.

( शाम पेले घेतो आणि बलराम आणि स्वामीजींना देतो. दरम्यान रुक्मिणी दोघांनाही वाकून नमस्कार करते. तशी– )

**बलराम :** (आशीर्वाद देत, पेला घेऊन ) अरे वा वा....आटीव केशरी दूध का? ( खुलून ) छान...उत्तम! पाहिलंत ना स्वामी महाराज...आम्हा यादवांची सासूरवाशीण अशी खानदानी वळणाची, आतिथ्यशील, नम्र घरेलु असते. ( शाम मान डोलावतो तशी– ) तू माना डोलावू नकोस. मी यादवांच्या स्त्रियांबद्दल बोलतोय. तुझ्यासारख्या हुंगेगिरी करणाऱ्या उडाणटप्पू पुरुषांबद्दल नाही. घ्या घ्या भोलेशंकर महाराज ( घोट घेत ) वा रे वा अमृत आहे अमृत!

**स्वामी :** ( घोट घेत ) सच्चिदानंद... सच्चिदानंद.

**बलराम :** महाराज तुम्हाला म्हणून सांगतो. अशी ही तेजस्वी माऊली, सती सावित्री आर्य पतिव्रता या घरात आहे, म्हणून तिचा नवरा, हा हा छटेल नाटक्या, या घरात टिकलाय नाही तर–

**शाम :** ( मिस्कीलपणे ) पण दादा, आम्ही लग्न केलं त्यावेळी तुमचं हिच्याबद्दल मत वेगळं होतं. म्हणजे 'उठवळ...उनाड मैना...गावभवानी आणि–'

**बलराम :** ( उसळून ) उर्मटा चूप बैस! ते ते सगळं तुझ्यामुळं समजलास? अरे रांड्या राघोजी, तुझ्या सगळ्या श्रृंगारलीला स्टॉलवरल्या साप्ताहिकात वाचल्यात मी आज. शरमेनं काळा ठिक्कर पडलो मी. शेवटी गाडीतल्या संडासात जाऊन अंक वाचून काढला मी सगळा. इतका निर्लज्ज, बेशरम–

**शाम :** दादा दादा, ते सगळं खोटं आहे. वाटल्यास विचारा रुक्मिणीला.

**बलराम :** तिला विचारायची गरजच नाही. ती आर्य सती सावित्री तुझ्या विरुद्ध थोडीच बोलेल? तुझे सगळे प्रताप चक्क छापून आलेत पेपर्समध्ये

**रुक्मिणी :** ( खट्याळपणे ) जाऊ दे भावोजी...कधी कधी चुकतं माणसाच्या हातून मी त्यांना क्षमा केलीय.

**शाम :** ( चक्रावून ) आं ऽ क्षमा ऽ ? मला ऽऽ ?

**बलराम :** ऐक ऐक नतद्रष्टा...तिच्या पायाचं तीर्थ घे थोडंसं.

**रुक्मिणी :** जाऊ द्या ना गडे. विचारायचं म्हणजे स्वामीजींना काही पथ्यपाणी तर नाही ना ? म्हणजे दुपारच्या जेवणात काही गोड धोड केलं मी तर –

**बलराम :** बरं आठवलं. अगदी वेळेवर विचारलंस. दुपारच्या भोजनाला आपण सगळेच जांभळीला जातो आहोत.

**शाम :** जांभळीला ? आपण सगळे ?

**बलराम :** हो हो आपण सगळे आणि जांभळीलाच जातो आहोत. एव्हाना संपतराव कोऱ्यांची मंडळी येऊन पोचलीसुद्धा असतील तिथं. सुभद्रा घरी आली की निघायचंच आपण. तुम्ही तयारी करा पटापट.

**रुक्मिणी :** पण म्हणजे काय बाई ? इतक्या तातडीनं जांभळीला कशासाठी जायचंय ?

**शाम :** आणि कोरे मंडळीचं काय काम ठेवलंय तिथं ?

**बलराम :** सांगतो. आता सांगायला काही हरकत नाही. आज सायंकाळी गोरज मुहूर्तावर जांभळीला आपल्या मळयातल्या वाड्यावर दे. भ. साहेबराव कोऱ्यांचे चिरंजीव सुयोधनराव यांचा विवाह संपन्न होणार आहे.

**शाम :** सुयोधनराव कोऱ्यांचा विवाह ? आणि तो आपल्या मळयावरल्या वाड्यात काय म्हणून ?

**रुक्मिणी :** आणि लग्न कोणाशी होणार आहे ?

**बलराम :** अर्थात आपल्या सुभद्राताईशी. एरवी हा लग्न सोहळा जांभळीला आपल्या मळयातल्या वाड्यावर कशासाठी होईल ?

**रुक्मिणी :** पण सुभद्रा वन्संना ठाऊक आहे का हे ? त्यांना मान्य आहे का हे लग्न ?

**बलराम :** ठाऊक असलंच पाहिजे. खरं म्हणजे चार महिन्यापूर्वीच हे लग्न पार पडलं असतं पण ऐन वेळी तिचं डोकं फिरलं आणि भ्रमिष्टावस्थेत ती कार्यालयातून नाहीशी झाली म्हणून –

**शाम :** दादा तिला हे लग्न पसंत नव्हतं, त्याचा तिच्या मनावर ताण पडला म्हणून ती भ्रमिष्ट झाली आणि–

**बलराम :** नुसतं तेवढं कारण नाही. तिला फूस लावून चिथवायला तुझ्यासारखा पाताळयंत्री कपटी भाऊ अहोरात्र तिला खतपाणी पुरवीत होता म्हणून ती –

**शाम :** हा तुमचा निव्वळ गैरसमज आहे दादा. धनंजयाशी सुभद्राताईचं लग्न व्हावं असं मला वाटत असलं तरी मी काही तुमच्याविरुद्ध कपट कारस्थान करणारा पाताळयंत्री माणूस नाही.

**बलराम :** असो. झालं ते होऊन गेलं. त्यापासून धडा घेऊन मी ठरवून टाकलं की लग्नाच्या दिवसापर्यंत तुम्हा कोणालाही माझे बेत समजू द्यायचे नाहीत. सगळा मामला झटपट उरकून टाकायचा.

**रुक्मिणी :** पण सुभद्रावन्संचा विचार केलात का ?

**बलराम :** सगळा विचार करायचा तो मी केला आहे. आता चर्चा सल्लामसलत बंद. एकदम कृती. चला, जांभळीला जायची तयारी करा. कोरे मंडळी मेटॅडोर घेऊन एवढ्यात येतील इथं.

**शाम :** दादा, मागल्यावेळी लग्न मोडलं त्यावेळी साहेबराव कोरे आणि त्यांचा तो गुंड पोरगा सुयोधन तुम्हाला काय काय बोलले ते तुम्ही एवढ्यात विसरलात ?

**रुक्मिणी :** एवढंच नाही, सहकारी बँकेच्या निवडणुकीच्यावेळी तर भावोजींशी त्यांची मारामारी सुद्धा झाली होती की—

**बलराम :** मारामारी अशी नाही पण थोडी धक्काबुक्की झाली असेल. निवडणूक म्हटली की असले किरकोळ प्रकार व्हायचेच.

**शाम :** किरकोळ काय म्हणताहात दादा ? तुम्ही साहेबरावांचा हात उखडलात म्हणून तो गुंड मवाली सुयोधन सुरा घेऊन तुमच्या अंगावर धावला होता आणि—

**बलराम :** अरे जुनी झाली ती गोष्ट. आता तो पोरगा इतका सुधारलाय की माझ्या समोरून जाता येताना मान वर करूनसुद्धा पाहात नाही. तुला आतली बातमी सांगतो शाम. साखर कारखान्यात आणि सहकारी बँकेत कोरे आणि यादव यांची एक पार्टी झालीय. झेड. पी. सुद्धा आमच्या हातात आहे. एवढी ही सुभद्रा–सुयोधनाची सोयरीक जुळली की तू चमत्कारच पाहा. काँग्रेसचं अध्यक्ष-पद असं चालत येईल माझ्याकडं. मला एक सांग शामभय्या, पंजाबचा प्रश्न, आसामचा प्रश्न मिटून भारतात एकात्मता नांदायला हवी की नको ?

**शाम :** हवी ना, पण—

**बलराम :** मग सुभद्रेच लग्न सुयोधनाशीच झालं पाहिजे.

**रुक्मिणी :** सुभद्रावन्संच्या लग्नाचा आणि भारताच्या एकात्मतेचा काय संबंध आहे हो ?

**बलराम :** तो अंमळ गहन विषय आहे राजकारणातला.

**रुक्मिणी :** पण सुभद्रा वन्संच्या मनात तर धनंजयाशीच लग्न—

**बलराम :** तोही प्रश्न आता निकालात निघालाय. धनंजयानं संन्यास घेऊन तीर्थयात्रेला प्रारंभ केला आहे.

**रुक्मिणी :** तरी पण सुभद्रा वन्संना त्यांची काय इच्छा आहे ते विचारायला नको का ?

**बलराम :** ते मी तिच्याशी बोलून ठरवीन. ती काही माझ्या आज्ञेबाहेर जायची नाही. पण इतर कोणी लुंग्यासुंग्यानी मधे लुडबूड केलेली मात्र मला खपायची नाही.

**रुक्मिणी** : (रागानं) खुश्शाल ठरवा. पण आम्हीसुद्धा काही अगदीच लुंगेसुंगे नाहीत हेही बोलणाऱ्यानं लक्षात ठेवावं.

**शाम** : ( अजीजीनं ) रुक्मिणी... रुक्मिणी...

**बलराम** : मी या घरातला सगळ्यात वडीलधारा आहे. सुभद्रेचं लग्न ठरवण्याचा संपूर्ण अधिकार माझा आहे.

**रुक्मिणी** : मुळीच नाही. तो अधिकार फक्त सुभद्रा वन्संनाच आहे.

**शाम** : रुक्मिणी.... रुक्मिणी तोंड सांभाळून बोल.

**रुक्मिणी** : तोंड सांभाळून बोलतेय. तुमची दातखीळ बसते म्हणून मला तोंड उघडावं लागतं, समजलात ! लुंगीसुंगी म्हणे...

**शाम** : अगं पण जाऊ दे ना आता ऽऽ....

**रुक्मिणी** : जाऊ दे तर गेलंच आहे. तुम्ही काय वाट्टेल ते ठरवा. मी दुपारच्या गाडीनं माहेरी अमरावतीला चालेय.

**बलराम** : आपण सगळे जांभळीला जातो आहोत.

**रुक्मिणी** : भावा-बहिणीला घेऊन तुम्ही खुश्शाल जा. मी काही जांभळीला येणार नाही. मी अमरावतीलाच जाणार, जाणार, जाणार !

(आत जाते क्षणार्धाने)

**शाम** : दादा, तिचं बोलणं तुम्ही मनावर घेऊ नका. रागाच्या भरात तिचा अंमळ तोल गेला असला तरी—

**बलराम** शाम्या, तुला मी स्वच्छ बजावून ठेवतो, तुझी बायको तुझ्या ताब्यात नाही. ती एक नंबरची चढेल आहे, मग्रूर आहे, उर्मट आहे, तोंडाळ आहे आणि ढालगज आहे- तिला घरेलू वळण नाही, तिला खानदान कळत नाही.

**शाम** : (खस्याळपणे) पण घटकेपूर्वीचं तुमचं मत वेगळं होतं दादा. ती माऊली, ती सावित्री, आर्य पतिव्रता आहे असं तुम्हीच म्हणालात, एवढंच नाही तर तिच्या पायाचं तीर्थ घे, असं सुद्धा तुम्ही—

**बलराम** : (फाडकन् स्वतःच्या थोबाडीत मारून घेत ) ते बोलणारा मी मूर्खशिरोमणी, गाढव आणि बेअक्कल होतो.

**शाम** : (खस्याळपणे) मग काय बोलणंच खुंटलं.

**बलराम** : (भडकून) अरे पण बायल्या, तुझी बायको चार-चौघात तुला आणि या तुझ्या वडील भावाला, तोंड टाकून ठो ठो ठो बोलली त्यावेळी तू गप्प का बसलास ? तिला चांगलं ठणकावायचं सोडून गुळमुळीतपणे तू शेपूट घालून माघार का घेतलीस ?

**शाम** : दादा, या एका बाबतीत मी तुमचा घरातला आदर्श गिरवला आहे हे तुम्हाला कबूल करायलाच हवं. जसे तुम्ही सौ. वहिनीपुढे तसा मी माझ्या

बायकोपुढे. आणि या बाबतीतच म्हणाला तर लाज शरम वाटावी असं काय आहे ? घरोघरी हेच चालतं. काय स्वामीजी ?

**स्वामी :** सच्चिदानंद... सच्चिदानंद !

**शाम :** रुक्मिणीच्या वतीनं मी तुमची क्षमा मागतो दादा. वाटल्यास मी तुमचे पाय धरतो. (वाकून पाय धरतो.)

**बलराम :** (दूर सरत) अरे हट. दूर हो. पक्का नाटकी इसम आहेस तू. मी तुला काय आज ओळखतोय ? माझ्या प्रश्नाला तू सरळ सरळ उत्तर दे. मी घरातला वडीलधारा माणूस म्हणून, देशाचं हित डोळ्यासमोर ठेवून सुभद्रा-ताईचं लग्न सुयोधनराव कोऱ्यांशी पक्कं केलंय. तुझा होकार आहे का नकार ?

**शाम :** काही तरीच काय विचारताय दादा ? अहो 'होकार' किंवा 'नकार' मुलीनं द्यायचा. माझा तुम्हाला 'पाठिंबा' आहे की नाही ते विचारा.

**बलराम :** बघ बघ.. मला शब्दात अडवू नकोस. 'पाठिंबा' तर 'पाठिंबा'. तुझा 'पाठिंबा' मला आहे की नाही ?

**शाम :** तसं सांगायचं म्हणजे ऽ ऽ ऽ पन्नास टक्के पाठिंबा आहे.

**बलराम :** आणि उरलेले पन्नास टक्के विरोध आहे, असंच ना ?

**शाम :** म्हणजेच मी तटस्थ आहे.

**बलराम :** (चिडून) पाहिलंत स्वामीजी, कसा नतद्रष्ट वस्ताद आहे हा लुच्च्या माणूस. या हरामखोरानं लहानपणापासून भांडणाच्या प्रत्येक वेळी, शब्दावर कोलांट्या उड्या मारून मला अस्स छळलंय. ते काही नाही. माझ्याशी शब्दावर हुज्जत घालू नकोस. वादच करायची तुला खुमखुमी आली असली तर (शड्डू मांडी थोपटत) सरळ कुस्ती खेळायला ये. चलो आव मेरे सामने !

**शाम :** दूर जात) काही तरीच काय दादा ? (हसत) तुमच्यासारखी वडील माणसं, लग्नासारखे प्रश्न काय कुस्ती खेळून सोडवतात.

**बलराम :** (त्याला पकडत) मग 'हो' म्हण !...आधी हो म्हण—नाही तर—

(बलरामदादा झोंबाझोंबी करू लागताच 'हे बरं नाही दादा... हे बरं नाही' असं बजावीत शाम चटकन त्यांचं मनगट पकडतो आणि हिसक्यासरशी हात त्यांच्याच पाठीशी नेत पिरगाळतो. ते एकदम "ओय...ओय .." ओरडताच त्यांना सोडून देतो, तशी—)

**बलराम :** (हात झटकत) चांडाळा, वडील भावावर हात उगारतोस ?

**शाम :** हात उगारला नाही दादा, फक्त हात धरला (चटकन् वाकून पाय धरीत) आता माफी मागण्यासाठी पाय धरतो. माफी केली म्हणा. हूंऽऽ...ताबड-तोब... (बलरामाची दोन्ही पावले घोट्याजवळ पकडीत) माफी करा दादा.... (बसक्या गेंगण्या स्वरात) नाही तर मात्र ही पावले अशीच धरून वर उचलून विमान करीन...करूऽ ?

**बलराम :** केली बाबा...माफी केली...सोड आता पाय...

(तेवढ्यात बाहेरून कॉलेजमधून परतल्यासारखी सुभद्रा, विशीतली देखणी तरुणी, समोरचे दृश्य पाहून ती घाबरून धावते आणि– )

**सुभद्रा :** (शामला दूर करीत) हे काय...हे काय शामभय्या...

**शाम :** (उठत) अगं काही विशेष नाही सुभद्राताई... दादांची माफी मागण्यासाठी मी पाय धरले होते. तुला काय वाटलं? आम्ही दोघे यादव, यादवी युद्धासाठी उभे ठाकलो आहोत? छे छे छे छे! ते कालत्रयी शक्य नाही. अगं आम्ही चर्चा अगदी कडाक्याची केली तरी मुद्दा सोडून गुद्यावर कधीच येणार नाही. प्रत्येक बाबतीत शेवटचा शब्द दादांचा.

**सुभद्रा :** तुम्ही केव्हा आलात दादा? मी नमस्कार करते.

**बलराम :** आलो आत्ताच आणि आता आपल्या सगळ्यानाच निघायचं. तुझीच वाट पाहात होतो आम्ही. हे स्वामी भोलेशंकर इडगंजीकर महाराज....मुद्दाम आलेत तुला आशीर्वाद देण्यासाठी. (सुभद्रा स्वामीजींनाही नमस्कार करते. ते 'सच्चिदानंद सच्चिदानंद' उद्‌गारत तिला आशीर्वाद देतात. मग - )

**सुभद्रा :** आल्या आल्या लगेच निघायचं?

**बलराम :** हो. आपण जांभळीला जाणार आहोत, इतक्यात गाडी येईल. तेव्हा तू बॅग भरून तयार राहा.

**सुभद्रा :** जांभळीला एवढ्या तातडीनं कशासाठी जायचंय? घरातल्या सगळ्यांची प्रकृती ठीक आहे ना तिकडं? शामभय्या–

**शाम :** घरातल्या सगळ्यांची प्रकृती ठणठणीत आहे. आपण तातडीनं जातो आहोत ते राष्ट्राची प्रकृती दुरुस्त करण्यासाठी.

**सुभद्रा :** राष्ट्राची प्रकृती? म्हणजे? राष्ट्राला काय झालंय? आणि जांभळीला जाऊन काय दुरुस्ती होणार आहे?

**शाम :** अगं आपल्या राष्ट्रामधे फुटीरतेचा रोग बळावून देशाचे तुकडे तुकडे होण्याची वेळ आलीय हे तुला कळतंय की नाही?

**सुभद्रा :** हो कळतंय पण

**शाम :** त्यावर तात्काळ उपाययोजना करायला हवी की नाही?

**सुभद्रा :** हवी की. मी नाही कुठं म्हणतेय? पण..

**शाम :** रामबाण उपाययोजना आहे दादांच्या पोतडीत. पण ती उपाययोजना करण्यासाठी तरी दादा काँग्रेसचे अध्यक्ष व्हायला हवेत. यादव आणि कोरे मंडळी एकत्र आली तर हे काम चुटकीसरशी होईल – असं दादांना वाटतं, मलाही वाटतं. तुझं या प्रस्तावाबद्दल काय मत आहे?

**सुभद्रा :** ए शामभैय्या मला नाही बाई राजकारणातलं काही कळत.

**बलराम :** अरे तिला कशाला त्या राजकीय डावपेचांच्या दलदलीत नेतो आहेस ? मुद्याचं सांग म्हणजे झालं ?

**शाम :** ठीक आहे. मुद्याचं नेमकं सांगतो. राष्ट्राच्या जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झाला म्हणजे तरुण–तरुणींनी बलिदानाला, हौतात्म्य पत्करायला तयार व्हावं, याबद्दल तुझं काय मत आहे सुभद्रे ?

**बलराम :** अरे तू कसल्या प्रश्नांच्या काट्याकुट्यातून नेतो आहेस शाम तिला ?

**शाम :** दादा, तुम्ही गप्प बसा. मी अगदी योग्य मार्गानं चाललोय. बोल सुभद्राताई ?

**सुभद्रा :** राष्ट्रासाठी जरूर तर बलिदान करून हौतात्म्य पत्करायलाच हवं.

**शाम :** उत्तम ! तर मग असं बलिदान करून जिवंतपणी हौतात्म्य पत्करायला तू मनाची तयारी कर.

**सुभद्रा :** जिवंतपणी हौतात्म्य ? बलिदानाला तयार होऊ ? म्हणजे ?

**शाम :** हे पाहा – मनाविरुद्ध लग्न म्हणजे एक प्रकारे बलिदानच, नाही का ? नको असलेल्या पुरुषासंगे संसार म्हणजे जिवंतपणी हौतात्म्यच की ?

**सुभद्रा :** कोणाला कोणाशी मनाविरुद्ध लग्न करायचंय ? शामभय्या जरा स्पष्ट बोलशील तर–

**शाम :** थोडक्यात आज सायंकाळी गोरज मुहूर्तावर तुला श्रीमान सुयोधनराव कोरे यांच्याशी जांभळीला जाऊन विवाहबद्ध व्हायचंय.

**सुभद्रा :** सुयोधन कोऱ्याशी लग्न ?

**शाम :** केवळ राष्ट्रासाठी.

**सुभद्रा :** मला इतक्यात लग्न करायचं नाहीये.

**शाम :** मग राष्ट्राचे तुकडे तुकडे होणार आणि आमच्या नाकावर टिच्चून आतंकवादी शिखिस्तान मिळवणार.

**सुभद्रा :** बी. ए. झाल्याशिवाय मला लग्न करायचं नाही. सुयोधन कोऱ्यांशी तर नाहीच नाही.

**बलराम :** ( उसळून ) खड्डयात गेली तुझी बी. ए. ची पदवी. मला कवडी इतकी तुझ्या त्या परीक्षेची आणि पदवीची किंमत नाही.

**शाम :** ( खट्याळपणे ) तर काय ? दादांनी आठ वेळा प्रयत्न करून पदवीचा नाद जो एकदम सोडून दिला, त्यानंतर त्यानी ढुंकून कधी विद्यापीठाकडं पाहिलं नाही. त्यांचं कुठं काय अडलं ?

**बलराम :** बरोबर ! तेव्हा – ( डोक्यात प्रकाश पडून ) शाम, तू माझ्या बाजूनं बोलतो आहेस की तिच्या ?

**शाम :** नाही दादा, उलट विद्यापीठाची पदवी किती कुचकामाची झालीय ते मी सुभद्राताईला साधार पटवून देतोय. काय ग ताई, पटली ना तुझी खात्री ?

**सुभद्रा :** सुयोधन कोन्याशी मी लग्न करणार नाही, साफ सांगून ठेवते.

**बलराम :** ते चालणार नाही. काय वाट्टेल ते झालं तरी हे लग्न पार पडलंच पाहिजे. माझा शब्द गेलाय. आता तू नाही म्हणालीस तर मला विष खाऊन जीव द्यावा लागेल, ठाऊक आहे?

**शाम :** म्हणजे पुन्हा एक वेगळे बलिदान आणि हौतात्म्य.

**सुभद्रा :** तुम्ही कशाला? मीच जीव देऊन टाकते, म्हणजे कायमची सुटेन तुमच्या अरेरावीतून

**शाम :** पण असा जीव देण्यापेक्षा तू तसा जीव का देत नाहीस ताई? म्हणजे लग्नाच्या बोहोल्यावर चढून सुयोधनाला जीव अर्पण केलास तर–

**सुभद्रा :** शामभैय्या, यावेळी सुद्धा तुला थट्टा कशी सुचतेय रे?

**शाम :** मी थट्टा करीत नाहीये ताई. केवळ राष्ट्रासाठी–

**रुक्मिणी :** (तावातावाने प्रवेशत) जळ्ळं मेलं तुमचं राष्ट्र...या भाबड्या मुलीला दमदाटी करून लग्नाला उभी करताना तुम्हाला शरम कशी वाटत नाही? वन्सं, काही जांभळीला जाऊ नका तुम्ही. माझ्याबरोबर माझ्या माहेरी चला तुम्ही. मीच तुमचं धनंजयाशी लग्न लावून देते.

**बलराम :** जा खुशाल चालू लागा. मी सुद्धा संन्यास घेतो आणि हिमालयातच निघून जातो. स्वामीजी, तुमच्याजवळ स्पेअर धोतर आणि भगवी छाटी असली तर काढा बाहेर. इथल्या इथं मी संन्यास घेऊन टाकतो. काय देशाचं व्हायचं असेल ते होऊ दे.

(तोच "खबरदार" अशी गर्जना. पाठोपाठ पिस्तुलाचा बार ऐकू येतो आणि उघड्या दारातून एक शीख धर्मगुरू आणि त्याचे दोन शस्त्रधारी शिष्य येतात. सगळे दाढीमिशावाले आणि नखशिखान्त शीख धर्मगुरूच्या वेशात. ते येतात तेच मुळी... "निकाली तख्त की फते हो.. धरमिंदरसाब की फत्ते हो." अशा घोषणा देत.)

**रुक्मिणी :** (घाबरून) अरे देवा....हे कोणी आतंकवादी आलेले दिसतात.

**सुभद्रा :** (घाबरून) आपल्याला ते गोळ्या तर घालणार नाहीत?

**शाम :** ही काय मोगलाई लागली की काय? आम्ही देखील सह्याद्रीचे बच्चे आहोत. काय करतात ते बघू तर खरं...

**बलराम :** (घाबरून) अरे मूर्खा, इतक्या मस्तवालपणे बोलू नकोस. त्यांच्या हातातली ती पिस्तुलं तरी पाहा.

**धर्मगुरू :** घबराव मत...बलराम साब यादव कोन है?

**बलराम :** म...म...मैं हूं. और ये मेरा भाई शामसुंदर और ये ये...

**धर्मगुरू :** मराठीत... मराठीत बोला. आम्ही कडवे शीख असलो तरी आता पक्के मराठी झालो आहोत. मी जथ्थेदार संत प्रीतमसिंग सुरनाळा. हे माझे शिष्य

सुरींदरसिंग आणि दरबारसिंग आम्ही डुंगरपूरचे, डुंगरपूरसाहीब ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही आलो आहोत.

**रुक्मिणी :** म्हणजे तुम्ही अकाली आहात?

**प्रीतम :** नाही देवीजी, आमचा पंथ वेगळा आहे. आम्ही ' निकाली तख्ताचे ' अनुयायी आहोत.

**शाम :** ही माझी बायको रुक्मिणी आणि ही माझी बहीण सुभद्रा. डुंगरपूरचा कसला ठराव म्हणालात तुम्ही?

**प्रीतम :** ( आश्चर्याने ) काय? तुम्हाला डुंगरपूरसाहीब ठराव ठाऊक नाही? तोबा तोबा...देखा सुरींदर? देखा दरबारा?

**सुरींदर :** ऐसा कैसा हो सक्ता है सन्त प्रीतमसिंगजी?

**दरबारा :** डुंगरपूरसाहीब ठराव का तो काफी पब्लिसिटी हो चुका है, हर भारतवासियों को ये ठराव मालूम होनाही चाहिये

**प्रीतम :** बलरामजी, शामसुंदरजी, तुम्हाला डुंगरपूरसाहीब ठराव मंजूर नसला तर तसं स्वच्छ सांगा. पण—

**दरबारा :** ( पिस्तूल रोखत ) जिनको ये ठराव मंजूर नही है उनको हम लोग कत्ल करेंगे.

**प्रीतम :** दरबारसिंग पिस्तोल पाऊच मे रखो. क्यूं खालीपिली पहिलेसेही डांटता है. उन लोगों को जरा बातचीत तो करने दो. बोला बलरामजी, तुमचा विचार काय आहे?

**बलराम :** ( अजीजीनं ) हे पाहा प्रीतमसिंगसाहेब देवाशपथ आम्ही तुमचा तो डुंगरपूर ठराव वाचलेला नाही.

**शाम :** आम्हाला आनंदपूर ठराव तेवढा ठाऊक आहे. तोही ऐकून.

**प्रीतम :** आनंदपूर ठराव अकालींचा आहे. आम्ही ' निकाली तख्ताचे ' आहोत. आम्ही फक्त डुंगरपूरसाहीब ठराव मानतो.

**शाम :** डुंगरपूर ठराव काय आहे ते थोडक्यात कोणी तरी सांगा आम्हाला, म्हणजे कळेल तरी.

**बलराम :** आम्ही तो मंजूर करायचा म्हणजे काय करायचं?

**प्रीतम :** अच्छा अच्छा... सुरींदरसिंह ठराव पढो.

**सुरींदर :** ( मोठा कागद काढीत ) बहोत लंबा ठराव है संतजी. कमसे कम एक घंटा तो पढनेमें लगेगा. क्यू दरबारासिंग?

**दरबारा :** जी हां, बिलकुल ठीक बताया आपने.

**बलराम :** प्रीतमसिंगजी सगळा ठराव ऐकायची आम्हालाही गरज नाही. सवडीने वाचू आम्ही तो. पण आपण इथं कशासाठी आलात, आपल्याला नेमकं काय हवंय तेवढं नुसतं तोंडानं सांगितलंत तरी चालेल.

**प्रीतम** : ठीक ठीक... आपण तसंही करू या. ( कागद पाहात ) हा ठराव असं सांगतो की, भारतात खरीखुरी एकात्मता साधायची असेल तर शीख समाज आणि इतर हिंदू लोक, यांच्यात बेटी व्यवहार सुरू झाला पाहिजे

**बलराम** : एवढंच ना ? मंजूर... मंजूर....

**शाम** : दादा, जरा सावधपणे ऐका. इतक्यात निर्णय देऊ नका.

**बलराम** : ( शामला चिमटा काढीत बसक्या आवाजात ) चांडाळा त्यांच्या हातातली पिस्तुलं तरी पाहा...

**प्रीतम** : ही गोष्ट काही एकदम होणार नाही. पण हा ठराव म्हणतो की पहिली पायरी म्हणून सर्व भारतियांनी, शीख तरुणांनी पसंत केलेल्या तरुण मुलींशी त्यांचा विवाह बिनतक्रार लावून दिला पाहिजे. उपकार म्हणून नव्हे. हक्क म्हणून, मंजूर ?

**बलराम** : काय शाम ? मला वाटतं हा ठराव... म्हणजे ही शर्त मंजूर करायला काही हरकत दिसत नाही. मुलींची लग्नं इतकी बिनबोभाट आणि परस्पर होत असली तर कोणते मूर्ख आईबाप त्याला विरोध करतील ?

**प्रीतम** : म्हणजे मंजूर ?

**शाम** : जरा थांबा. या शर्तीमध्ये चांगलाच घोळ आहे. मुलीला हा विवाह संमत आहे की नाही याचा त्यात उल्लेख नाही. एखाद्या मुलीला मुलगा पसंत नसला तर ?

**प्रीतम** : चालणार नाही. भारताच्या एकात्मतेसाठी तिला त्याच्याशी लग्न करणं भागच पडेल. क्यौं सुरींदर ? ठीक है ना ?

**सुरींदर** : जी हां... बिलकुल ठीक है सन्तजी.

**शाम** : दादा हा ठराव तुम्ही मुळीच मान्य करू नका. जरा विचार करा. निदान महाराष्ट्रापुरता तरी विचार करा आधी आपली मराठी मायभूमी रूपसौंदर्या-बद्दल कितपत प्रसिद्ध आहे हं तुम्ही चांगलं जाणता. त्यातून आपल्या शीख बांधवांनी, महाराष्ट्रातल्या एकूण एक रूपवती सुंदर मुली नेमक्या निवडून, लग्न करून पंजाबात पळवल्या तर मग आपल्या तरुणांसाठी इथं काय माल उरेल ? हिरवळ जाऊन इथं काय फक्त कुब्जा, शूर्पणखा आणि मंथराच शिल्लक ठेवायच्यात का ? या दंडकारण्यात पुन्हा एकदा राक्षसांची निपज करायची का आपल्याला ?

**दरबारा** : तू म्हणतोस ते खरं आहे. त्यासाठी आपण ठरावात थोडा बदल करू या. चालेल ना सरदार प्रीतमसिंगजी ?

**प्रीतम** : मुळीच चालणार नाही. डुंगरपूरसाहीब ठरावात एका अक्षराचाही बदल करता येणार नाही कोणाला.

**शाम** : मग डुंगरपूरसाहीब ठराव आम्हाला मान्य नाही.

**बलराम :** हे बघ शाम, भारतानं या ठरावाचं काय करायचं ते भारत सरकार पाहील. महाराष्ट्राचा विचार इथले आमदार–खासदार करतील. त्यांनाही मुलीबाळी आहेतच की? आपण तूर्त आपल्यापुरता विचार करू या. काय सरदारजी?

**प्रीतम :** बहोत अच्छा. एकदम शहाणपणाचा निर्णय आहे हा.

**बलराम :** मग तुम्हाला आमच्याकडून नेमकं काय हवंय ते सांगा. तुमचा डुंगरपूर-साहीब ठराव आम्ही मान्य करायचा म्हणजे काय करायचं?

**प्रीतम :** सुरींदर, बताव ये लोगोंको.

**सुरींदर :** बलरामजी, जथ्थेदार सन्त प्रीतमसिंग सुरनाळा आपकी बहेन से, सुभद्राजी से ब्याह करना चाहते है?

**शाम :** (ओरडून) काय काय काय? हा हा दाढी दीक्षित आमच्या सुभद्रेशी लग्न करणार? ते मुळीच शक्य नाही. मी त्याला कधीही मान्यता–ओय...

**बलराम :** (शामला चिमटा काढीत) मरायची अवदसा आठवली का चांडाळा तुला?

**प्रीतम :** तुम्हाला हा ठराव मंजूर नसेल तर आम्हाला शिखीस्तान देणं आम्ही तुम्हाला भाग पाडूच पण त्या आधी आज आम्ही तुम्हा सगळ्यांचे इथे मुडदे पाडू.

**शाम :** खुश्शाल. आमचं काय वाट्टेल ते करा. पण आम्ही– ओय...

**बलराम :** (चिमटा घेत) तुझं डोकं बिकं तर फिरलं नाही ना शाम्या?

**प्रीतम :** ठीक आहे. वाटाघाटी फिसकटल्या. आता पुढली बोलणी स्वर्गातच होतील. दरबारसिंग वो ट्रॅन्झिस्टर निकालो.

**दरबारा :** जी हां संतजी. बिलकुल तयार है. (पिशवीतून एक ट्रॅन्झिस्टर काढून समोर ठेवतो आणि) स्वीच ऑन करू जी?

**बलराम :** (किंचाळत) थांबा थांबा...शाम्या....रुक्मिणी अरे तो ट्रॅन्झिस्टर नाहीये, बॉम्ब आहे बॉम्ब. टाइम बॉम्ब. ताबडतोब मागणी मान्य करा त्यांची. नाही तर हकनाक जीवे मारले जाऊ आपण सगळे.

**शाम :** दादा या आतंकवाद्यांच्या दमदाटीला तुम्ही बळी पडणार आहात? मेलो तरी बेहत्तर पण–ओऽय ओऽय...दादा केव्हांदा चिमटा काढलात?

**बलराम :** तुला मरायचं असेल तर खुशाल मर जा विहिरीत उडी घेऊन. आमच्या जिवावर का उठला आहेस चांडाळा तू?

**प्रीतम :** देखते हो क्या दरबारासिंग...लगाव बत्ती....

**बलराम :** थांबा थांबा....अरे क्षणभर तरी थांबा. सुभद्रे पोरी आता तू मनावर घेतलंस तर सर्वांचे प्राण वाचणार आहेत. 'होय' म्हणून टाक. राष्ट्रातली दुफळी वाचवल्याबद्दल लोक पुढं तुझे पुतळे उभे करतील.

**शाम :** दादा, तुम्ही भलतंच काय सांगताय तिला हे? कोन्यांना शब्द गेलाय तुमचा.

**बलराम :** अरे आपण जगलो तर शब्द पाळायचा. कोन्यांच्या पोराला मी दुसरी मुलगी मिळवून देईन. पण सुभद्रे, तू आता या माथेफिरू शामचं ऐकू नको. प्रीतमसिंगाशी लग्न करून टाक.

**सुभद्रा :** दादा, शामभय्या, वहिनी केवळ तुम्हाला सगळ्यांना वाचवण्यासाठी आणि राष्ट्रातली दुफळी सांधण्यासाठी मी या बलिदानाला तयार आहे. प्रीतमसिंग मी लग्न करायला तयार आहे.

(प्रीतमसिंग, दरबारासिंग, सुरींदरसिंग "निकाली तख्त की फते हो.... हरमिंदरसाब की फते हो, धरमिंदरसाब की फते हो..." अशा घोषणा देतात.)

**बलराम :** जीते रहो बेटी. तू आज घराण्याचं नाव राखलंस. दरबारासिंग तो ट्रॅन्झीस्टर आधी पिशवीत घाला. प्रीतमसिंगजी आता तुमचा काय विचार आहे? जांभळीला लग्नाची सारी सिद्धता आहे. येत असलात तर—

**प्रीतम :** नाही नाही बलरामजी. आम्ही लग्नाची सगळी जय्यत तयारी करूनच इथं आलो आहोत. आम्ही पुढं जातो आणि तुमच्यासाठी गाडी पाठवून देतो. चलो सुभद्राजी, सुरींदर, दरबारा, मुहूर्त चुकता कामा नये. देसाईसाब वाट पाहात असतील तिकडं.

**रुक्मिणी :** कोण देसाई साहेब? कुठे लग्नसमारंभ करणार आहात?

**प्रीतम :** कळेल तुम्हाला.. लवकरच कळेल...

(पुन्हा घोषणा देत प्रीतमसिंग, सुभद्रेचा हात धरून तिला घेऊन जातो. पाठोपाठ दरबारासिंग आणि सुरींदरसिंगही जातात. दादासाहेब गच्च डोकं भरून मटकन् बसतात. स्वामीजी मात्र घाम पुसत 'सच्चिदानंद...सच्चिदानंद' जप करीत राहातात. फक्त शामसुंदर सिगरेट काढून थंडपणे आरामात शिलगावतो. रुक्मिणी संशयाने त्याच्याकडे पाहात राहाते. क्षणभराने—)

**रुक्मिणी :** कोठला कोण दाढीवाला प्रीतमसिंग पत्करलात, त्यापेक्षा का आमचा धनंजय वाईट होता?

**बलराम :** जाऊ दे रुक्मिणी, थोडक्यावर निभावलं यात आनंद माना. गतं न शोच्यम्. देव करतो ते बऱ्यासाठीच असतं. या तुझ्या नवऱ्याला शहाणपणा शिकीव अंमळ. त्याच्या भलत्या ठिकाणी वीरश्री दाखवण्यापायी सर्वांचाच काळ आला होता आज.

**रुक्मिणी :** काय हो, देसाईसाहेब कोण? तुमच्या मधुवंतीचे तर वडील नव्हेत?

**शाम :** छे छे, त्यांचा काय संबंध? उगीच काय काही तरी बरळतेस?

**रुक्मिणी :** हीरो-हिरॉईन आले की तुम्ही मुहूर्त उरकून घ्या म्हणून तुम्ही मधुवंतीला निरोपसुद्धा धाडला होता मराठी बाबा मुनीबरोबर.

**शाम :** ते ते अगदीच वेगळं प्रकरण आहे. प्रीतमसिंगाशी त्याचा काही एक संबंध नाही.

(बलरामदादा एकदम संशयानं शामकडे बघू लागतात.)

**बलराम :** काय रे शाम, या प्रीतमसिंगाचा आवाज मला अंमळ ओळखीचा वाटला.— चेहरा मोहरासुद्धा—नाही दाढी मिशा असू देत...पण तुला काय वाटतं रुक्मिणी ?

**रुक्मिणी :** होय बाई, मला सुद्धा आत्ता वाटतंय की या प्रीतमसिंगाला कुठं तरी पाहिलंय. तो काही अस्सल शीख धर्मगुरू वाटत नव्हता.

(त्याच वेळी गालात हसत शामसुन्दर—
'रचिला ज्याचा पाया त्याची बरी उभारणी झाली' असे गुणगुणू लागतो. त्या क्षणी डोक्यात काही एक उलगडा होऊन बलरामदादा ताडकन् उठतात आणि धावून जात शामसुन्दरचे खांदे धरून त्याला घुसळत कडाडतात—)

**बलराम :** शाम...शाम्या...शामीटल्या...ही तुझी कारवाई...हे तुझं कारस्थान.. हरामखोर, बदमाश, विश्वासघातकी, कपटी, खरं सांग चांडाळा, तो प्रीतमसिंग कोण होता ? तो प्रीतमसिंग कोण होता ?

**शाम :** (हसत त्यांचे पाय पकडत) क्षमा क्षमा...दादा क्षमा करा. मी तुमचे पाय पकडलेत. आधी क्षमा कराऽऽ

**बलराम :** केली बाबा, तुला क्षमा केली. आधी पाय सोड, चांडाळा अरे मी पडेन, आधी पाय सोड...

(हा दंगा चालला असतानाच रुक्मिणी हसू लागते आणि त्याचवेळी—पडदा).

❋ ❋

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 29680 नों. दि. 28/7/66
वि. नाटक क्र. ..................
IRBK-0121860
IRBK-0121860